

दीपावली
विशेषांक
२०१४



स्त्री मनाशी संवाद साधणारी

# सखी संवादिका

-: संपादक :-

**विशाखा पवार**





प्रकाशन : ओम पब्लिकेशन

ओम पब्लिकेशनने हा दिवाळी अंक प्रकाशक डॉ. विलास पवार यांनी, एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा ठाणे. फोन. - ०२२-२५३६४१४१ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केला. अंकात छापलेल्या मताशी संपादक संपूर्ण सहमत असतीलच असे नाही.

E-mail - info@ompublication.com • Website - www.ompublication.com

# अनुक्रमणिका


**संपादकीय** ३

**लेख**

स्त्रीभ्रूणहत्या – चारूलता कुळकर्णी ५

साडी रे साडी – शुभांगी पासेबंद ९

सई तुझ्या कुंकवाला... – शालीन मेनन १३

माझी अमेरिकन मैत्रीण – राजश्री रामचंद्र खरे १७

आम्ही सारे युधिष्ठिर! – लता लीलाधर बोरोले २१

काटेरी गुलाब – पुष्पा गोपिनाथ लंकेश्वर २५

माझी काकू आजी – मधुरा केळकर २९

मधुरा – आशा खिल्लारे ३३

स्त्रियांवरील अत्याचार कसे रोखता येतील? – वर्षा वसंत साळुंके ३७

प्राजक्त कधी बहरेल? – सुचेता चितळे – नलावडे ४१

प्रसूतीनंतरचा काळ – ओमनी फीचर्स ४५

आठवणीतील सोळांकूर – नि. श. गुळवणी ४९

धाडू नको बाजारी – ओमनी फीचर्स ५३

नशिबाचा खेळ – सुजाता मेहता ५७

माझी वजनदार गोष्ट – वैशाली संजय सांगावकर ६१

**कथा**

नात्यांचे पाश तुटलेली नाती – गिरीजा र. पागनीस ६५

ती – शैला श. जोशी ६९

उजळलेली संध्याकाळ – अनुराधा साळवेकर ७३

दोन तपानंतर ... – अर्चना कुलकर्णी ७७

मोठं मन – सुजाता मेहता 83

**नाटीका**

स्वागत नव्या विचारांचे – सुधा नांदेडकर ८५

घरोघरी त्याच परी – सुनीता सुरेश देहेरकर ८७

**टीप्स् – कीर्ती वैती** ९३

**काव्यविश्व** १०१

**पाककृती** १११

**विनोद** ११५

# संपादकीय !

## संवादाने सुख मिळते.....

*'संवाद म्हणजे काय गं सखी' असा प्रश्न कधी ऐकू आला तर? नाही, नाही असं होणार नाही कारण आजतरी आपण एवढ्या बोथट मनोवृत्तीच्या झालेलो नाहीत.*

*'संवाद' न होण्याची कारणं तशी आपल्याकडे आहेत. त्यातले एक म्हणजे 'न भेटणे', त्यामुळे प्रत्यक्षात बोलणे होत नाही आणि त्यामुळेच संवादाला ओहोटी लागण्याची शक्यता निर्माण होते. सख्यांनो, आपण व्हॉट ॲप्सवर सगळ्यांशी संपर्कात असतो परंतु संवादी नसतो. फेसबुकवर आपल्या लॉगवर आपण व्यक्त होतो परंतु मोकळ्या होत नाही. संवादी होण्यासाठी, मोकळ्या होण्यासाठी प्रवाही होण्यासाठी आठवड्यातून एकदा जरी भेटलो तरी आठवड्याचा संवाद आपल्या आयुष्याच्या समृध्दीला पोषक ठरू शकेल: सोप ऑपेरा, सास बहूच्या मालिकांच्या पुढे जाऊन आपण अनेक कर्तव्याच्या कोनाशिला उभारल्या आहेत. ह्या कर्तृत्वपताका आपल्या नवऱ्याच्या, मुला, मुलींच्या वा अन्य नातेसंबंधाच्या रूपाने फडकताना दिसतात मग आपण न भेटता अव्यक्त का राहायचे. संवाद साधणे म्हणजे एकत्र येणे आणि आनंद वाटणे असे आम्हाला वाटते, कधी काळी एकत्र पाणवठ्यावर जाताना, सरपण गोळा करताना, सणासुदीला पदार्थ करण्यासाठी, पापड लोणची करताना हा संवादाचा गोतावळा घडला जायचा. काळाच्या ओघात हे सर्व बदलले परंतु संवादाची गरज मात्र तशीच आहे. त्याच्यासाठी साधनं शोधली गेली परंतु ती साध्य नाहीत, आणि संवादाव्यतिरिक्त काहीच साध्य होणार नाही म्हणून संवाद साधण्यासाठी सख्यांनो, एकत्र येण्याचा मुद्दा स्वीकारायला हवा आहे! दिवाळसणाला एकत्र येण्याचा मुहूर्त साधायला हवा आहे आणि संवादाची सुरुवात दिवाळीच्या आतषबाजीच्या साक्षीने करायला हवी आहे. तर सख्यांनो, दिवाळीच्या शुभेच्छा वाटून संवाद साधूया, विचारांनी समृध्द होऊया.*

***दिवाळीच्या अनेक शुभेच्छा!***



*With Best Compliments from*

# Venu Art & Print

## Thane



# स्त्रीभ्रूणहत्या

- चारूलता कुळकर्णी

*शरदला जाऊन एक महिना झाला. शरयूबाई व बाबासाहेब हादरले होते. शारदा तर हतबल झाली होती. बाबासाहेबांकडे पाहून शारदाने हा धक्का पचवायला सुरुवात केली. एक दिवस लवकर उठून शारदा कुठेतरी जाण्याची तयारी करू लागली. शरयूबाईंना आश्‍चर्य वाटले. एवढ्या सकाळी सकाळी कुठे निघालीस ? शरयूबाईनी विचारले. शारदा म्हणाली, ''आई, मी आजपासून आपल्या कंपनीत जाणार आहे. शरदने ठेवलेले प्रोजेक्ट पूर्ण करायचे आहेत.*

'आज शिंदेंच्या घरात सर्वत्र धांदल उडाली होती, त्यांच्या एकूलत्या एका मुलाचे शरदचे आज लग्न होते. शरयू शिंदे म्हणजे शहरातलं एक मोठं व्यक्तिमत्त्व अगदी गावापासून ते दिल्लीपर्यंत त्यांच्या शब्दाला किंमत होती. पंचावन्नमधील एक संपन्न, पैसैवाली बाई शरयू म्हणजे समाजकारणातलं एक मोठं नाव होतं. त्यांनी राजकीय वजन वापरून खूप साऱ्या संस्था उभारल्या होत्या. त्यांच्या मनांत जर एखादी गोष्ट आली की ती पूर्ण होईपर्यंत त्यांना चैन नसायची. स्वत:चा धंदा सुरू केला. सर्व गावांत 'शरयू बाईक इंडस्ट्रीज'चं मोठं नावं होतं.

बाबासाहेब शिंदे म्हणजे शरयूबाई शिंदेंचे यजमान, अगदी स्वभावाने गरीब व सामान्य माणूस ! शरयूबाईंच्या करारी स्वभावामुळे ह्या दोघांमध्ये सुसंवाद नव्हता. लहानपणी शरदला आईची माया कधीच मिळाली नाही. शरयूबाई सतत आपल्याला राजकारणात व धंद्याला वाहून घेत. त्यांना सामाजिक कार्याची सतत चिंता असायची. शरद मोठा झाल्यावर त्याचाही स्वभाव त्याच्या आईसारखा करारी व महत्त्वाकांक्षी झाला. बाबांच्या अबोल स्वभावाबद्दल त्याला हळूहळू कळू लागलं. शाळेत पालक सभा, कार्यक्रमाला नेहमी बाबाच येतात. आई कधीच येत नाही. त्याच्या इतर मित्रांबरोबर त्यांचे आईबाबा दोघंही येतात. शरदने शालेय शिक्षण पूर्ण केल्यावर, उच्च शिक्षणासाठी शरयूबाईंनी त्याला परदेशी पाठवलं. बाबासाहेबांच्या मनात शरदला परदेशी पाठवायचे नव्हते पण आईचा हट्टी स्वभाव त्याला माहीत होता.

शरद आपलं शिक्षण घेऊन आला तेव्हा व्यवसायात रस घेऊ लागला. व्यवसायातले गमक त्याला तरुण वयातच कळायला लागले. पण ह्याबरोबर कामगारांची भावनिक नाती जपायला तो विसरला. हाताखालच्या लोकांना सार्वजनिक सुट्टया नव्हत्या, त्यांच्या नैमात्तिक रजा तर बंदच होत्या. ह्या नवीन मालकामुळे कामगारांमध्ये असंतोष पसरला. वरचेवर वादांमुळे शरयूबाईंना फार मनस्ताप होऊ लागला. सारख्या स्वभावाच्या दोन माणसांनी एकत्र व्यवसाय करणे म्हणजे एकाच म्यानात दोन तलवारी

राहण्यासारखे आहे. त्यांनी हळूहळू धंद्यातून आपलं लक्ष कमी केलं त्यामुळे सगळी जबाबदारी शरदच सांभाळू लागला.

शरदच्या व्यवसायात लक्षणीय वाढ झाली पण कामगार व अधिकारी वर्ग कामामुळे बेजार झाला होता. माणसं कामाच्या दडपणामुळे दडपू लागली. शरयूबाईंनी शारदा, चांगली शिकलेली आपली सून म्हणून पसंत केली. शरदने देखील ह्या प्रस्तावाला होकार दिला. साखरपुडा झाला आणि ह्यावर्षी लग्नाचा बार उडाला! मोठ्या थाटामाटात लग्नसोहळा पार पडला.

पाटलांची शारदा घरी सून म्हणून आली. दहा-पंधरा दिवस मस्त धामधुमीत गेले. शरद आता आपल्या कंपनीत जाऊन काम पाहू लागला. बाबांचं व सुनेचं चांगल पटू लागलं त्यामुळे त्या दोघांमध्ये सुसंवाद होऊ लागले. शारदा देखील मनमिळाऊ होती. शरद व शारदामध्येसुध्दा एक नातं घडत गेलं. शरदच्या डोक्यात सतत कामाचा विचार असायचा त्यामुळे तो चिडचिड करायचा पण शारदा नेहमीच त्याला सांभाळून घेत होती. शारदाच्या मिठीत त्याला शांती मिळायची. वारंवार त्याला मिटिंगांना जावे लागत असे. तेथील वादविवाद व चर्चेमुळे त्याला ताण येत असे. एकदा असाच शरद कंपनीच्या मिटिंगमध्ये मोठा वाद झाला तो राग डोक्यात ठेवून गाडी चालवू लागला. त्याची गाडी रस्त्याने वेगाने धावू लागली. गाडीचा स्पीडसुध्दां जास्त होता... तेवढ्यात समोरून भरधाव येणाऱ्या ट्रकवर शरदची गाडी धडकली. जे होऊ नये ते घडले. शरदचे प्राण जागच्या जागी थबकले, शारदाचे कुंकू पुसले गेले. शरयूबाई व बाबांचा एकुलता एक आधार नाहीसा झाला. काळाने आपली वेळ साधली. ह्या अशुभ बातमीने शिंदेचा बंगला हादरला. कंपनी थरारक झाली. लोकांचा विश्वास बसेना अशी घटना घडली. काय नियतीची करामत म्हणायची! शरद नाही म्हणजे कंपनीचा जणू कणाच मोडला.



शरदला जाऊन एक महिना झाला. शरयूबाई व बाबासाहेब हादरले होते. शारदा तर हतबल झाली होती. बाबासाहेबांकडे पाहून शारदाने हा धक्का पचवायला सुरुवात केली. एक दिवस लवकर उठून शारदा कुठेतरी जाण्याची तयारी करू लागली. शरयूबाईंना आश्चर्य वाटले. एवढ्या सकाळी सकाळी कुठे निघालीस? शरयूबाईंनी विचारले. शारदा म्हणाली, ''आई, मी आजपासून आपल्या कंपनीत जाणार आहे. शरदने ठेवलेले प्रोजेक्ट पूर्ण करायचे आहेत. मी कालच ह्याबाबंत बाबासाहेबांशी बोलले. मला आशीर्वाद द्या''. एवढे बोलून तिने पायाला स्पर्श केला.

शारदा व्यवसाय बघू लागली. कंपनीत इतरांना वाटले, ही बाई काय व्यवसाय करणार? पण थोड्याच कालावधीत शारदाने आपल्या बुध्दीच्या चातुर्याने सगळ्यांची मने जिंकली. सततच्या कामामुळे शारदा थकत होती. वरचेवर तिला उलट्या व चक्कर येऊ लागली, तिच्यातील बदल शरयूबाईंना

जाणवला. तिने शरद गेला तेव्हा आपल्याला दिवस गेल्याचे सांगितले. आता चार महिन्यांच्या गर्भवती असल्याचे सांगितले. शरयूबाई व बाबासाहेबांना खूप आनंद व समाधान वाटले.

आनंदाच्या भरात शरयुबाईंनी शारदाला सांगितले ''शारदा, चल आपण डॉ. कुळकर्णीकडे जाऊ. त्या लगेच सांगतील मुलगा की, मुलगी''.त्यावर शारदा लगेच म्हणाली, ''आई, हे काय बोलता ? अहो, मुलगा-मुलगी दोघंही सारखेच. माझ्याकडे जरा बघा, शरदनंतर मी सगळा व्यवहार सांभाळतेच ना ? जो गर्भ वाढत आहे तो माझ्या शरदच्या प्रेमाची निशाणी आहे. तपासणीनंतर समजा मुलगी असेल तर तुम्ही काय करणार '' ? त्यावर शरयूबाई म्हणाल्या, ''गर्भपात करायचा''. हे ऐकून शारदाला प्रचंड राग आला. ती म्हणाली, '' अहो हे काय बोलता ? हा गुन्हा आहे. मुलगी नसेल तर समाज कसा चालेल ? असं जगात एकही क्षेत्र नाही की तेथे बाई कार्यरत नाही. आज आपण २१ व्या शतकात वावरत आहोत. पंतप्रधान ते राष्ट्रपती ही पदे बायकांनीच भूषविली ना'' ? ''हे बघ शारदा, मला काही ऐकायच नाही. मी सांगते तसंच व्हायला पाहिजे''.

आता बाबासाहेबांचं मौन सपलं. ते शरयूबाईंच्या अंगावर धावून गेले. ''अग, किती मुलींचा बळी घेशील ? तू काय राक्षसीण आहेस की, बाई ? एक बाई असून तू असं कसं करू शकतेस ?'' शारदाला बाबासाहेब म्हणाले, ''मी ह्या तुझ्या सासूशी बोलत नाही ह्याचं कारण मला न विचारता हिने जवळजवळ तीन मुलींचा बळी घेतला. मी मुलीसाठी हापापला होतो पण नाही. मला माझ्या मुलींची आठवण येते. त्या जर आता असत्या तर त्यांनी मला तुझ्यासारखीच व्यवसायात तुला मदत केली असती. कळी उमलायच्या आतच ह्या बाईनं तिला मोडून टाकून दिली. त्या तीन कळ्या मोडून टाकून दिल्यामुळेच हिला मुलाचं (शरदचं) सुख मिळालं नाही. नियतीने हिचा मुलगाच हिरावून घेऊन हिला पापाची शिक्षा दिली. आता काहीही होवो. मी ह्या तुझ्या सासूपासून तुझं संरक्षण करणार.'' बाबासाहेब शरयूबाईंना म्हणाले, ''हे बघ, शारदाच्या पोटी येणारं बाळ हे आपल्या लाडक्या शरदचं आहे. हे माझ्या शरदच आहे. त्याने म्हाताऱ्या आई-बाबांना दिलेली देणगी आहे. '' हे एकून शरयूबाई जोरजोरात रडू लागल्या. शारदाने त्यांना सावरले. ''नियतीने शरदला ओढून घेतलं पण शरदच्या प्रेमाचं प्रतीक मी कधीही देणार नाही. मग ती मुलगी असो की मुलगा मी त्याला खूप खूप शिकवणार. शरदसारखं मोठं करणार. ''

◆◆◆

---

## बदाम काजू

एक म्हातारी बाई रोज बसने देवळात जायची.

ती ज्या बसने जायची त्या बस कंडक्टरला रोज

बदाम काजू खायला द्यायची.

एक दिवशी कंडक्टरने म्हाताऱ्या बाईला

विचारले, ''की आजी मला रोज

काजू बदाम खायला का देता.. ?''

म्हातारी बाई म्हटली, '' बेटा, आता मी म्हातारी झाली आहे,

आणि त्यामुळे दात पण पडलेत,काजू बदाम

नुसते चघळून फेकून देणं चांगलं नाही ना..''

**ओमनी फीचर्स**

With Best Compliments from

# V. S. PATIL
# & CO.

# साडी रे साडी

- शुभांगी पासेबंद

***''एवढ्या साड्या घरात असताना अजून साडी कशाला हवी ?'' हा प्रश्न पुरुष नेहमीच बायकांना, बायकोला, आईला विचारतो. या प्रश्नावर माझ्या मैत्रिणीने एकदा उत्तर दिले होते, ''तोंडाला चव येण्यासाठी'' साडीखरेदीने बाईला फिलगुड वाटते, तिला त्यात आनंद मिळतो.***

मनमंदिर मधून केली साडी खरेदी,

लांबलेले लग्न ठरले आधी! 'साडीची भेट प्रेमाची भेट'

अशा साड्यांच्या दुकानाच्या विविध जाहिराती आपण नेहमीच ऐकतो. पूर्वीच्या काळी सासू, आजी, नातीला पैठणी साडी, बनारस शालू वारसाहक्काने द्यायची. त्या साडीत त्या घराचे संस्कार, वारसा प्रेम सर्वकाही येत असे. त्या साडीत नववधू पूर्वजांपैकी एक किंवा भिंतीवरील तैलचित्रातील एक वाटत असे. साडीला साइज नसते व शिवायची कटकट नसते. त्यामुळे कुणाचीही साडी कोणीही घालू शकते. अदलाबदल करू शकते. काळे पांढरे ब्लाउज तर कोणत्याही साडीवर घालून खपून जाते. शिवाय जुन्या साडीचे उपयोगसुध्दा अनेकविध असतात. गादीला खोळ करणे, दुपदरी, गोधडी शिवणे, माळ्यांना, खिडक्यांना पडदे शिवणे. घागरा शिवणे, ओढण्या करणे, न लागणारे कपडे तिच्यात बांधून ठेवणे, पुस्तके बांधणे. सोफ्यावर पसरवणे, धान्य सुकवणे.

रामायण, द्रौपदी, म्हैसूर सिल्क, ब्लॉक प्रिंट, नयनतारा, बोस्की, पीतांबरी, पिंजरा, पुणेरी, गढवाल, जिजामाता, कोटा पोचमपल्ली, बांधणी टांगवी, पटोला, पैठणी, गुर्जरी, मृगनयनी, विश्व मोहिनी अशी वेगवेगळी साड्यांची नावे आहेत. साडी नेसल्यावर स्त्री स्वत:ला रूपगर्विता समजते. साडी नेसणे व ती सांभाळणे हे एक कष्टाचे काम असते. त्यामुळे साडीची सखी म्हणजे साडीपिन होय. नऊवारी साडी नेसायला तर एकशेआठ पिना लागतात. सहावारी तरी दोन पिनांवर भागते. कृत्रिम धाग्यांच्या नायलॉन, पॉलियस्टर, क्रेप, सॅटीन अशा साड्या सुती व हातमागाच्या साड्यांहून अधिक टिकतात. मात्र खरे सौंदर्य व खानदानी ऊब हातमागाच्या साडीतच असते. स्त्रीला रेशमी, सिल्क साडी हे एखाद्या सणासुदीला मिळणारे भेटआंदण असते. तर बनारस शालू हे फक्त विवाहाचे वेळी खरेदी केले जाणारे महावस्त्र असते. लग्नाचा वाढदिवस, ह्याचा-त्याचा वाढदिवस, सहजच अशा कारणांनी बायकांसाठी खरेदी करीत असतात.

वेगवेगळ्या साड्या एका मोठ्या रंगीत सुती कापडात बांधून ठेवतात या वरच्या वस्त्राला चिंधी असे म्हणतात. आतील शालूसाठी ही चिंधीही जपून धुऊन स्वच्छ ठेवावी

लागते म्हणजे आपल्या आवडत्या गोष्टींसाठी नावडती व कमी महत्त्वाची गोष्टसुध्दा जपावी लागते. हल्ली साड्या ठेवायला प्लॅस्टिकची फोल्डर, कव्हर्स मिळतात. या साड्यांच्या गाठोड्यात बाईचा गुप्त खजिना असतो.



या गाठोड्यात तिच्या माहेरच्या आठवणी, मागे पडलेले गाव वसलेले असते. मध्ये मध्ये या साड्या वर खाली करून त्या आठवणी वाळणे व डोळे टिपणे हा स्त्रियांचा लाडका छंद असतो. हो! तेच माझ्याही मनातले विचार मला त्या साडीच्या ढिगात पुन्हा पुन्हा सापडतात. हल्ली साड्यांची दुकाने चालत नाहीत व सोयीसाठी साड्या नेसणे बऱ्याच महिलांनी कमी केले आहे. केवळ प्रासंगिक वेषरूपाने साडी उरली आहे. साड्यांच्या सेलला भेट देणे हा स्त्रियांचे मनोरंजन करणारा व मनावरचा ताण हलका करणारा खास कार्यक्रम असतो. साडी खरेदी करून व पुढच्यावेळी काय खरेदी करायचे हे ठरवूनच स्त्रिया अशा सेलमध्ये जातात. वेगवेगळ्या प्रांत, प्रदेशांत पदर, निऱ्या यांची लांबी रुंदी दिसते. ब्लाऊजच्या पध्दती बदलून त्या त्या प्रदेशाच्या संस्कृती साडीपध्दती असतात. दूरदर्शनवर ते दाखवल्या जाणाऱ्या ''मिले सूर मेरा तुम्हारा'' मध्ये वेगवेगळ्या साड्या वेगवेगळ्या पध्दतीने नेसलेल्या दिसतात. पदर घेण्याच्या पध्दतीतील फरकही कळतो. मधला छापील भाग, पदराची रंगसंगती, काठाची लांबी, रचना यामध्ये फरक करून साड्यांची फॅशन बदलत असते. दोन बायका भेटल्यावर ही साडी कोठून घेतली? अशी चौकशी करतात. शिवाय ''छान दिसते ही साडी'' अशी निदान तोंडदेखली स्तुती तरी करतात. दुसऱ्या बाईची साडी हा स्त्रियांचा हेव्याचा विषय असतो. साडीची लोकप्रियता वेगळी सांगायची गरज नाही.

''माहेरची साडी'' या चित्रपटाने तर रेकॉर्ड केले होते. 'तोहफा' चित्रपटातील साड्या बघण्यासाठी आम्ही मैत्रिणींनी तो चित्रपट दोनदा पाहिला होता. साडी या विषयावर मी ''हात नका लावू माझ्या साडीला'' हा लेख बक्षिसपात्र ठरला होता. शिवाय त्या कारणाने सर्व नातेवाईकांनी माझ्याकडून साडीखरेदीची पार्टी उकलली होती. तो साडीबद्दलचा लेख मला महाग पडला होता. साडी घालणारी मी त्या मैत्रिणींमध्ये एकटीच वेगळी पडले होते ना!

''एवढ्या साड्या घरात असताना अजून साडी कशाला हवी?'' हा प्रश्न पुरुष नेहमीच बायकांना, बायकोला, आईला विचारतो. या प्रश्नावर माझ्या मैत्रिणीने एकदा उत्तर दिले होते, ''तोंडाला चव येण्यासाठी'' साडीखरेदीने बाईला फिलगुड वाटते, तिला त्यात आनंद मिळतो.

साड्यांची लोकप्रियता लक्षात घेऊन अजूनतरी कुठल्याही दुकानात ''जुन्या साड्या बदलून नवी घ्या'' असा बोर्ड मी बघितला नाही. त्यामुळे जुन्या साड्या बोहारणीला देऊन एखादे इटुकले पिटुकले भांडे घ्यावे

लागते. मोलकरणींना व हाताखाली काम करणाऱ्यांनासुध्दा दिवाळीला वर्षात एकदा साडी घ्यावी लागते. हल्ली घरात बायका गाऊन, झगा घालतात त्यामुळे घरात घालायला वर्षात दोन साड्या हा पुरुषांचा खर्च वाचला. साड्यांवर कमरेपर्यंत लांब ब्लाऊजची फॅशन लवकरच येईल असे मला हल्ली वाटते. मी त्या फॅशनची वाट बघते आहे म्हणजे मी स्वत: खूश होईन. कारण ब्लाऊजचा खर्च व शिलाई खूप असते. आणि ब्लाऊज लवकर फाटतात. शिवाय माझ्या कुटुंबात हल्ली सर्वजणांनी पंजाबी, सलवार खमीस घालायला सुरुवात केल्याने मला एकटी पडल्यासारखे वाटते.

साड्या खरेदीच्या वेळी ‘तानिपिहीनिपाज’ यातील तो रंग नाही तो रंग यावेळी साडीचा  खरेदी करायचा असे बाई ठरवून जाते पण मनात असलेला व पूर्वी घेतलेल्याच रंगाची साडी पुन्हापुन्हा आणते, कारण मनात तो रंग असतो.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सुभेदाराची सून साडीचोळीचा आहेर देऊन सन्मानाने परत पाठवली होती. याचा अर्थ साडीचोळी हा मराठी संस्कृतीचा सन्मानाचा आहेर आहे. लग्नाच्या बस्ताखरेदीत अजूनतरी साड्याच घेतल्या जातात. साडी हाच आपला पारंपरिक पोशाख आहे. देवपूजेला, मंगलकार्यांना समारंभाला साडी नेसली जाते. परदेशी पाहुणीसुध्दा भारतात आल्यावर साडी नेसून बघते. लेखात शेवटी माहेरची साडीच्या गाजलेल्या गीताची आठवण काढते...........

सासरला ही बहीण निघाली भावाची लाडी,

नेसली माहेरची साडी!

मैत्रिणींनो साडी नेसणे सोडू नका, ती आपली भारतीय वेशभूषा आहे. पंजाबी ड्रेस काय, गाऊन काय, सोय म्हणून घालावे तसेच असतात, साडी ती साडीच!

◆◆◆

*With Best Compliments from*



*Chintamani Jewellers*

**Thane- Jambhali Naka, Thane (W)**
**Tel. : 9122 25432241/42/43**

Dombivli- Phadke Road,Dombivli (E)
Tel.: 91251 2470 117/18/19/10

With Best Compliments from

# KHAR PATIL & CO.



**Chirner, Tal. Uran Dt. Raigad**

# सई तुझ्या कुंकवाला....

– शालीन मेनन

***मुलांनी लिहिलेल्या कथा वाचताना मला वेगळाच अनुभव आला. बहुतेक सर्व विद्यार्थी जीवनाकडे आशावादी नजरेने पाहणारे निघाले. त्यांच्या कथेत त्या बाईला प्रभावी औषध मिळाले होते. तिच्या जावयाचे व्यसन सुटले होते. तो नियमित काम करून घरी पैसे आणत होता. घरी सुखसाधने आली होती. मुले डॉक्टर, इंजिनीअर झाली होती.***

''आयुष्य चिंतिते मी परकीच्या पुत्रा,
सई तुझ्या मंगळसूत्रा.''
''आयुष्य चिंतिते मी परकीच्या मुला,
सई तुझ्या कुंकवाला.''

लहानपणी कानावर पडलेल्या मराठी ओव्या तिला माहीत नाहीत. ती आहे केरळ राज्यातील मल्याळम् मातृभाषा असणारी रोमन कॅथालिक ख्रिश्चन मेरीकुट्टी. पण त्या एक तासाच्या बसप्रवासात मला तिचे वर्तन या मराठी ओव्यातील आईसारखे वाटले. आपल्या पोटच्या मुलीच्या सुखासाठी जावयाला दीर्घायुष्य चिंतणाऱ्या आईचे रूप मला त्या केरळी स्त्रीमध्ये दिसले.

माझी सुपर मार्केटमधील खरेदी आटोपून मी बसडेपोत आले तेव्हा दुपारचा १ वाजला होता. त्रिचूर हे केरळमधील मोठ्या शहरांपैकी एक शहर. माझे घर शहराच्या मध्यवर्ती भागापासून सहा-सात किलोमीटर अंतरावर. आमच्या भागात दुकाने असली तरी मला माझ्या महाराष्ट्रीय सवयीचा रॉ राईस म्हणजे कोलम, आंबेमोहर, बासमती वगैरे तेथे मिळत नव्हता. म्हणून अधून मधून शहराच्या मुख्य भागातील सुपरमार्केटमध्ये जाऊन तो आणावा लागत असे. या राज्यात लोक उकडा तांदूळ वापरतात. त्यांना कच्चा तांदूळ आवडत नाही. येथे खासगी बस वाहतूक असल्याने बस सहज मिळते आणि आमच्या दारासमोरच बसस्टॉप असल्याने माझे गुडघे सतत संधीवाताने दुखत असूनही आठवड्यातून एखादी फेरी मी सहज करू शकत असे.

त्या दिवशी अन्नाकरा ते कुंडुक्काड व्हाया त्रिचूर या फलकाची बस डेपोत उभी होती. दुपारची वेळ असल्याने गर्दी कमी होती. कंडक्टर मोठमोठ्याने पुकारा करून उतारू जमवत होता. मला सहज जागा मिळाली म्हणून मी खुशीत होती. केरळमधील खाजगी बसमधील गर्दीचा ज्याने अनुभव घेतला आहे त्याला माझ्या त्या दिवशीच्या सुदैवाचा नक्कीच हेवा वाटला असता.

''हे चेरूर व्यसनमुक्ती केंद्र किती दूर आहे हो ?'' माझ्या शेजारच्या बाईच्या प्रश्नाने मी वास्तवात आले. बाई सुमारे साठ वर्षांची असावी. तिने पांढरे मुंड (लुंगी) ज्या पध्दतीने परिधान केले होते त्यावरून आणि गळ्यातील

काळ्या गोफातील क्रॉसवरून ती ख्रिश्चन असल्याचे लक्षात आले. माझी मातृभाषा मराठी असली तरी सेवानिवृत्तीनंतर केरळमध्ये स्थायिक असल्याने तेथील मल्याळम् भाषा समजु बोलू शकते . गोरा रंग, घारे डोळे इत्यादी उत्तर भारतीय वैशिष्ट्ये परमेश्वराने मला दिली नसल्याने मी रूपाने बरीचशी स्थानिक दिसते. वयानेही त्यावेळी तिच्याच वयाची असल्याने बहुधा तिला तिचे मन मोकळे करण्यासाठी योग्य वाटली असावे.



त्रिचूरच्या दक्षिणेकडून आलेल्या त्या बसमधून ती चेरूर या गावी जाण्यासाठी आली होती. माझे उरतण्याचे ठिकाण चेरूरनंतर आहे हे ऐकून तिने मला त्या ठिकाणी असलेले मोठे चर्च आणि चर्चने चालविलेल्या व्यसनमुक्ती केंद्राविषयी विचारले. बसमधून जाताना मी ते ठिकाण अनेक वेळा पाहिलेले होते. त्याच्यासमोरच बस स्टॉप आहे. ती तिच्या गावातील स्टॉपवर बसमध्ये चढली त्यावेळीच कंडक्टरने तिला चर्च स्टॉपवर उतरून देण्याचे आश्वासन दिले होते. खासगी बस असल्याने उतारूंशी सौजन्याने वागणे हा त्याच्या बिचाऱ्याच्या नोकरीचा भाग होता. उतारूंची संख्या घटली आणि बस तोट्यात जाऊ लागली. तर त्याचा मालक त्या मार्गावरील वाहतूक बंद करील आणि कंडक्टरची नोकरी जाईल. याउलट जर ती एस. टी. ची बस असती तर ठरावीक वेळ होताच उतारू नसतानाही बेल वाजवून तो बस घेऊन गेला असता कारण त्याची नोकरी एस. टी.च्या नफ्यातोट्यावर अवलंबून नसती ना ? थोडक्यात कंडक्टरला आपले उतरण्याचे ठिकाण सांगून ठेवल्यावर तो नक्की बस थांबवून या बाईला उतरवेल अशी खात्री होती. तरीही ती माझ्याकडे चौकशी करत होती याला तसेच कारण होते.

मेरीकुट्टी आपल्या मुलीच्या घरी रहात होती. ती स्वत: भाजी विकण्याचा व्यवसाय करायची. केरळ राज्यात ख्रिश्चन लोक इतर अनेक व्यवसायांप्रमाणे भाजीच्या व्यापारातही मोठ्या संख्येने आढळतात. ती आणि तिचा पती दोघेही भाजीच्या दुकानावर मध्यमवर्गीय जीवन जगत होते. एकच मुलगी असल्याने त्यांची थोडीफार बचतही होत होती. मुलीचे लग्न होऊन ती अन्नाकरा गावी गेली आणि दोन वर्षांतच मेरीकुट्टीच्या पतीचेही निधन झाल्याने ती एकटी पडली. आपले छोटेसे घर विकून ती मुलीच्या घरी आली. मुलीचा नवरा मार्बलचे काम करणारा. दिवसाला पाचशे रुपये मिळवणारा कुशल कारागीर होता. दोन्ही नातवंडे अभ्यासात हुशार. त्यांना डॉक्टर, इंजिनीअर करण्याची त्यांच्या आईवडिलांची महत्त्वाकांक्षा होती. जावयाच्या मिळकतीत भर म्हणून मुलीनेही घराच्या अंगणात भाजीचे छोटे दुकान टाकले आणि मेरीकुट्टीच्या सवयीचाच व्यवसाय असल्याने ती मुलीला त्या कामात मदत करू लागली. दृष्ट लागावे असे सुखी, समाधानी कुटुंब होते ते.

पण सुखामागून दु:खे येतातच असा नियतीचा नियम असावा. मेरीकुट्टीच्या बाबतीत तसेच झाले. तिच्या जावयाला इतर कुशल कारागीरांच्या साथीने अधूनमधून दारू प्यायची सवय लागली आणि अखेर तो व्यसनी बनला. चांगली मजुरी मिळत असूनही घरखर्चासाठी पैसे देण्यात तो टंगळ मंगळ करू लागला. आई आणि मुलगी

दुकानाबरोबरच गाडीवरूनही भाजी विकू लागल्या. तरीही मुले भरपूर फी आकारणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जात असल्याने पैसा कमी पडू लागला. बचत वाढण्याऐवजी घटत चालली होती. जावयाचे व्यसन सुटावे यासाठी मेरीकट्टी कोण सांगेल ते उपाय करून पाहत होती. अशा येथील व्यसनमुक्तीकेंद्रात काही प्रभावी औषध मिळते का हे पाहण्यासाठी माझ्या शेजारच्या सीटवरून प्रवास करत होती. आयुष्यात कधीही तिने एकटीने जबाबदारी घेऊन कोणा अपरिचित माणसांच्या भेटी घेऊन कोणतेही महत्त्वाचे काम केले नव्हते. आज प्रथमच ती दूरच्या मोठ्या चर्चमध्ये जाऊन तेथील फादरना आपली कर्मकथा सांगणार होती. आपल्या मुलीच्या सुखी संसारासाठी ही तिची खटपट होती.

आपण जावयासाठी दारूची सवय घालविणारे काही औषध आणण्यासाठी जात आहोत हे ती कोणाशी अगदी मुलीशी ही बोलली नव्हती. न जाणो जर चुकून त्या व्यसनी माणसाच्या कानावर ही गोष्ट गेली तर तो संतापेल, कदाचित बायकोला मारील ही भीती तिच्या मनात होती. ज्या वयात तिच्या बरोबरीच्या स्त्रिया चर्चमध्ये जाऊन नामस्मरण करतात त्या वयात ही बिचारी मुलीचा संसार सुधारण्यासाठी निघाली होती.

बस धावत होती. खासगी सर्व्हिस असल्याने स्टॉप नसल्याठिकाणी ही थांबवून मिळतील तेवढे प्रवासी घेण्यासाठी कंडक्टर धडपडत होता. मी दूरवर दिसणाऱ्या चर्चच्या मनोऱ्याकडे बोड दाखवून तिचा स्टॉप जवळ आल्याचे सांगितले. ती उठली तोच कंडक्टर 'चेरूर चर्च स्टॉप' असे ओरडला. ती उतरली आणि मनोऱ्यावरील बाळ येशूला हातात घेऊन उभ्या असलेल्या मदर मेरीच्या मूर्तीला वाकून अभिवादन करून आतमध्ये गेली. पुढे....... ?

पुढे काय झाले कोण जाणे ! गोष्ट महाराष्ट्रात तर ती तिकडे. तिला तर माझे नावही माहीत नाही आणि मला फक्त तिचे नावच माहीत आहे. पण मदर मेरीच्या मूर्तीसमोर वाकलेली य वृध्द मातेची स्मृती अजून नजरेसमोर आहे.

थोड्या वेळाने माझे घर आले. मी घरी येते तोच माझ्याकडे अभ्यासासाठी येणारी १०वीची मुले आली. परभाषिक राज्यात एकटीने जगताना ही मुले मला वाळवंटातल्या हिरवळीसारखी वाटत. मी त्यांच्याशी मल्याळममधून बोलायचे आणि त्यांनी माझ्याशी इंग्रजीतून असा आमचा 'एकमेका करू सहाय्य' पध्दतीने भाषेचा अभ्यास चालायचा. आज माझे मन मुलीच्या नवऱ्याला व्यसनमुक्त करून मुलीला सुखी करू पाहण्याच्या आईच्या विचाराने व्यग्र होते. मी मुलांना अपूर्ण कथा पूर्ण करण्याचा अभ्यास दिला. ती कथा अर्थातच मेरीकुट्टीची होती.

मुलांनी लिहिलेल्या कथा वाचताना मला वेगळाच अनुभव आला. बहुतेक सर्व विद्यार्थी जीवनाकडे आशावादी नजरेने पाहणारे निघाले. त्यांच्या कथेत त्या बाईला प्रभावी औषध मिळाले होते. तिच्या जावयाचे व्यसन सुटले होते. तो नियमित काम करून घरी पैसे आणत होता. घरी सुखसाधने आली होती. मुले डॉक्टर, इंजिनीअर झाली होती.

१४ ते १५ वर्षे वयाच्या मुलांना जगाचा कितपत अनुभव असतो ? स्वत:ची चूक नसतानाही नशीब माणसाला कठोर शिक्षा देते याची जाणीव कथा लिहिणाऱ्या मुलांना नव्हती. म्हणून त्यांचा आशावादपण जगाचे टक्केटोणपे खाऊन तयार झालेल्या मला आला. ८० व्या वर्षीही मेरीकुट्टीच्या यशाबद्दल शाश्वती वाटत नाही. त्या विश्वमातेने, मदर मेरीने या आईचे जीवन सुखी केलेले असू दे !

◆◆◆

*With Best Compliments from*

# Tycoons Realities LLP



# माझी अमेरिकन मैत्रीण

- राजश्री रामचंद्र खरे

*तिला चालता येईनासे झाले. त्यामुळे पुन्हा तिच्यावर बंधन आले आणि काहीतरी करायला तर पाहिजे म्हणून मग ती पुन्हा शिक्षकी पेशाकडे वळली. झालेल्या घटनेमुळे दु:खी न होता व्हीलचेअरमध्ये बसवून शिकवू लागली. सध्या ती जवळ जवळ ७० वर्षाची आहे.*

विमानतळावर जाण्यासाठी आम्ही गाडीत बसलो आणि रोशलचा फोन आला आम्हाला 'बाय' करण्यासाठी. कसा अगदी आठवणीने वेळेवर फोन केला म्हणून खरोखरच तिचे कौतुक वाटले. काही वर्षांपूर्वी कोणी मला सांगितले असते की एखादी अमेरिकन स्त्री तुमच्या कुटुंबाची मैत्रीण होईल तर मी नक्कीच त्या व्यक्तीला वेड्यात काढले असते. पण विधिलिखित काय असते ते कोणीच सांगू शकत नाही.

'रोशल' तिचे नाव. तिची आणि मुलाची ओळखही योगायोगानेच झाली. अमेरिकेत नुसते शिक्षण अथवा नुसते औषध काम करण्यापेक्षा त्याच्या जोडीने काही सामाजिक कार्य केले ते त्याला अधिक महत्त्व असते आणि तुमच्या वेळेप्रमाणे, आवडीप्रमाणे असे काम करणाऱ्या संस्थाही आहेत. माझा मुलगाही शिकत असताना मदत कारण्यासाठी 'रोशल'कडे जाऊ लागला. पाठीच्या दुखापतीमुळे आणि वय झाल्यामुळे ती अधिक वेळ बसू शकत नाही. त्यामुळे कॉम्पुटरवरचे काम करण्यासाठी मुलगा अधून मधून तिच्याकडे जात असे. कधी ती मुलाकडे येत असे. मुलाचे लग्न झाल्यावरही मुलगा रोशलला मदत करण्यास जात असे. त्यांचे येणेजाणे चालूच असायचे.

मला आठवतेय तिची आणि आमची झालेली पहिली भेट. नाताळचे दिवस होते. नाताळ म्हणजे त्यांचा मोठा सण. आपली दिवाळी तसा त्यांचा नाताळ. ती एकटीच रहात असल्यामुळे तिने आम्हा सगळ्यांना घरी बोलावले होते. मुलाला विचारून आधी आमची नावे पाठ करून ठेवली होती. मुलानेही आम्हाला तिच्याबद्दल बरेच काही सांगितले होते. त्यामुळे ती कशी असेल म्हणून उत्सुकता तर होतीच पण आपण आपसात बोलणार कसे हाही प्रश्नच होता. कारण दोघींना एकमेकींची भाषा कळत नव्हती. आम्ही तिच्या घरी गेलो. दारातच 'हॅलो राजश्री' म्हणून हात पसरून त्यांच्या पध्दतीने मिठी मारून आलिंगन दिले. गालाचा मुका घेतला. मी थोडी संकोचले पण भारावूनही गेले. नंतर तिच्या घरात गेलो. घरात तिच्या आईने केलेली पेंटिंग्ज लावली होती. मुलाच्या मदतीने तिच्याशी गप्पा मारल्या, केक खाल्ला व तिने दिलेले पुढील वर्षाचे कॅलेंडर घेऊन निरोप घेतला. तिने पुन्हा आलिंगन दिले भारावल्या मनाने घरी आलो. नंतर जेव्हा जेव्हा आम्ही अमेरिकेत जातो तेव्हा तेव्हा ती आवर्जून

भेटायला येते. आपला धर्म, आपण मुलांची नावे कशी ठेवतो त्याचे अर्थ काय याची उत्सुकतेने चौकशी करते. अधून मधून फोनवर बोलते. मागच्या एका भेटीत तिची आई गेल्यामुळे ती खूप दु:खी झाली होती. आता ती जवळ जवळ ७० वर्षांची आहे.

मध्यंतरी एक भेटीत सहजच तिच्या शिक्षणाबद्दल विचारले असता ज्या गोष्टी कळल्या त्याने इतके आश्चर्य वाटले की अरे! एखाद्या माणसाचे आयुष्य किती वैविध्यपूर्ण असू शकते. आपण सारेच असे समजतो की अमेरिकेत पूर्ण स्वातंत्र्य आहे. सर्वांना समानतेची वागणूक मिळते पण हे पूर्णपणे खरे नाही, अद्यपही अल्पसंख्याक स्त्रियांना वेगळी वागणूक दिली जाते, स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक देतात इतकेच नव्हे तर स्त्री आणि पुरूष यांच्या पगारातही तफावत केली जाते. पण याची कोणाला जाणीव होत नाही म्हणा अथवा दुर्लक्ष केले जात म्हणा.



रोशलला शालेय जीवनातच याची जाणीव झाली. तिला वाटायचे की मुलीचे जीवन हे काचेच्या बंद खोलीसारखे आहे. आणि या काचा कोणीतरी फोडल्या पाहिजेत. शालेय जीवनातही मुलांएवढी सक्षमता असूनही मुलींना नाकारण्यात येणाऱ्या गोष्टी पाहिल्या की ती अन्यायाने अस्वस्थ होत असे. हे असे का याचे कारण शोधायचा ती प्रयत्न करायची पण या प्रकारचे उत्तर तिला कधीच मिळाले नाही. अन्यायाने ती निराश व्हायची. एवढेच नव्हे तर शालेय शिक्षण झाल्यावरही तिच्या लक्षात आले की मुलींना करीअर करण्यासाठी फक्त तीनच क्षेत्रे खुली आहेत. एक सेक्रेटरी, दुसरे नर्सिंग आणि तिसरे शिक्षक. यांपैकी तिने शिक्षकी पेशा स्वीकारायचे ठरविले आणि द्विपदवीधर झाल्यावर प्रोफेसर म्हणून कॉलेजमध्ये रुजू झाली परंतु या कामात ती समाधानी नव्हती. काही वर्षांतच ही नोकरी सोडून दिली. प्रवाहाविरुध्द वाहत जाणे अवघड असते पण रोशलने तो मार्ग स्वीकारला. काहीतरी वेगळे करावे या विचाराने ती युरोपमध्ये गेली. तेथे २ वर्ष लहान मोठी कामे करू लागली पण मन अस्वस्थच होते. नंतर जपानमध्ये जाऊन इंग्रजीचे क्लास घेऊ लागली. तेथून जर्मनीत गेली. तेथे बेडपॅन साफ करणे वगैरे सारखी आयाची कामे केली पण मनासारखे काहीच होत नव्हते. पुन्हा अमेरिकेत परतली आणि पुढील शिक्षणासाठी स्कॉलरशिप मिळवून इंग्लंडमध्ये गेली. तेथे १।। वर्ष शिकवण्याचे काम केले. त्यानंतर सायकोथेरपीत पी.एच.डी. करायचे ठरवून त्यात रमली. त्यात तिने चांगली प्रगती केली. फिजिओथेरपी आणि सायकोथेरपीचे क्लास घेतले पण अजूनही मनात कोठेतरी अस्वस्थता होती. काहीतरी वेगळे करायचे होते. केवळ स्त्री म्हणून नाकारण्यात येणाऱ्या क्षेत्रात झेप घ्यायची होती. त्या दृष्टीने कामाचा शोध चालू होता आणि अचानक एक संधी तिच्याकडे चालून आली. कोलोरॅडो येथे रॉकी माऊंटन नॅशनल पार्कमध्ये रेंजर म्हणून नोकरी लागली. मुख्य म्हणजे रेंजर म्हणून काम करणारी ती पहिली स्त्री होती. जपानी भाषेतही तिने प्रावीण्य मिळवले होतेच. शिवाय फ्रेंच आणि साईन लॅग्वेजमध्येही ती पारंगत होती. रेंजर

म्हणजे पार्कच्या सुरक्षिततेची काळजीक घेणारी व्यक्ती. हे काम करत असतानाच ती दुभाषाचेही काम करत होती. हे काम करत असतांनाच वयाच्या ४० व्या वर्षी ती ट्रेकिंगला जाऊ लागली. १० वर्षे ती ट्रेकिंगला जात होती. यवेळेस तिचा बॉयफ्रेंड तिच्याबरोबर असायचा पण अचानक दैव फिरले. ट्रेकिंग करताना तिला जबरदस्त अपघात झाला आणि पाठीचा कणा जबरदस्त दुखावला. इतका दुखावला गेला की ७ वर्षं ती अंथरुणालाच खिळून बसली. तिला चालता येईनासे झाले. त्यामुळे पुन्हा तिच्यावर बंधन आले आणि काहीतरी करायला तर पाहिजे म्हणून मग ती पुन्हा शिक्षकी पेशाकडे वळली. झालेल्या घटनेमुळे दु:खी न होता व्हीलचेअरमध्ये बसवून शिकवू लागली.

सध्या ती जवळ जवळ ७० वर्षांची आहे. पाठीच्या दुखण्याने तिच्यात कायमचे अपंगत्व आले तरी मनाची जिद्द आणि उभारी कमालीची आहे. आता ती वृध्दाश्रमात रहात असली तरीही लोकांवर सायकोथेरपीचे उपचार करते. समुपदेशनाचे काम करते. मुलाच्या घरी यायचे झाले ती छोटे स्टूल घेऊन येते. तिला वजन जराही उचलता येत नाही. ड्रायव्हिंग करत आम्हाला नातवंडांना सर्वांना भेटायला आवर्जून येते घरी, आल्यावर कधी साधे पाणीही पित नाही नातवाच्या वाढदिवसाला येणे नाही जमले तर आठवणीने फोन करते....आणि नंतर जमेल तेव्हा येते. तिच्या भेटीने आणि आलिंगनाने मन भारावून जातेच पण नंतरही कित्येक दिवस रोशल मनात घर करून बसते.

◆◆◆

*With Best Compliments from*

**Shah House**
**Cone ...**

**Malad**

With Best Compliments from

# P. L.
# Osawal
# & Co.

# आम्ही सारे युधिष्ठिर!

- लता लीलाधर बोरोले

***कायदा सरकारने करावा, सुरक्षा पोलिसांनी पुरवावी, न्याय कोर्टाने द्यावा आणि आपण मात्र उठता बसता आईबहिणीवरून गलिच्छ आणि लैंगिक क्रियांचे सूचन करणाऱ्या शिव्या हासडत बसायचे ? केवळ कायद्याने हा विकृतीचा चक्रव्यूह भेदला जाणार नाही. गरज आहे सामाजिक परिवर्तनाची व समाज मनावर सुसंस्कार होण्याची, मन परिवर्तनाची नवी चळवळ रुजविण्याची गरज आहे. स्वत:पासून मनपरिवर्तनाचा - -***

दुसऱ्याच्या डोळ्यांतले कुसळ दिसते, पण स्वत:च्या डोळ्यांतले मुसळ दिसत नाही असे म्हणतात. तसे पाहता आपल्या डोळ्यांत एवढे मोठे मुसळ असल्याने दिसणार कसे ? डोळ्यांत असेल फक्त अंधारच अंधार ! खरे म्हणजे आपण सारेच युधिष्ठिर आहोत. कोणत्याही गोष्टीची आमच्या मनाला जाणीव होत नाही. डिसेंबर २०१२ मधील दिल्लातील सामूहिक बलात्काराच्या घटनेनंतर देशभर आक्रोश झाला. आपण 'आम' भारतीयांनी भावनिक प्रक्षोभाचे ज्या प्रकारे दर्शन घडविले, सर्वसामान्य जनता रस्त्यावर उतरली. मेणबत्त्या पेटवून बलात्कार अमानुष हल्ल्यात बळी पडलेल्या अभागी तरुणीला श्रध्दांजली वाहिली. सरकारही हादरले व कठोर कायद्याचा वटहुकूमही निघाला. असे वाटले होते की इतके घडल्यानंतर आपला समाज बऱ्यापैंकी अंतर्मुख झाला असेल, सामाजिक जाणीव समाजात निर्माण झाली असेल पण कसले काय ? लगेच दुसरी घटना मुंबईत घडली. एका वृत्त छायाचित्रकार म्हणून काम करणाऱ्या २३ वर्षीय तरुणीवर लोअर परळ भागातील शक्ती मिलच्या खिंडारामध्ये सामूहिक बलात्कार केला. मीडियाच्या माध्यमातून तज्ज्ञ मंडळींनी आपापली मते मांडून सरकार, पोलीस यंत्रणा, न्यायालय व राज्यकर्ते यांच्या डोळ्यांतली कुसळे चव्हाट्यावर मांडली, पण आपण सर्व मिळून बनलेल्या समाज पुरुषाच्या डोळ्यांतले दांभिकतेचे मुसळ जाणवलेसुध्दा नाही असेच म्हणावे लागेल. कारण रोज कुठे ना कुठे अशा घटना घडत आहे. कोवळ्या बालिकांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व वयोगटातील, समाजाच्या सर्व स्तरांतील अबला बलात्काराच्या रोज बळी पडत आहेत. काही वर्षांपूर्वी भररस्त्यावरून एका महिलेला उचलून गाडीत घालून अज्ञात ठिकाणी तिच्यावर सामूहिक बलात्कार केला गेल्याची घटना आपण विसरून गेलो आहोत. अशा लाजिरवाण्या असंख्य घटना समाजात घडत असताना आपण युधिष्ठिराची भूमिका बजावत आहोतच ना ?

लोकलमध्ये मुंबईत एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाला. मुंबई सेंट्रलसारख्या भरवस्तीतील बसस्टॉपवर विद्या देसाईवर रॉकेल टाकून जिवंत पेटवून देण्याचा प्रयत्न केला गेला. एका उद्योगपतीच्या दारुड्या व विलासी दिवट्याने कुलाबा येथील स्त्यावरून आईच्या वयाच्या एका वयस्कर महिलेला गाडीत जबरदस्तीने घालून आपल्याच मालकीच्या ओसाड पडलेल्या गिरणीत बलात्कार

केला. श्रीमंताच्या दिवट्याला शासन व्हायला हवं होतं. समाजानेही त्याला जाब विचारायला हवा होता पण झाले उलटेच! केवळ पैशाच्या जोरावर बाकी सर्व समाज गप्प तर राहिला उलट काही तज्ज्ञांनी आपली मुक्ताफळे उधळली की, इतक्या रात्री ही बाई रस्त्यावर काय करीत होती? काही वर्षांपूर्वी थर्टी फस्टच्या रात्री अंधेरीतील भररस्त्यावर आपल्या मित्रांसोबत असलेल्या दोन तरुणींना विवस्त्र करून त्यांच्या शरीराशी अश्लील चाळे केले. काही वर्षांपूर्वी आसाममध्ये चवचाल तरुणांनी एका पंचतारांकित हॉटेलबाहेर एका मुलीला असेच खेळणे बनवून तिच्या शरीराशी खेळले पण त्यांना विरोध करण्याचा प्रयत्न न करता आपण बघ्याचीच भूमिका घेतली नाही का? युधिष्ठिरासारखी मान खाली घालून थिजलेल्या मनाने आपण आपली भूमिका उत्तमपणे वठवित आहोतच ना!



आपल्या आसपास सातत्याने महिलांवर होणारे अन्याय अत्याचार घडत असतात. चारचौघासमक्ष हा प्रकार घडत असताना आपण चारचौघे हाताची घडी घालून बघ्याची भूमिका वठविण्याचे कर्तृत्व गाजवत असतो. ठाण्यामध्ये गुंडांनी घेरलेली एक असहाय्य तरुणी मदतीची याचना करत असताना आपण बघ्याची भूमिका अशीच मनोभावे वठवून आपले कर्तृत्व सिध्द केले आहे. एवढेच कशाला, रोजच रेल्वे स्टेशन, बसस्टँड, रस्त्यावर होणाऱ्या छेडछाडी आणि मवालीगिरीच्या प्रसंगांतही जणू काही बघितलेच नाही अशा पध्दतीने वागण्याची सवय आपण स्वत:ला पध्दतशीरपणे लावूनच घेतलेली आहे. मुली–महिला यांना भयमुक्त वातावरण तयार करण्याची मूळ जबाबदारी फक्त पोलीस यंत्रणा व सरकारचीच आहे का? आपली काहीच जबाबदारी नाही का? गृहिणी किंवा शालेय विद्यार्थिनीदेखील घरात, समाजात किंवा नेहमीच्या ठिकाणी सुरक्षित आहेत असेही चित्र दिसत नाही. तेव्हा शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी महिला तरी संघटित होण्याचा प्रयत्न करतानाही दिसत नाही. संरक्षणाचे धडे गिरवताना का दिसत नाहीत?

अमरावती येथे सातत्याने होणाऱ्या छेडखानीला कंटाळून एक चौदा वर्षीय मुलीने आत्महत्या केली. याप्रकरणी दोघांविरुध्द आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला. तिने स्वत:च जीवनयात्रा संपविली तर येथील दुसऱ्या घटनेत युवतीला नियतीने मुक्त केले. ही युवती पोलिओग्रस्त होती. ती बोलूही शकत नव्हती. एका नराधमाने धाक दाखवून तिच्यावर सातत्याने अत्याचार केला. ती गर्भवती राहिली. उपचारार्थ तिला स्त्री रुग्णाललयात दाखल केल्यावर तिचा व तिच्या बाळाचा मृत्यू झाला. प्रकरण उघडकीस आले तेव्हा तिच्या वडिलांनी गळफास लावून

आत्महत्या केली होती. वाशिम जिल्ह्यातील अडोळी येथील अंध विद्यालयातील मुलीवर शिपायाने सातत्याने अत्याचार केला. ती जन्मांध. शाळेत शिकायला मिळेल. आयुष्य घडेल. स्वत:च्या पायावर उभे राहता येईल, या आशेने व विश्वासाने ती शिकायला गेली पण शाळेच्या शिपायाने तिचे आयुष्य उद्ध्वस्त केले. एवढेच नव्हे तर उन्हाळ्यात सुट्टीत ती गावी घरी आली असता आतेभावानेही तिच्या अत्याचार केल्याचे तिने सांगितले. नागपूर जिल्हा अंबाडा तालुक्यातील सर्वोदय विद्यालयातील एक शिक्षकाने विद्यार्थिनीवर अत्याचार केला. शिक्षक-विद्यार्थ्यांमधील विश्वासाच्या नात्याला मूठमाती देणारी घटना उघडकीस आली. शारीरिक व्यंगाचा गैरफायदा घेऊन सहा युवकांनी एका मतीमंद मुलीची आक्षेपार्ह व्हिडीओक्लीप काढली. चंद्रपूर जिल्हात वादातून घर सोडलेल्या एका युवतीच्या भावनेचा फायदा घेत एकाने तिच्यावर अत्याचार केला. तिने त्याच्यात मानसिक आधार शोधला त्यानेच विश्वासघात केला. मन बधीर करणाऱ्या विश्वासाच्या नात्यावरच अत्याचार करणाऱ्या या घटना समाजात घडत असताना समाजपुरुषांनी बघ्याचीच भूमिका घेतली. खरे पाहता महिलांनीच आता पेटून उठले पाहिजे. महिला संघटनांनी, महिला आयोगांनी महिलांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी व त्यांच्यावरच्या अन्यायाचे निवारण करत त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी सक्षमपणे कार्य करण्याची गरज आहे. महिला आयोग, महिला संघटना यांनीही कार्य करण्याची गरज आहे. महिला आयोग, महिला संघटना यांनीही युधिष्ठिराची भूमिका घेतलेली दिसून येत आहे. अपहरण स्त्रियांची हिंसा, विनयभंग, बलात्कार इ. अपराधांचे वाढते प्रमाण हा सार्वजनिक चिंतेचा विषय झाला आहे.

दिल्ली, मुंबईसारख्या घटनेसाठी अश्रू गाळणाऱ्या कित्येक तरुणी, महिला स्वत: लोकल ट्रेनमध्ये प्रवास करताना महिलांच्या डब्यात उच्छाद मांडणाऱ्या टोळधाडांनी, मवाल्यांना ठणकावण्याचे धाडस किती करतात ? ठणकावणे तर सोडाच पण क्वचित एखादी कुणी बोललीच तर इतर महिला तिला किती साथ देतात ? अन्य साऱ्या महिलांचे अलिप्त वर्तन असते. प्रवास करणाऱ्या किमान १०० ते १५० महिला असताना टगेगिरी, मवालीगिरी करणारी केवळ तीन-चार माणसे असू शकतात हे वास्तव नाकारून चालणार नाही. या महिलांपैकी बहुसंख्य महिला शिक्षित, समजदार व सक्षम महिला असतात मग त्या बघ्याचीच भूमिका क वठवितात ? याचा विचार महिला का करीत नाही. नुकतीच एक घटना बांद्रा स्टेशनवर घडली. महलांची छेड काढणाऱ्या दोन तरुणांना महिलांनी थोबाडले व पोलिसांच्या ताब्यातही दिले. या घटनेपासून महिलांनी बोध घेण्याची गरज आहे. खरे पाहतां पुरुष हा अतिशय भित्रा व घाबरट असतो. पण महिलांच्या बघ्याच्या भूमिकेमुळे तो छेडण्याचे धाडस करू शकतो. पण वेळीच महिलांनी सजग राहून संघटितपणे विरोध केला तर इतरांचेही सहकार्य त्यांना लाभू शकते.

महिलांनी स्वरंक्षणाचे मार्ग कोणकोणते स्वीकारावेत याबाबात अनेकांनी वेगवेगळ्या गोष्टी सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. त्यात मिरची पूड, बॉडी स्प्रे, रिव्हॉल्वर, संरक्षक चप्पल इ. वस्तूचा वापर करावा. महिलांनीच प्रतिकार करायला शिकले पाहिजे असे सार्वमतही व्यक्त झाले. पण चार माणसांत वस्त्रहरण होत असताना माणसे बघ्याची भूमिका वा युधिष्ठिराची भूमिका बजावत असतील तर या महिलांनी हिंमत कशी व कोठून आणावी याबाबत कोणीही बोलत नाही. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे मुलींना प्रतिकार शिकवण्यात आघाडीवर असलेला समाजपुरुष

मूळात बाईवर आक्रमण करू नका असे मुलांना व पुरुषांना बजावताना मात्र दिसत नाही. समाजात विकृतीचा विटाळ निर्माण झाला आहे. नजरेने होणारे बलात्कार समाजात घडत असतात आणि भीड चेपली की उरलेले काही प्रत्यक्ष शरीरावर होतात. दांभिकता आणि भंपकपणाचा इतका कळस आपण गाठतो ही आपल्या नजरांचा निर्जीव वस्तूमध्येही लैंगिक क्रिया दिसू लागतात. आपल्या इंद्रियाला 'सुख' ओरबडून घेण्याची सवय लागते. मुळात एक व्यक्ती म्हणून स्त्रीला प्रतिष्ठा प्राप्त कारून देण्याचे आव्हान पुरुषप्रधान संस्कृतीतही आहे. प्रत्येक व्यक्ती स्वायत्त आहे आणि तिचा तसा सन्मान केला गेला पाहिजे हे तत्त्व रुजविण्यासाठी समाजाच्या व्यवहाराचा भाग होण्यासाठी सर्वांगीण प्रयत्नांची गरज आहे. असे प्रयत्न झाले तरच स्त्रियांवरील अत्याचार रोखता येईल. आजच्या समाजपुरुषांना कळते पण वळत नाही. मायकेल क्रॉस ही अमेरिकेतील शिकागो विद्यापीठातील विद्यार्थिनी अलीकडेच भारतात आली होती. त्या मुक्कामात तिला अनेक वेदनादायक अनुभव आले. 'इंडिया दि स्टोरी यू नेव्हर वाँटेड टू हिअर' या मथळ्याखाली तिने 'रोझचास्म' या टोपण नावाने लिहलेल्या अनुभव कथनाने जगभरात भारतीयांची मान शरमेने खाली गेल्याशिवाय राहणार नाही. भारतात वेगवेगळ्या ठिकाणी वावरताना वासनांध पुरुषांच्या नजरा, नको असलेल्या स्पर्शाचा होणारा भाग कसा सहन करावा लागला याची वेदना तिने सोशल मीडियावर व्यक्त केली आहे. 'पर्यटनासाठी स्वर्ग असलेल्या भारत महिलांसाठी नरक आहे.' या निष्कर्षाप्रत मायकेल क्रॉस का पोचली हे समजणे आपल्याला अवघड नाही. तिचे म्हणणे सत्य नाही हे छातीठोकपणे कोणतीही भारतीय व्यक्ती म्हणू शकणार नाही. हे वास्तव आहे ते नाकारून तरी कसे चालेल!

बलात्कारी व्यक्तींना फाशीची शिक्षा झाली या घटनेमुळे समाजाला जरब बसेल असे मत अनेक तज्ज्ञांनी व्यक्त केले. केवळ कायदे करून कठोर शिक्षा देऊनही महिलांवरील अत्याचार खरोखरीच कमी झाले का? बलात्कारी व्यक्तींना फाशी देऊन बलत्कार कसे थांबतील! बलात्कार प्रथम मनात निपजतो. तेथेच त्याची छाटणी कोण व कशी करणार ? आपण फक्त बघ्याचीच भूमिका वठविणार आहोत का ? कायदा सरकारने करावा, सुरक्षा पोलिसांनी पुरवावी, न्याय कोर्टाने द्यावा आणि आपण मात्र उठता बसता आईबहिणीवरून गलिच्छ आणि लैंगिक क्रियांचे सूचन करणाऱ्या शिव्या हासडत बसायचे ? केवळ कायद्याने हा विकृतीचा चक्रव्यूह भेदला जाणार नाही. गरज आहे सामाजिक परिवर्तनाची व समाज मनावर सुसंस्कार होण्याची, मन परिवर्तनाची नवी चळवळ रुजविण्याची गरज आहे. स्वत:पासून मनपरिवर्तनाचा – – – – हे चित्र बदलले पाहिजे ते बदलण्यासाठी ज्यांना तसे वाटते त्यांनी स्वत:पासून सुरुवात करावी.

◆◆◆

## वाईट संगत

बायको–अहो रात्री तुम्ही तुमच्या खोलीत अगदी तर्र होऊन पडला होतात.

नवरा–काय सांगू तुला, हा सगळा वाईट संगतीचा परिणाम!

बायको–म्हणजे हो काय ?

नवरा–अगं, काल रात्री माझ्याबरोबर सहा मित्र होते आणि बाटल्याही सहाच.पण पाच जण पिणारे नव्हते.

**– सुप्रिया दळवी**

# काटेरी गुलाब

- पुष्पा गोपिनाथ लंकेश्वर

*मनाचा विचार करायला हवा नाही का ? बालवयातल्या कोमल बालिका ह्या किशोरवयीन झाल्यावर, त्यानंतर प्रौढावस्था प्राप्त झाल्यावर त्यांचा विवाह होऊन त्यांच्या गृहिणी अवस्थेत काय दैवगती असेल याचे कधी मनातही आलेले नसते. अशा बालिकांचे मन किती विदीर्ण होऊ शकते हे या कथेत जाणून घेऊ या !*

असं म्हटलं जातं की, मनुष्य प्राणी म्हणा अगर एखादा जीवजंतू म्हणा त्याला कठीण समस्येतूनच जावे लागते. ''दु:खाची दरी ओलांडल्याशिवाय सुखाची हिरवळ लाभत नाही'' हेच खरे या सर्व गोष्टींचा विचार करताना अनेक अडचणींना, समस्यांना तोंड देणाऱ्या स्त्री मनाचा विचार करायला हवा नाही का ?

बालवयातल्या कोमल बालिका ह्या किशोरवयीन झाल्यावर, त्यानंतर प्रौढावस्था प्राप्त झाल्यावर त्यांचा विवाह होऊन त्यांच्या गृहिणी अवस्थेत काय दैवगती असेल याचे कधी मनातही आलेले नसते. अशा बालिकांचे मन किती विदीर्ण होऊ शकते हे या कथेत जाणून घेऊ या!

मी एक शिक्षिका आहे. शिक्षण संस्कारमय देण्याची माझी सतत धडपड असे. मी मुलांच्या मनाचा नेहमी विचार करायचे. विशेषत: मुलींच्या कोमल भावनांचा विचार करणे हा माझा जणू छंदच होता.वर्गातील, शाळेतील सर्वच मुलींच्या पालकांविषयी, त्यांच्या घरातील व्यवहारांविषयीच्या नोंदी ठेवायला मला आवडे. मी ज्या खेड्यात नोकरी करायचे त्या गावाची लोकसंख्या जेमतेम २ हजारांची असायची. त्यामुळे माझ्या मुलीच्या शिक्षणासाठी आम्हाला तालुक्याच्या गावी राहावे लागत असे. त्याकाळी वाहनांची सुविधा नसायची. शाळेत सकाळी ७।। वाजता हजर राहावे लागायचे व संध्याकाळी ५।। नंतर घराकडे परतायला वाहन मिळत नसे. दुबार पध्दतीची शाळा सकाळी ७।। ते ११।। व २।। ते ५।। या वेळेप्रमाणे १०।। नंतर मध्यंतरीच्या काळात शाळेतच थांबून मुलांना जमवून त्यांच्यावर संस्काराप्रत काही चांगल्या गोष्टी रुजवण्याचा नित्य नियम केला. मध्यंतरीच्या वेळात बाईंशी गप्पा मारण्यासाठी काही मुले यायची व मनमोकळे सुसंवाद साधायची. अशी एक मीरा नावाची चिमुकली बोलल्या डोळ्यांची मुलगी माझ्याशी फार मिसळून गेली.

वयाने लहान पण बोलायची मात्र फारच समंजस बाईसारखी अतिशय होतकरू हुशार सालस सुस्वभावी अशी ही मीरा इ. ५वीत माझ्या हाताखाली शिक्षण घेऊ लागली. जेवणाच्या सुट्टीत घरी जाऊन जेवण करून माझ्या भोवती रुंजी घालायला हजर रहायची. अभ्यासाविषयी शंका विचारायची. आपल्या टिपिकल बोलण्याने माझे मन तिने केव्हा जिंकले ते कळलेच नाही. माझ्या तोंडी घरी दारी मीराचेच नाव असायचे.

मीरालाही माझ्याशिवाय करमायचे नाही. मी माझ्या घरी जाण्यासाठी निघाले की ती घरी दप्तर ठेवून मला पोहचवण्यासठी स्टँडवर हजर असायची. येताजाता इतर मुले म्हणायची पहा बाईंची लाडकी मीरा कशी बसली बाईंसोबत. एसटीची वाट पाहून कंटाळलेली मीरा मला म्हणाली, आज मॅडम तुम्ही आमच्या घरीच रहा पाहू. मी तुमची मुलगी ना मग माझ ऐका बरे. तिचे म्हणणे मला पटे पण माझी छकुली घरी वाट पाहत असेल याचे मला भान होते. मीराच्या आईवडील माझ्याकडे आले व म्हणाले, बाई तुम्ही आमच्याकडे असलेल्या छोट्याशा रूममध्ये विश्रांती घेत जा व गाडी वेळेवर न आल्यास त्याच रूममध्ये राहत जा. आमची मीरा तशा तुम्हीही. आम्हाला मुलीसारख्याच आहात, खरोखर ग्रामीण भागात सर्व्हिस करताना असे सद्‌हृदयी माणसे मिळाली. त्यांच्या या सहकार्यामुळे माझे पती खूश झाले व त्यांचे टेन्शन कमी झाले.

बघता बघता मीरा आता सातवीच्या वर्गात शिकू लागली. प्रत्येक वर्गात चांगले मार्क मिळवल्यामुळे आईवडील खुश होते. घरात आईवडील मोठा भाऊ, मोठी बहीण असा परिवार असायचा मीराचा. घरातील सर्व लोक शेतातील कामासाठी जायचे. आई आजारी असल्याने मीरालाच घरातील सर्व कामे करून शाळेत जावे लागायचे. मीरा घरातील सर्व व्यवस्थित कामे करून आम्ही दोघी शाळेत येत असू. आमची प्राथमिक शाळा १ ते ७ वीपर्यंतचीच होती. सातवी पास झाल्यानंतर ५ ते ६ कि. मी. अंतरावर असलेल्या गावी मीराला हायस्कूलला जावे लागणार होते. तिला इ. ७वीच्या परीक्षेनंतर खूपच चांगले गुण मिळाले. वर्गात तिचा १ ला नंबर आला. शिष्यवृत्ती परीक्षेतही ती पास झाली. नशिबाचे तारे चमकू लागले होते. आईवडिलांनी तिला परगावी हायस्कूलच्या शिक्षणासाठी जाण्याची परवानगीही दिली. मीरा अतिशय आनंदी होती. हायस्कूलमध्येही ती चांगली चमकू लागली. घरची सारे कामे वेळेत करून शाळा गाठू लागली पण छे: माणसाच्या आयुष्यात आणि ह्या स्त्री जीवनात काय अडचणी येतील ते विचारू नका. मीराच्या आईचा आजार दिवसेंदिवस वाढतच चालला. मीरा आईची सेवा करता करता क्षीण झाली. तिचे शिक्षण अर्धवट होण्याचे चिन्ह दिसू लागले. दैव फिरले की सर्व अनुचित घडते तसे झाले. मीरा गुलाबाच्या फुलासारखी टवटवीत होती. ती आता फार कोमेजून गेली.

आता मात्र वडिलांनी मीराला शाळेत जाण्यापासून थांबविले. मीरा जरी हायस्कूलला जात होती तरी प्राथमिक शाळेचे बंध तिने कधी तोडले नव्हते. माझ्याजवळ ती येऊन मला सर्व गोष्टी शेअर करायचीच. आजचा वृत्तांत सांगताना ती खूप हमसाहमशी रडू लागली. म्हणाली मॅडम माझ्य सर्व इच्छा आकांक्षाला तडा गेला हो ! आता माझे शिक्षण संपलेच आहे. माझे सर्व ध्येय आता धुळीस मिळाले. मी आता काय करू मॅडम. मी तिला खूप समजवण्याचा प्रयत्न केला पण तिच्या मनाचा बांध खूप प्रभावीपणे फुटला. तिला आवरणे मला थोडे जिकिरीचे झाले कशीबशी ती सावरली पण सतत ती बावरल्यासारखी वावरू लागली. आईला तिची अवस्था पाहवत नव्हती पण हतबल झालेली आई तिच्या पाठीवरून हात फिरवण्याशिवाय काहीच करू शकत नव्हती. मी मीराच्या वडिलांना तिच्या शिक्षणाबाबत परोपरीने समजावले पण त्यांच्या डोक्यात आणखी एक कुविचारांचे भूत थैमान घालत होते. मुलींना परगावी शाळेत पाठवल्यानंतर त्या स्वैराचाराने वागतात. हायस्कूलमध्ये मुलामुलींना फ्री वातावरण असते त्यामुळे मुले गैरफायदा घेऊन मुलींना डिवचतात. या ना अशा गोष्टींचा मीराच्या

वडिलांनी फारच धसका घेतला. मीरा असे वावगे वागणारी मुलगी नाही. असे परोपरीने त्यांना समजावले पण मीराचे वडील ठामच राहिले. त्यांनी आता तिच्या लग्नाकरिता स्थळे पाहायला सुरुवात केली. एवढ्या कोवळ्या मुलीला दुसऱ्याच्या दावणीला बांधून तिचा छळ पाहावयाचा का ? असे त्यांना सांगितले. मुलीच्या बाबतीत लग्नाचा विचार १८ वर्षांनंतरच व्हायला हवा, मुलाचे वयही २१ वर्षे पूर्ण पाहिजे. त्याही गोष्टी त्यांना स्पष्ट केल्या. मीराच्या वडिलांचा निर्णय पक्का झाला होता. तिची आई रडण्यापलीकडे काहीच करू शकत नव्हती.



घराचे वासे फिरले की, घरही फिरू लागते असे म्हणतात ते काही खोटे नाही. १ वर्ष विनाकारण मीराचे वाया गेले. घरकाम आईची सेवा यातच तिच्या बुध्दीवर गंज चढला. त्या काळात वडिलांनी एक स्थळ शोधून आणले. ग्रामीण भागात शेतीला फार महत्त्व त्यात ती बागायती शेती असेल तर सोन्याहून पिवळे. असेच स्थळ मीरासाठी वडिलांनी मिळवले. मुलगा १२ वी पास, घरी ५ ते ६ दुभती जनावरे, दोन खिलारी बैले आणि टोलेजंग वाडा अशा वेलसेटल मुलगा त्यांनी जावई म्हणून पसंत केला. मुलीला मुलगा पसंत असेल का ? त्याचे वर्तन कसे, घरात मुलीला स्वातंत्र्य मिळेल का ? केवळ चूल आणि मूल हेच मीराला आयुष्यभर करावे लागेल का ? बघता बघता मीराने भावी नवऱ्याबरोबर संसाराल सुरुवात केली. तिच्या आशा आकांक्षा धुळीला मिळाल्या. स्त्री कितीही शिकली, उच्च पदावर गेली तरी रांधा वाढा, उष्टी काढा या तिच्या जणू पाचविलाच पुजलेल्या गोष्टी आहेत. त्याला मीरा कशी अपवाद असेल. मीराला घरात राहून सर्व वस्तू उपलब्ध होत होत्या पण स्वातंत्र्य नव्हते. नवऱ्याशी जेमतेम बोलणे. सतत काम करणे हेच तिला माहीत होते. घरात सासू बोले सर्व हले अशी स्थिती होती. नवरा शेतातील घाण्याचा बैल डोळ्यावर झापड लावलेला. आपली बायको किती कष्ट करते. ती वेळेवर जेवते की नाही याचे त्याला काहीच वाटत नव्हते. घरातील वयोवृध्दांना व नवऱ्याला मीराच्या मातृत्वाची ओढ लागली. मातृत्वाला योग्य असे मीराचे वयही नव्हते पण वंशाला दिवा हवा ना या आशेने सर्व तिच्याकडे पाहू लागले. दैवालाही ते मान्य असावे की काय मीराला मातृत्वाची चाहूल लागली. तिला कन्यारत्न झाले. आईवडिलांनी माहेरी नेऊन तिच्या सर्व हौशी पुरवल्या. मुलीच्या जन्माने सासरची मंडळी थोडी नाराज झाली. मुलगी दोन्ही कुळाची उध्दारकर्ती हे त्यांना कुठे माहीत. त्यांना फक्त हवा होता वंशाला दिवा.


मीरा माहेरी होती तरी तिच्या डोक्यातून सासरच्या चार भिंतीतलं पारतंत्र काही केल्या जात नव्हतं. आपलं आयुष्यच आता विनामूल्य झालं असं सारखं तिला वाटू

लागलं. १। वर्षाची मुलगी झाली. आजी आजोबांनी थाटात बारस करून तिचं नाव मनू ठेवलं. मीरा आता सासरी निघाली खरी पण मनं माहेरच्या उंबरठ्यातच अडखळत होतं. तिचा नाइलाज होता. तिला त्या घरी जावेसे वाटत नव्हते. मुलीचा संभाळ करून घरातील सर्व जबाबदाऱ्या पार पाडतांना मीराची दमछाक होऊ लागली. मुलीचे कोडकौतुक तर दुरच पण मुलगी जन्माला आली याचे दु:ख सासूला. त्यामुळे मीराचा छळ सुरू झाला. मीराची शारीरिक व मानसिक स्थिती खूपच खालावली. तिचे मन स्थिर राहिना व अशा अवस्थेत ती मनोरुग्ण झाली. माहेरी ही बातमी कळाली मग वडील तिला व मुलीला घेऊन घरी आले. चांगल्या डॉक्टरांना दाखवले व उपचार सुरू केले. डॉक्टरांनी तिला सासरी न पाठवण्याचा सल्ला दिला व कसोशीने उपचार केले. काही दिवसांनी ती पूर्ववत झाली. वडिलांनी समाजाच्या भीतीमुळे पुन्हा तिला सासरी पाठवले. पुन्हा पहिले पाढे पंचावन्न सुरू झाले. आता मात्र मीरा बंड करून उठली. सासूच्या जाचाला व नवऱ्याच्या अरेरावीला न जुमानता माहेरचा रस्ता धरला. दिवसामागून दिवस गेले. मीराला आता मुलीची आठवण व तिचा विरह जाणवू लागला. आता वडिलांना त्यांच्या चुकीची पूर्ण जाणीव झाली पण त्यांना मुलीला सासरी पाठवून गमवायची नाही ही मनोमन जाणीव झाली. त्यांनी तिच्या सासरच्या लोकांवर तुळशीपत्र ठेवले. समाज काय म्हणेल याची तमा न बाळगता तिला घरात मानाची वागणूक दिली. तिच्या औषधोपचारावर आज १० ते १२ वर्ष पैसा खर्च केला. हार न खाता धन्य ते मीराचे माता पिता की ज्यांनी आपल्या मुलीला नवा जन्म दिला.

गुलाबासारखी टवटवीत मीरा पण काटेरी विळख्याने कोमेजून गेली. ही बिचारी मीरा आता धाडसाने उभी राहिली व मी जे सोसले ते माझ्या मुलीने सोसू नये असे म्हणून मुलीसाठी कासावीस होऊ लागली व तिच्या भविष्याची चिंता करू लागली. सध्यातरी तीच स्वत: वडिलांच्या जिवावर भार असताना मुलीचा भार वडिलांवर कशी टाकू शकते. असं म्हणतात मुलगा आईवडिलांच्या म्हातारपणाची काठी असते पण नाही. मीराने हे सिध्द करून दाखवले की मुलगीच खरी माता पित्याची आधार बनू शकते.

अशा या मीराला गावातील सर्वच खूप मान देतात की, खूप हालअपेष्ट सोसूनही आईवडिलांचा आधार बनली व एक आदर्श सर्वांना घालून दिला.

◆◆◆



# माझी काकू आजी

- मधुरा केळकर

***आजीचे माहेर गुहागरचे. पूर्वी ती अधून मधून माहेरी जायची असे मी ऐकलेले. पण काळाच्या ओघात नात्यांतला ओलावाही कमी होत गेला असावा. आणि मग माहेरचे घरही परके झाले. ती कधीच फारशी त्याच्याविषयी बोलायची नाही कारण तिच्या जगण्याचे तत्त्वज्ञानच निराळे होते.***

आज माझ्या आजीला जाऊन एक वर्ष झाले पण अजूनही तिचे अस्तित्व जाणवत राहते. त्यामुळे ती माझ्यापासून लांब गेली किंवा दुरावली आहे असे वाटत नाही. देहाचा विनाश झाला पण आत्मा अमर असतो आणि आत्माचे अस्तित्व आठवणींच्या रूपात समोर येते.

आजीशी जोडलेल्या अशा कितीतरी मायेच्या, प्रेमाच्या आठवणी आहेत. ही माझी आजी, ही खरं तर माझ्या आईची काकू म्हणजे तसे म्हटले तर दूरचे नाते! आणि आजोळी गेल्यावरच सहवास घडायचा पण तिने आपल्या मायेच्या पांघरूणात सगळ्यांना गुरफटून घेतले होते.

असे म्हणतात की, जो स्वत: सुखी असतो तोच दुसऱ्यांना सुख देऊ शकतो पण आजीच्या वाटेला मात्र कुठलेच वैयक्तिक सुख आले नव्हते. संसार, अपत्य अशा सर्व लौकिक सुखापासून ती जन्मभर वंचित राहिली होती. तरीसुध्दा ती आम्हाला कधी दु:खी दिसली नाही. दुसऱ्यांना सुख लाभेल असेच नेहमी तेच वागणे , बोलणे असे. आजी नेहमीच शांत असायची. कधीच चिडचिड, आदळआपट असे करताना मी तिला कधी पाहिले नाही.

त्या काळाच्या रुढींप्रमाणे किशोर वयात लग्न झालेले आणि त्यानंतर लगेचच अकाली पती निधनाचा चटका बसलेला. पदरी ना शिक्षण ना अर्थाजनाचे काही साधन पण एकत्र कुटुंबाच्या आधारावर आयुष्य जगणे क्रमप्राप्त होते. कर्वे कुटुंब तसे सुखवस्तू असल्याने डोक्यावर छप्पर आणि दोन वेळचे जेवण ह्याची फारशी चिंता नव्हती. पण तरीही ऐन तारुण्यात वैधव्य भाळी लिहिलेले वैवाहिक जीवन पूर्णपणे अनुभवयाच्या आधीच वैधव्य आल्याने पोटी मूल-बाळही नाही. पण तरीसुध्दा कालांतराने एकत्र कुटुंबातील सर्व पुतणे-पुतणींची ती आई झाली. जन्मदात्री नसली तरी सर्व मुलं तिला आईच्या ठिकाणी पाहत. सगळ्यांचे दुखणे-खुपणे, तहान-भूक, हट्ट-लाड पुरवणारी हक्काची 'मोठी काकू' होती ती.

मला तिचे अंतरंग आजही पूर्णपणे उलगडले नाही. स्वत:च्या हक्काचे म्हणावे असे काहीच नसताना ( ना नवरा, ना मूलबाळ) दुसऱ्यांना एवढे भरभरून प्रेम, माया कशी काय देऊ शकली ती ? प्रेम, माया करण्याचे व्रतच जणू काही तिने घेतले होते . ती म्हणायची 'मी एक सन्याशीन आहे.' हा संन्यास चार भितींतल्या घरात राहूनच

घेतलेला पण संन्यास चार भिंतीतल्या घरात राहूनच घेतलेला. पण संन्यास होता तो 'काम, वासना , अपेक्षा व मानअपमान' ह्या भावनांपासून घेतलेला. अर्थात ही सारी तपश्चर्या काही वर्षांपासून चालत आली असणार कारण माझ्या ह्या साऱ्या आठवणी आहेत. त्या आजी ६०/६५ वर्षांची असल्यापासूनची. त्याआधी आपल्या आयुष्यात ती बऱ्याच कौटुंबिक वा सामाजिक आव्हानांना सामोरी गेली असणार. ती कधी त्याच्याविषयी आमच्याशी बोलली नाही. अगदी आम्ही मोठे झालो, लग्न होऊन आईबाबा झालो तरीही तीने कधी आमच्यापाशी अशा गोष्टी व्यक्त केल्या नाहीत. मुळामध्ये तिच्या आयुष्याविषयी तक्रारीचा सूर किंवा कुरकुर नसे. एवढे दुर्दैव नशिबी आल्यानंतरही तिने कधी कुणाकडे आपलं दु:ख उगाळळेले मी कधीच ऐकले नाही. सगळे पोटात ठेवण्याची एक दैवी शक्तीच जणू तिला मिळालेली. ह्याला सहनशक्ती म्हणावे का? पण सहन केल्यावर कित्येक व्यक्तींमध्ये त्या दु:खाचा कडवटपणा झिरपतो. तसे आजीचे नव्हते. तिच्या सहवासात आलेली कुठलीही व्यक्ती हे सांगेल की प्रत्येकाला तिच्याकडून प्रेम, माया, आपुलकी, आधार हेच मिळाले.



कुटुंबात किंवा आसपासच्या कोणाकडेही काही कौटुंबिक संकट किंवा अडचण आली की आजी तिथे खंबीरपणे उभी असे. स्वत:च्या आयुष्यातील मोठी संकटे पचवून ती मनाने कणखर झाली असावी. कुठल्याही परिस्थितीत ती स्वत:चा तोल जाऊ नाही द्यायची पण कणखर मन ताठर झाले नव्हते.

म्हणूनच जेव्हा माझ्या मावशीच्या यजमानांचे आकस्मित निधन झाले तेव्हा आजी तिच्या पाठीशी उभी होती. स्वत:च्या वयाची साठी /पासष्टी उलटली असतानाही ती रोज रात्री मावशीच्या सोबत तिच्या घरी राहिला जायची. त्या परिस्थितीत तिला एकटे वाटू नये म्हणून माझ्या दुसऱ्या एका मावशीच्या लहानपणीची एक गम्मत सांगतात. ती लहान असताना आपल्या आईकडून वेणीफणी करून घेतल्यावर त्या घट्ट बांधल्या म्हणून रडायची. मग त्या वेण्या सोडून मोठ्या काकूंकडे येऊन परत आपल्या वेण्या घालून घ्यायची आणि माझी आई म्हणे लहानपणी रात्री नीट जेवायची नाही आणि मग मध्यरात्री भूक लागली की आपल्या ह्या मोठ्या काकूला उठवून रोज दूध-साखर-पोळी खायची म्हणजे अगदी बारीक-सारीक गोष्टीतही ह्या मुलांना आपल्या आईपेक्षाही जवळची 'मोठी काकू' होती. स्वत: आई होऊ न शकलेली पण तरीही 'आईपण' यथार्थ पणे निभावू शकलेली.

आजीकडे कलेचे ही एक अंग होते. ती शिवणकाम उत्तम शिवायची. तिला तिच्या पतीकडून मिळालेला एकमेव

वारसा किंवा ठेवा म्हणजे त्यांचे शिलाईचे मशीन व शिवणकाम. आजोबा शिलाई मास्तर होते आणि त्यांच्यानंतर आजीपण शिवण शिवत राहिली. बाळंतविडा आणि लहान मुलांचे कपडे शिवणे ह्यात तिचा हातखंडा होता. अगदी माझ्या आईच्या झबल्या–टोपऱ्यापासून माझ्या मुलांच्या कपड्यांपर्यंत तिने सर्व शिवले आहे शिवणकाम हे तिच्या उपजीविकेचेही साधन होते. एकत्र कुटुंबात जगण्याला प्राथमिक गरजा जरी भागवल्या जात होत्या तरीही शिवणकामातून तिची स्वत:ची अशी काही मिळकत होई. आता मला वाटते 'शिवणकाम' हे तिच्या हरवलेल्या नात्यांना जोडणारा एक दुवा तर नव्हता ?

आजीचे माहेर गुहागरचे. पूर्वी ती अधून मधून माहेरी जायची असे मी ऐकलेले. पण काळाच्या ओघात नात्यांतला ओलावाही कमी होत गेला असावा. आणि मग माहेरचे घरही परके झाले. ती कधीच फारशी त्याच्याविषयी बोलायची नाही कारण तिच्या जगण्याचे तत्त्वज्ञानच निराळे होते.

अध्यात्म असे शिकवले की जेव्हा आत्म्याचे परमात्म्याशी नाते जुळते तेव्हा आत्मा–प्रेम, शांती आणि आनंदमय होऊन जातो. मला वाटते आजीही अशाच कोणा आत्म्याचे सदेही रूप होती. तिचे काही पूर्वसंचित भोगांच्या रूपात आयुष्यात समोर आले पण त्या आत्म्याने त्याही परिस्थितीत परमात्म्याशी नाळ जोडून स्वत:मध्ये शक्ती भरली आणि त्या जोरावर प्रेम, शांती व आनंद ह्याचा वसा घेतला. मला उमजलेल्या अध्यात्म्याला साकार आविष्कार !

आपल्या आजीवर सगळ्यांचे प्रेम असते पण मला आजीविषयी आदर होता. तो तिच्या जीवनाविषयी तत्त्वज्ञानाचा आयुष्यात येणाऱ्या किती मोठ्या संकटांनी खचून न जाता त्याच्यावर मात करून आपण आनंदी राहू शकतो हे शिकवणारी ती माझी आदर्श होती.

◆◆◆

*With Best Compliments from*


**ROYAL REALTOR**

**Malad**

*With Best Compliments from*

# SAI DATTA Enterprises

**Prop. Anil Nalawade**



# मधुरा

- आशा खिल्लारे

***मधुरा कणखर होती म्हणूनच जळाल्यानंतरही तिने दिलेल्या मृत्युपूर्व जबाबामुळे तिच्या नवऱ्याला व सासूला जन्मठेप झाली. आजही मधुरा मला चेहऱ्यासमोर दिसत होती. चटकन भानावर आले. अरे, कामावर जाण्याची वेळ झाली होती व मी कार्यालयाच्या दिशेने चालू लागले. मन मात्र मधुराच्या आठवणीत गेले.***

नीलमला सकाळीच कामावर जाण्याची घाई झाली होती. चहाचा घोट घेत पेपर चाळत होती. अचानक एका बातमीकडे तिचे लक्ष वेधले. बातमी होती, 'सुनेला जाळून मारल्याच्या आरोपाखाली सासू व नवऱ्यास जन्मठेप' बातमी वाचून नीलमला हायसे वाटले. चला मधुराच्या आत्म्याला शांती मिळाली असेल अशी स्वत:शीच पुटपुटली व तिला मधुरा दवाखान्यात दाखल झालेला दिवस आठवला. आजही मधुराचा तो विव्हळणारा चेहरा दिसत होता. सर्व काही आज घडल्यासारखे दिसत होते.

त्या दिवशी नीलम नेहमीप्रमाणेच कामावर गेली होती. वॉर्डमध्ये गेल्यानंतर सर्व रुग्णांचा कॉट बाय कॉट अहवाल रात्रपाळीच्या सीमाकडून घेतला व सकाळची सर्व दैनंदिनीची कामे करण्यासाठी तयारी करीत होती. रुग्णांचे केसपेपर पॅडवर लावणे. रुग्णांच्या औषधाचे वेळापत्रक तयार करणे, ड्रेसिंग ट्रॉली तयार करणे. सतत हात-पाय व मेंदू यांच्याशी सुसंवाद साधत आमची कामे आटोपण्याचा प्रयत्न चाललाच होता.

तेवढ्यात एक इमरजन्सी केस कक्षात दाखल झाली. ही एक माझ्यासाठी आपत्कालीन घटना होती. सर्वच हातातली कामे टाकून ट्रॉलीवर आलेल्या रुग्णाचा केसपेपर पाहात DR'S order check केला व रुग्णाला दाखल करण्यासाठी जळीत रुग्ण कक्ष, बेड तयार केला. ह्यासोबतच रुग्णाला लागणारी सलाईनची तयारी, इंजेक्शन्स, ड्रेसिंग ट्रॉली व व्हेनस सेक्शनची तयारी (शरीरातून सलाईन लावणे) करून तात्पुरते सलाईन लावून डॉक्टरांना कॉल करण्यासाठी फोन केला व लेखी कॉल पाठवला होता.

स्त्री रुग्ण मधुरा जिवाच्या आकांताने ओरडत होती. तिचे सर्व शरीर जळून काळेठिक्कर पडले होते. जीवनाच्या अंतापर्यंत तिला ह्या वेदना सहन कराव्या लागणार होत्या. हे मला माहीत होते. हे तर रोजचेच काम माझ्यासाठी होते. असे बरेच रुग्ण मी दररोज पाहत होते. त्यांच्या वेदना बघत होते परंतु 'मधुरा' यापेक्षा थोडी वेगळी होती आणि म्हणूनच ती माझ्या स्मरणात घर करून होती.

मला आजही आठवतो रुग्णालयातला तिचा पहिला दिवस. तिचे विव्हळणे, रडणे, ओरडणे, रागावणे अन् चिडणे देखील. तिचा आकांत एवढा की, तिच्या आवाजाने कक्षातील रुग्णांची झोप उडाली होती. एवढ्यात डॉ. राठोड यांनी कक्षामध्ये प्रवेश केला. स्त्री रुग्णाची पाहणी केली.

तिची जळीत होण्याची टक्केवारी (Burn Percentage) पाहिले व रोग निदान केले १००% Burn. सलाईन सतत चालू राहण्यासाठी शीर कापून त्यामध्ये कॅन्युला टाकुन (व्हेनस् सेक्शन) केले. लघवी होण्यासाठी लघवीचे कॅथेटर घातले होते. सर्व शरीर मलम लावून थंड करण्यासाठी, झोपेचे वेदनाशामक इंजेक्शन व ॲन्टिबायोटिक्स् डॉक्टरांनी लिहिली होती.



अशा जळीत रुग्णाचा Prognosis (रुग्णाच्या प्रगतीचा आलेख) फारच Poor असतो. ह्यासाठी नातेवाईकांना कल्पना देण्याबाबत (High Risk-Concent) घेण्याबाबत डॉ. मला सूचना देत होते. तिची ही अवस्था का ? व कशी झाली ner Accidental / suicidal केस आहे का ? याबद्दल डॉक्टर रुग्णाशी संवाद साधत होते. डॉ. राठोड एक निष्णात सर्जन होते. नुसते सर्जनच नव्हे तर त्यांच्याकडे एक संवेदनशील मनही होते. एका विशिष्ट पध्दतीने रुग्णाला हाताळण्याचा त्यांचा हातखंडा मलाही कधी–कधी विचारधीन करीत असे. डॉक्टर त्यांच्या कलेनेच मधुराला प्रश्न विचरीत होते. मधुराने तेव्हा तिच्यासोबत रूममध्ये असणाऱ्या सासू व नवऱ्याकडे कटाक्षाने पाहिले. डॉक्टरांनी लगेच त्यांना बाहेर जाण्यास सांगितले व तिला बोलते केले.

मधुरा सांगत होती, डॉक्टर माझ्या लग्नाला चार वर्ष झाली. परंतु मला मूलबाळ होत नव्हते म्हणून माझा मानसिक व शारीरिक छळ चालू होता. यात माझा काय दोष. मी नशिबाला दोष देत जगत होते. मध्येच घशाला कोरड पडल्यामुळे पाणी मागू लागली व पाणी प्यायल्यानंतर कर्मकहाणी सांगू लागली. आज सकाळीच त्यांनी ठरवल्याप्रमाणे माझ्याशी भांडण्यास सुरुवात केली. सासू दरवाज्यात उभी होती व तिने घरात येऊन रॉकेलचा कॅन माझ्या अंगावर रिकामा केला. नवऱ्याने अंगावर काडी पेटवून फेकली आणि दरवाजा बंद करून दोघे बाहेर पळाले.

मी ओरडले, किंचाळले. माझे ओरडणे ऐकून घरच्यांनीही आरडाओरडा केला. अहो, बघा बघा सुनेने स्वत:ला पेटवून घेतलेही आजकाल फारच अबोल झाली होती हो ! मुलं होत नव्हते म्हणून ती निराश होती. सासू सारवासारव करीत होती. आजूबाजूचे लोक गोळा झाले होते. मी पूर्ण पेटले होते. सर्व शरीर काळे पडले होते. नवऱ्याने उचलून दवाखान्यात आणले. आता नवरा मला धमक्या देतो. आमचे नावं घेतलेस तर तुझ्या आईवडिलांना बघून घेईन म्हणतो. तो खूप गोड बोलतोय. डॉक्टर पण त्याच्या व सासूच्या फसव्या बोलण्याकडे लक्ष देऊ नका. ते लोक खूप दुष्ट आहेत. डॉक्टर, त्यांनीच माझा घात केला हो. डॉक्टर, त्यांना शिक्षा झाली पाहिजे. मधुरा पोटतिडकेने व जिवाच्या आकांताने सांगत होती. तिची कहाणी ऐकून आम्ही क्षणभर भारावून गेलो. डॉक्टरांनी लगेच रुग्णाचे Dying declaration

मृत्युपूर्व जबाब घेण्यासाठी MLC Statement urgent घ्यावे ह्यासाठी Police Inform करण्यास सांगितले. थोड्याच वेळात पोलीस व न्यायाधीश रुग्णाचा जबाब नोंदवण्यासाठी कक्षात दाखल झाले होते. तिने सर्व स्पष्ट व सत्य तेच सांगितले. असह्य वेदना होत असताना बिछान्यातून क्षणभर उठून जबाबाच्या कागदावर सही केली. नंतर तिला खूप हायसे वाटत होते. आता तिला मृत्यूची भीती वाटत नव्हती. पोलिसांनी नवरा व सासूला बेड्या ठोकून घेऊन गेले होते. तिचे आईवडील आले होते. त्यांनी मुलीची अशी अवस्था बघून हंबरडा फोडला होता.

मी मध्येच तिच्या कक्षात दाखल व्हायचे. कधी मेडीसीन तर कधी ड्रेसिंग करण्यासाठी मी तिला बोलायचे. ती मात्र हसून माझ्या प्रश्नांची उत्तरे द्यायची व म्हणायची, माझ्या शरीरावरच्या जखमा तुम्ही कधीच भरून काढू शकणार नाही. माझ्या मनावर व शरीरावर ज्या क्रूर लोकांनी अत्याचार केले, जखमा करून रक्तबंबाळ केले त्यांना शिक्षा होईपर्यंत मला शांतता मिळणार नाही. खरेच काहो माझ्या खुन्यांना शिक्षा होईल. मी होकारार्थी मान डोलवायचे. असेच काही तरी बरेच बरळत असायची आणि अचानक मधुरा सिरीयस झाली. बोलता बोलता एका एका निष्पाप जिवाचा अंत झाला. डॉक्टरांनी र्अ्रूि ्णूगि्  केला होता. Body Post Mortum meeþer Mortury मध्ये shift केली होती. मधुराचे बोलणे हसणे कानात गुंजत होते.

मधुरा कणखर होती म्हणूनच जळाल्यानंतरही तिने दिलेल्या मृत्युपूर्व जबाबामुळे तिच्या नवऱ्याला व सासूला जन्मठेप झाली. आजही मधुरा मला चेहऱ्यासमोर दिसत होती. चटकन भानावर आले. अरे, कामावर जाण्याची वेळ झाली होती व मी कार्यालयाच्या दिशेने चालू लागले. मन मात्र मधुराच्या आठवणीत गेले.

◆◆◆

With Best Compliments from


Omkar Builders & Developers



Sion Office



*With Best Compliments from*



# Awate

## Construction Co.

## Thane

# स्त्रियांवरील अत्याचार कसे रोखता येतील?

- वर्षा वसंत साळुंके

*स्त्रियांवरील अत्याचार रोखण्यासाठी समाजानेच पुढाकार घेण्याची गरज आहे. पोलिसांच्या वतीने बसविण्यात आलेल्या मदत पेटीमध्ये आपले निनावी पत्र टाकून स्त्रिया आपली तक्रार योग्य पध्दतीने पोहचवू शकते. स्त्रियांनी आत्मविश्वास वाढवून संघटितपणे अत्याचार रोखण्यास सरसावले पाहिजे. स्त्रियांनी नेहमीच सिध्द असणे गरजेचे आहे. आत्मरक्षणाचे प्रशिक्षण प्रत्येक महिलेने घेतले पाहिजे.*

आपला समाज इतका पुरुषप्रधान आहे की, गरीब असो किंवा श्रीमंत सगळ्यांनाच वाटतं की आपल्या घरात वंशाचा दिवा असावा. मुलगी कुणालाच नको असते. आज मुलींनी आपल्या वैविध्यपुर्ण कर्तृत्वाने आकाशाला गवसणी घतली असली तरी त्याचं कुणालाच कौतुक नाही. घरातील पुरुषच नव्हे तर वडिलांना-या स्त्रियांनाही वाटतं की, आपल्या सुनेने मुलाला जन्म द्यावा. याच संकुचित मानसिकतेमुळे आज हजारो मुलींची गर्भपात हत्या केली जाते. कर्तुत्वान पुरुषाच्या मागे स्त्री असते वगैरे गोष्टी मान्य असूनही मुलींचा जन्म नकोच असतो. हे अर्धसत्य आहे. या परिस्थितीत पती-पत्नीच्या सहजीवनात वैवाहिक संबंधाचे महत्व अनन्यसाधारण आहे.

लग्न म्हणजे कुणाच्याही आयुष्यात शक्यतो एकदाच होणारी महत्त्वपूर्ण घटना. लग्न हा प्रत्येकाच्या आयुष्यातील एक वेगळा स्मरणात ठेवावा असा सोहळा. दोन मनाचे कुटुंबाचे मिलन. मात्र हेच लग्न अनेकदा हुंड्यासारख्या गोष्टीमुळे कधी मृत्यूचा फास बनते हेच समजत नाही. १९६१ मध्ये हुंडाविरोधी कायदा केल्यानंतरही हुंडाबळीची संख्या पाहिली की जाणवते ते हेच की कायद्याचा बडगा उगारूनही समाज मात्र सुधारायला तयार नाही. हुंड्यासाठी व तत्सम मानापमानासाठी तिचा पती व त्यांच्या कुटुंबीयांकडून अत्याचार होत असल्याच्या ह्या घृणास्पद घटना पाहता मन सुन्न होते. आज भारतात विविध ठिकाणी सर्वाधिक खटले घटस्फोटांचे आहेत. कौटुंबिक पातळीवरील वाद सोडविण्यासाठी कौटुंबिक न्यायालये सुरू करण्यात आलेले आहेत. घटस्फोट, पोटगी संमतीपत्र इतर कौटुंबिक वाद असे खटले येथे दाखल होतात. येत्या काही दिवसांत ही संख्या आणखी वाढेल. ही बाब धक्कादायक असून, ढासळलेल्या समाजव्यवस्थेचे हे उदाहरण आहे.

सर्व स्तरातील समस्याग्रस्त व पीडित महिलांना आपले प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांच्या

हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या दृष्टीने सुरू करण्यात आलेल्या महिला लोकशाही दिनामध्ये तक्रारी घेऊन फिरकतच नसल्याचे चित्र आहे. अत्याचारग्रस्त स्त्रियांनी लोकशाहीदिनात आवश्यक ती तक्रार नोंदवून अत्याचार रोखता येईल. अन्य स्वरूपाच्या अडचणी सोडविण्यासाठी पीडित महिलांना न्याय देण्यासाठी शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या वतीने महिला लोकशाही दिन राज्य, विभाग, जिल्हा व तालुका पातळीवर सुरू करण्यात आला आहे. जिल्हा स्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी तो पाळला जातो. या लोकशाही दिनात तालुका पातळीवर न्याय न मिळाल्यास संबंधित महिला जिल्हा पातळीवर तक्रार करू शकते. जिल्हा पातळीवर न्याय न मिळाल्यास विभागीय किंवा राज्य पातळीवर दाद मागू शकते. अशी तरतूद आहे. पण जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या लोकशाही दिनात महिलांची अनास्था दिसते, तर तालुका पातळीवरचे चित्रही निराशाजनक आहे. महिला लोकशाही दिनात स्त्रियांनी आवर्जून प्रधान सचिव, महिला व बाल कल्याण विभाग, मंत्रालय, नवीन प्रसाशकीय भवन, मुंबई-३२ येथे तक्रार दाखल करून स्त्रियांवरील निवारण करता येईल.

एखाद्या महिलेस तिचा पती अथवा पतीच्या नातेवाईकांनी क्रूर वागणूक दिल्यास संबंधितांविरुध्द कडक कारवाई करण्याच्या दृष्टीने भारतीय दंड संहितेमध्ये कलम ४९८-अ चा अंतर्भाव करण्यात आला आहे. या कलमानुसार नोंदलेला गुन्हा दखलपात्र व अजामीनपात्र आहे. सदर कायद्यांर्तगत कायदेशीर कारवाई करण्यात येते. पूर्वी लोकलाजेखातर महिला आपल्यावरील अत्याचारांची तक्रार करण्यास पुढे येत नसत. परंतु आता अन्याय करणाऱ्यांची आणि समाजाची भीती न बाळगता महिला तक्रारीसाठी पुढे सरसावत आहेत. पोलीस स्टेशनमध्येही पूर्वी तक्रारदार महिलांना असपमानास्पद वागणूक मिळायची. मात्र आता पीडित महिलांना मानसिक आधार देत महिला पोलीसच गुन्हे दाखल करून घेतात. त्यामुळे तक्रारदार महिलांना मोठा आधार मिळाला आहे.

स्त्रियांवरील अत्याचार रोखण्यासाठी समाजानेच पुढाकार घेण्याची गरज आहे. पोलिसांच्या वतीने बसविण्यात आलेल्या मदत पेटीमध्ये आपले निनावी पत्र टाकून स्त्रिया आपली तक्रार योग्य पध्दतीने पोहचवू शकते. स्त्रियांनी आत्मविश्वास वाढवून संघटितपणे अत्याचार रोखण्यास सरसावले पाहिजे. स्त्रियांनी नेहमीच सिध्द असणे गरजेचे आहे. आत्मरक्षणाचे प्रशिक्षण प्रत्येक महिलेने घेतले पाहिजे. शिवाय स्थानिक तसेच पोलिसांचे क्रमांक, रेल्वे पोलिसांचे क्रमांक, हेल्पलाइन नंबर, कंट्रोलरूम क्रमांक असे अत्यावश्यक नंबर स्त्रियांनी जवळ ठेवले पाहिजेत. तसेच एखाद्या अनुचित प्रकाराकडे डाळेझाकदेशील स्त्रियांनी करू नये.

घराजवळच्या गल्लीत, कॉलेज-शाळेत जाण्याच्या रस्त्यावर, गर्दीने गजबजलेल्या बसस्टॉपवर आणि अंधाऱ्या रस्त्यांवरही काही मुख्य शहरात विशेषत: मुंबईत सर्वत्रच अल्पवयीन मुली व रुणींना छेडछाड, अश्लील वर्तन आधि असभ्य शेरेबाजीचे चटके सहन करावे लागतात. अनेकदा हे सर्व अत्याचार अगतिकपणे सहन करीत याची जणू सवयच लावून घेण्याची मानसिकता तरुणींमध्ये रुजते. अशाच तरुणींसाठी शहरात भयमुक्त वातावरण तयार करण्यासाठी पोलीस महिला मार्शल तैनात आहेत. कॉलेज, स्टेशन, अंधाऱ्या जागांची स्थळी व महिला पोलीस गस्त घालणार असून गुंडांवर कायद्याचा चाप ठेवण्यार आहेत.

मुलींची छेड कोणी काढत असेल तर शिट्टी वाजवून

आजूबाजूच्या व्यक्तींना गोळा करण्याचे आवाहन करीत. ''अब मै एक बजाऊ'' या मोहिमेची सुरुवात लाला लजपतराय कॉलेजमधून करण्यात आली आहे. छेडछाड करण्याचे प्रकार बस, ट्रेन, सिग्नलवर थांबलेली वाहने तसेच गर्दीच्या ठिकाणी वारंवार आढळतात. असे युथ फोरम ऑफमधील मुलींनी केलेल्या सर्वक्षणात दिसून आले आहे. फेसबुकवरही ह्या मुलींनी एकत्र येऊन http://w.w.w.facebook.Com/AbMainEKbajaoon या नावाची कम्युनिटी तयार केली आहे. स्त्रियांच्या मदतीसाठी तयार असणारी १०३ किंवा १०९१ ही पोलिसांची हेल्प लाइन छेडछाडीच्या घटनांची तत्परतेने दखल घेते. हे अनेक मुलींना ठावूक नसते. मुलींनी त्यांची छेड काढणाऱ्यांची नोंद त्या ठिकाणासह या हेल्पलाइनवर केल्यास दाद मिळते. पश्चिम आणि मध्य रेल्वेमार्गावर तब्बल ८० लाख मुंबईकर दरदिवशी प्रवास करतात. या सर्व सुरक्षेची जबाबदारी रेल्वे पोलीस दल (जीआरपी) वर आहे. त्यांनी महिला प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देत निर्भया पथकाचे सबलीकरण करायचे ठरलेले आहे. प्रवासी आपल्या सूचना आणि तक्रारी http://w.w.w.facebook.com/mumbairailwaypolice या फेसबुक पेसबुक पेजवर टाकू शकतात.

देशातील विज्ञान संशोधनात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या 'भाभा अणुसंशोधन केंद्राने'(BARC) स्त्रियांच्या सुरक्षततेसाठी ''निर्भय'' उपयोगासाठी सिध्द झाले आहे. बीएआरसीने तयार केलेल्या या उपकरणाचे उत्पादन ''इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेश ऑफ इंडिया'' ने केले आहे. मोबाईल सोबत ''ब्लू टूथ'' ने वारंवार जोडता येणाऱ्या या उपकरणाचे बटन दाबल्यावर जवळच्या व्यक्ती तसेच पोलिसांकडे संदेश पोहचणार VRS-२०१४/०८/०१ आहेत. जीपीएसवर आधारित असलेल्या या यंत्रामुळे अडचणीत अथवा संकटात सापडलेल्या संबंधित महिलेचे ठिकाणही समजणार असून तातडीने मदत करता येईल. भाभा अणुसंशोधन केंद्राने विकसित केलेले हे टेली डिस्ट्रेस अलार्म डिव्हाइस (TDAD) सुमारे १०० ग्रॅमचे हे उपकरण पर्स किंवा खिशांमध्ये ठेवता येणार असून त्याच्या उपयोगासाठी मोबाईल आवश्यक आहे. वेगवेगळ्या कर्तव्यपूर्तीत गुंतलेल्या भारतीय महिला, तरुणी यांच्याकडे मोबाईल असतोच. आपत्कालीन परिस्थितीत या उपकरणावरील (TDAD) चे बटन दाबल्यास ब्लू टूथच्या माध्यमातून त्या ठिकाणाचा सिग्नल मोबाईलकडे पाठविला जाईल. मोबाईलमध्ये आधीच साठवलेल्या पाच जवळच्या व्यक्तींकडे आधी तयार करून ठेवलेला संदेश पोहचेल. या व्यक्ती संबंधित स्त्रियांनीच निवडायच्या असून नातेवाईक, मित्र-मैत्रिणी, पोलीस आदींचे नंबर त्यात ठेवता येतील. यामुळे महिलांना/मुलींना तातडीने मदत मिळू शकते.

दिल्लीतील निर्भयाकांडानंतर स्त्रियांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन कायद्यात दुरुस्ती करण्यात येऊन तो अधिक भक्कम करण्यात आला आहे. देशातील पोलीस ठाण्यामध्ये बलात्काराची प्रकरणे नोंदविण्याचे प्रमाण वाढले आहे. याआधी हे प्रमाण कमी होते. केंद्र सरकारने बलात्कारपीडित महिलेने एकाच ठिकाणी पोलीस व कायदेशीर मदत आणि वैद्यकीय उपचार देण्याच्या दृष्टीने एकल संकट सहायता केंद्राची स्थापना केलेली आहे. तसेच भौगिलिक सूचना प्रणाली (जीआयएस) वर आधारित एका संगणक प्रणालीनुसार संकटात अडकलेल्या महिलेने विशिष्ट नंबरवर केलेल्या फोनला तत्काळ उत्तर देऊन तिला मदत पुरविण्यासाठी कारवाई केली जाणार आहे.

◆◆◆

## *With Best Compliments from*

**Rama Surve**

**Jawed Mulla**

**Pradeep Sharma**

**Abdul Shaikh**

**Dinesh Ramchandar**

**Swapnil Kalkher**

**Shanu**

**Kailas Verma**

# प्राजक्त कधी बहरेल?

- सुचेता चितळे - नलावडे

***सर्वांना चिअरफुल चेहऱ्याने सामोरे जाणारे बाबा परत कधीच भेटणार नाहीत का ? म्हणूनच विचारते आहे प्राजक्त परत कधी बहरेल ? बाबांनी आपल्यासमवेत पृथ्वीवरील पारिजातकाचा सुगंध स्वर्गापर्यंत नेला.***

१० डिसेंबर २०११ सकाळी सहाच्या सुमारास घरचा फोन खणखणला. आईचा कातर आवाज.... सुचेता, लवकर खाली ये काहीतरी गडबड झाली आहे. मी पटकन खाली उतरले. घरी जाऊन बघते तर बाबा विचित्र अवस्थेत बसलेले. शेजारी रक्ताचे थारोळे. आई वॉकरला धरुन बसलेली . तिची अवस्था अधिकच करुण. त्या माऊलीच्या डोळ्यात अपार काळजी व अश्रू. पाठोपाठच घरातील सर्वजण खाली आलेच . आम्ही सर्वांनी मिळून बाबांना 'नॉर्मल' करण्याचा प्रयत्न केला. त्यांना नक्की आठवेना, चक्कर आली की काय झाले म्हणून ते पडले. आमच्या नकळत नियतीने 'गणेश पुराणाचा' पहिला अध्याय सुरू केला होता.

माझे बाबा - गणेश पुरुषोत्तम चितळे. जन्म २६ जानेवारी १९३४. 'लोणावळा' येथे जन्मलेले माझे बाबा शिक्षण, नोकरीसाठी मुंबईत आले. मोठ्या कुटुंबात वावरणारे बाबा. जसे मोठ्या भावंडांनी, बहिणीने आपापले संसार थाटले. तसाच आपलाही संसार त्यांनी थाटला. माझी आई - सविता गणेश चितळे. भायखळा येथील रेल्वे हॉस्पिटलमध्ये परिचारिका होती. त्यामुळे भायखळा येथील रेल्वे क्वार्टर्समध्ये आम्ही रहायचो. 'बँक ऑफ महाराष्ट्र' मध्ये बाबा नोकरी करत.

आपले आई-वडील म्हणजे आपले पृथ्वीवरचे दैवतच असतात. बाबा म्हणजे अत्यंत रसिक, प्रचंड लोकसंग्रह असणारे असे व्यक्तिमत्व. जीवनावर खूप प्रेम करणारे बाबा मला पदोपदी दिसतात. आईबाबांनी शिक्षणाबरोबरच इतर अनेक छंद, गोष्टी कार्यक्रम महत्त्वाचे असतात हे वेळोवेळी दाखवून दिले. जवळजवळ प्रत्येक सुट्टीत विविध ठिकाणी फिरायला नेले. माणसाच्या चांगुलपणावर ह्या दोघांचाही विश्वास. त्यामुळे आपसूकच माझा मोठा भाऊ सुबोधदादा व माझ्यावरही तेच संस्कार झाले.

'बँक ऑफ महाराष्ट्र' मध्ये नोकरी करणाऱ्या बाबांची प्रमोशनमुळे अनके ठिकाणी बदली झाली. दरवेळी वाढता 'बँक बॅलन्स' व 'मल्टीपल लोक' असेच समीकरण असायचे. अभ्यास घेणारे बाबांचे रूप मला आठवते. बँकेच्या अंकांच्या समुद्रात कधी साहित्यातील भावना हरवली नाही. हिंदीत मला 'प्रेमचंद' यांनी 'बडे घर की बेटी' ही कथा होती. त्यांनी ती कथा मला खूप छान शिकवली होती. पदोपदी ती शिकवण आजही मी स्मरते आहे. जशी मेहनत आहे तशीच अभ्यास, विषय मुळापासून समजून

घेणे हेही तितकेचं महत्त्वाचे आहे. याची जाणीव त्यांनी आम्हाला करून दिली.


'अतिथी देवो भव' या सुवचनाने चालणारे असे बाबा अर्थातच माझ्या आईच्या कृतीची त्याला योग्य ती साथ होतीच. घरी येणारी व्यक्ती अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत कितीही घाईत असली (दोन्ही पक्ष) तरी काहीतरी खाल्ल्याशिवाय परत जाऊ न देणे हे अजब कौशल्य त्यांच्याकडे होते. दरवर्षी 'मकरसंक्रांतीला' माझी आई तिळाच्या



वड्या संपूर्ण बँकेतील लोकांसाठी द्यायची. परतताना बाबांसोबत 'मधुर पावती' असायची. घरी कोणीही पाहुणा येवो, अगर अपरिचित येवो, तो हसत-हसतच बाहेर पडेल. प्रत्येकजण नीट जेवला की नाही पासून झोपताना प्रत्येकाला नीट अंथरूण-पांघरूण मिळाले की नाही इथपर्यंत हा गणेशा सूक्ष्म निरीक्षण करत असे. याचाच परिणाम हा प्रसंग असावा. मी बारावीत होते, बाबांना ऐन (माझ्या) बोर्डाच्या परीक्षेच्या वेळी ह्रदयविकाराचा झटका आला. तातडीने त्यांना आय.सी.यू. मध्ये ॲडमिट केले. जेसे लोकांना समजले तसा सर्वच बाजूने 'लोकसमुद्र' त्यांना भेटावयास हजर. त्या सर्वांच्या भावनांना सलाम.

आईच्या शिफ्ट ड्युटी असल्यामुळे बाबा कधी-कधी केस बांधून देणे, जेवण वाढणे ह्या गोष्टी करत. तेव्हा सहज काहीतरी शाब्दिक कोट्या, चेष्टामस्करी चाले. संस्कारही याबरोबर रुजले. केसांना तेल लावता लावता डोक्यात सुविचारांचीही लावणी झाली. दुसऱ्यांना नेहमी चांगलेच द्यावे. वृत्ती सतत हसतमुख ठेवावी. अशी शिकवण त्यांनी कायम दिली.

वाणसामानाची यादी असो अगर कुणाचा वाढदिवस असो, तितक्याच कौशल्याचे बोलणे, प्रत्येकाच्या वाढदिवसाला पहिला फोन कुणाचा येणार ? उत्तरात मृदुलता होती-आहे-गणेश चितळे यांचाच. लहानपणी पुस्तकांना कव्हर्स कशी घालायची हे बाबांनीच शिकवले होते. माझी मुलगी गायत्री तिला कव्हर कसे घालायचे हे शिकवताना त्या कशी कलात्मकता असते हे सांगताना बाबा कायमच स्मरायचे. मला घाईघाईत कानातले घालायची सवय होती. एकदाच बाबांनी सांगितले, कानातले नीट बसून घालत जा, नाहीतर मळसूत्र(फिरकी) पडते. हा 'कानमंत्र' येताजाता माझ्याबरोबरच आहे. त्यांनी लिहिलेला हिशोब असेल, कोणाचे वाढदिवस असतील, रामदास डायरीत नोंदी असतील, काही विशेष तर काही साध्या घटना असतील, आल्या आहेत थेट मनाच्या गाभाऱ्यातच. बाबांनी आपल्या वागण्याने माणसांचा समुद्र फुलवला तसेच फुला-झाडांचीही त्यांना खूप आवड. भायखळ्याहून आम्ही ठाण्याला वृदांवन सोसायटीत रहायला आलो. किचनमध्ये आई-बाबांनी खूप हौसेने सुंदर ओटा करून घेतला होता.



बाबा म्हणाले, कशाला तोडायचा, येणाऱ्या माणसाला स्वयंपाक घरात आले की कसे प्रसन्न वाटेल. किती लाघवी बिचारा. आम्ही तिथे खूप झाडे लावली होती. अगदी मिरचीपासून पार गुलाबापर्यंत जवळजवळ तीस झाडे घेऊन आम्ही ठाण्याला आलो. इथे येऊन त्यांनी (तळमजला असल्यामुळे) पारिजातक लावला. आज तो खूपच बहरला आहे. (पण आता मात्र तो अबोल झाला आहे) छोटीशी वनराईच बाबांनी फुलवली होती. विविध प्रकारचे सुगंध, आकार असलेली फुले सर्वांना दृष्टीसुख देत होती. प्राजक्ताच्या फुलांचा रोजचा सडा पाहताना सदैव मला हसतमुख बाबा दिसायचे. ओंजळभर फुले बाबा ज्याला आवड आहे त्याला कायमच दयायचे. शुभ्र आणि नाजूक फुले घेताना घेणाऱ्याचे हात व डोळे आनंद व समाधानाने हसायचे.

आमच्या घरी आम्हाला सर्वांशी समानतेने वागायला आई-बाबांनी शिकवले आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणून द्यायला खरं मला अभिमान आहे. माझे पती गिरीश नलावडे हे तबला वादक आहेत. दुसऱ्या समाजाचे आहेत म्हणून आमच्या घरी त्याला किंवा त्याच्या घरच्यांना दुजाभाव दाखविला गेला नाही. आमच्या 'आंतरजातीय विविहाला' वडिलांचा पाठिंबा होता. माणूस मेहनती व चांगल्या सवयी असलेला हवा, जबाबदारीने वागणारा, सुसंस्कृत हवा इतकेच त्यांचे म्हणणे होते.

बाबांचे तीन मोठे भाऊ, एक बहीण व धाकटे दोघे भाऊ असा मोठा परिवार. (आत्या फक्त आत्याच आहे.) तीन मोठ्या भावांच्या मृत्यूचे दु:ख सहन केलेच. अलीकडेच काही वर्षांपूर्वी त्यांचे एक धाकटे भाऊ गेले व अगदीच अलीकडे (अचानकच) सर्वांत धाकट्या भावावर मृत्यूने अचानक घाला घातला. ते काळाचे पान मात्र खूपच दु:खदायक व क्लेशदायक होते सर्वांसाठीच. माझे सगळे भाऊ गेले. 'आता मी एकटाच उरलो' हेच शब्द बाबा वारंवार म्हणत असत.

पडण्याचे निमित्त होऊन (१० डिसेंबर २०११) बाबा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झाले ते घरी परत आलेच नाहीत. अखंड बोलणारा माणूस एकदम अबोल झाला. सदाफुलीसारखे असणारे बाबा कायमचे अबोली रंग परिधान करू लागले. हॉस्पिटलमध्ये असताना ते फक्त एकच दिवस सर्वांशी बोलले, सर्वांना ओळखले, पण नियतीने तेवढीच अनुमती दिली होती. नंतर पुन्हा मौनव्रत. त्यादिवशी मला म्हणाले, 'मटका भरला आहे.' याचा अर्थ काय घ्यायचा हे मला ना तेव्हा ना आत्ता समजत नाही. सर्व रिपोर्ट नॉर्मल येऊनसुध्दा नक्की कशाचा त्रास झाला हे आम्हा सर्वांसाठी एक प्रश्नचिन्हच उरले आहे. एरवी 'हरे राम करो काम' म्हणणारे बाबा आजारपणात फक्त 'हरे राम' च म्हणत राहिले.

बुधवारी २८ डिसेंबर २०११ ला बाबा गेले. ४ जानेवारी २०१२ ला (बुधवारीच) पहाटे ५ वाजता बाबा माझ्या स्वप्नात आले. मी गिरीशला म्हटले, बाबांचा फोन आला आहे, त्याने विचारले, काय म्हणालीस ? तेव्हा

मी भानावर आले. मला कळले की ते स्वप्न होते (स्वप्नातच) ते म्हणाले, 'गुड मॉर्निंग' मी म्हटलं, 'गुड मॉर्निंग.' त्यावर म्हणतात कसे, असं असतं का 'गुड मॉर्निंग' गुड मॉर्निंग कसं 'चिअरफुल' असावे.

सर्वांना चिअरफुल चेहऱ्याने सामोरे जाणारे बाबा परत कधीच भेटणार नाहीत का ? म्हणूनच विचारते आहे प्राजक्त परत कधी बहरेल ? बाबांनी आपल्यासमवेत पृथ्वीवरील पारिजातकाचा सुगंध स्वर्गापर्यंत नेला.

योगायोगाचा भाग बघा – एका भावाची तारीख (२८), एका भावाचा वार (बुधवार) साधत बाबा देवाघरी गेले. ९ जानेवारी २०१२ ला बाबांचे तेरावे झाले. ९ जानेवारी ही तारीख माझ्या आजोबांची पुण्यतिथी असते. शेवटी ,आपले माणूस आपल्याला कायमच हवे असते. पण...

'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' हेच अंतिम सत्य आहे. त्यांची शिकवण घेऊन जीवनपथ आनंदाने चालणे हीच त्यांना श्रध्दांजली आहे. 'गणेश पुराण' १८ अध्यायात संपले.

❖❖❖

With Best Compliments from

Ellora Consultant

Ketan Belsare

# प्रसूतीनंतरचा काळ

**- ओमनी फीचर्स**

आई झाल्यावर प्रत्येक महिला आनंदात असते. मात्र हा आनंद प्रसूतीनंतर काही काळच टिकतो. प्रसूतीनंतरचा काही काळ आनंदात गेल्यानंतर मात्र ती महिला नैराश्य, चिडचिड, झपाट्याने मूड बदलणे, स्वत:चा राग येणे अशा काही मानसिक अवस्थांना सामोरी जाते. प्रसूतीनतंरच्या काळातील या मानसिक अवस्थेला इंग्रजीत 'बेबी ब्लूज' अशी संज्ञा आहे. आपल्याकडे मात्र आई होणं ही इतकी उदात्त गोष्ट मानली जाते, की या अवस्थेविषयी सहसा कोणी बोलायला पटकन धजावत नाही. मानसिक अवस्थांमधील बदलांच हे प्रमाण अधिक वाढल्यास त्या महिलेला मानसोपचारतज्ज्ञाची गरज भासते.

अनघाने नुकत्याच दोन जुळ्या मुलांना जन्म दिला. दोन मुलांना पाहून ती खरं तर मनातून खूप सुखावून गेली होती. अतिशय आनंदात होती. पण प्रसूतीनंतर काही काळ गेला आणि तिची चिडचिड होऊ लागली. एका मुलाचं झालं की दुसऱ्याचं रडणं, खाणं-पिणं, स्तनपान, आंघोळ, कपडे धुणं, घरातली कामं या सगळ्या कामात दिवस कसा सुरू होतो आणि कसा संपतो हेच तिला कळेनासं झालं होतं. रात्रीची झोपही तिला पुरेशी मिळेनाशी झाली होती, या सगळ्यांत एक-दोन महिने गेले. हळूहळू अनघाला या सगळ्याचा कंटाळा येऊ लागला. आपलं दुसरं काही विश्वच नाही असं तिला सतत जाणवू लागलं होतं. हळूहळू मुलांची कोणतीही गोष्ट करणं तिला नकोसं



होऊ लागलं होतं. सतत तेच तेच करण्याचा तिला कंटाळा येत होता. कधी कधी तर मुलांना बघून तिला राग यायचा, तर कधी स्वत:च रडायची. पण हे कोणाशी बोलू शकत नव्हती. कोणाकडे सांगणार हा प्रश्न तिला पडला. याउलट आईने बाळाची काळजी घ्यावे हेच सांगून तिला गप्प केलं.

ही केवळ अनघाची नाही तर देशातल्या ७० टक्के महिलांची समस्या आहे. प्रसूतीनंतर याच प्रकारच्या समस्येतून कित्येक महिला जात असतात. कित्येक महिलांना ही गोष्ट जाणवत नाही आणि ज्या महिलांना हे जाणवतं, त्या महिला मातृत्वाच्या उदात्तीकरणामुळे कोणाकडे आपल्या समस्यांविषयी बोलूदेखील शकत नाही. कोणी बोलायचा

प्रयत्न केलाच तर त्या महिलेलाच वेड्यात काढलं जातं. कारण मुळांतच महिलांमध्ये याबाबत जागरुकतेचा अभाव असल्याचं दिसून येतं.

प्रसूतीच्या असह्य वेदनांनंतर स्त्री आपल्या हातात तान्हुल्याला घेते तेव्हा तिच्या त्या वेदना कुठल्या कुठे पळून गेलेल्या असतात. आई झाल्याचा आनंद तिच्या चेहऱ्यावरून ओसंडत असतो. वेदनेची एक पुसटशी रेषही तिच्या चेहऱ्यावर दिसत नाही. मात्र जसजसा एक दीड महिना उलटतो तसं तसं तिच्या वागण्यात बदल होऊ लागतो. आपलं दुसरं काहीच जग नाही अशी भावना तिच्या मनात वाढू लागते. परिणामी चिडचिड होणे, वैतागणे, रडावंसं वाटणं, समोरच्याचा खूप राग येणं, अशा विविध भावभावनांची गर्दी होते. कधी कधी या सगळ्याचा राग चिमुकल्यावरही काढला जातो. काही जणींना तर या सगळ्यामुळे प्रचंड नैराश्य येतं. या घालमेलीला इंग्रजीत 'बेबी ब्लूज' असं म्हटलं जातं.

स्त्री नोकरी करणारी असो, जवळपास ७० ते ८० टक्के महिला या प्रकारच्या मानसिक अवस्थेमधून जाताना दिसतात. खरं म्हणजे हे प्रमाण घर किंवा करिअर अशा दोन्ही ठिकाणी कसरत करणाऱ्या महिलांमध्ये अधिक असल्याचं दिसतं. सध्या हे प्रमाण वेगाने वाढत असल्याचं दिसतंय. या समस्येतून बाहेर पडण्यासाठी त्या महिलेला एकटीलाच झुंजावं लागतं. कधी कधी तर अपराधी वाटणे, सर्वात जवळच्या व्यक्तीला टाकून बोलणे, बाळ खाली पडेल अशी भीती वाटत राहणे अशा गोष्टी घडताना दिसतात. जागरण, स्तनपान आणि वाढती भूक या सगळ्या बदलत्या चक्रामध्ये स्त्रिया मानसिकरित्या खंगतात. मुख्य म्हणजे ही लक्षणं दररोज आढळतात. कधी कधी काही मिनिटं तर कधी कधी काही तास ही लक्षण आढळतात.

शरीरातील हार्मोन्समध्ये बदल झाल्याने या तणावाचा सामना करावा लागत असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. मुलगाच हवा या आग्रहाचे कौटुंबिक व सामाजिक दडपणही प्रसूती होण्यापूर्वी ४२ टक्के स्त्रियांच्या मनावर असतं. त्यातच मुलगी झाल्यानंतरचा अपराधी भाव आणि मुलगा झाल्यांनंतरची सुटकेची भावना या दोन्ही टोकाच्या भावनांच्या निर्मितीमुळेही तणावाची निर्मिती होते.

**यावर मात कशी कराल ?**

या नैराश्याकडे वेळीच लक्ष देण्याची गरज असते. किंबहुना या नैराश्यावर मात करण्यासाठी मानसोपचारतज्ज्ञांकडे जाण्याचा सल्ला दिला जातो. मात्र फारच कमी स्त्रिया याचा गांभीर्याने विचार करतात. म्हणूनच मुलाबरोबरच त्या महिलेची देखील काळजी घेणं तितकचं आवश्यक आहे.

- तुमच्या विश्वासातल्या व्यक्तीशी बोला. अशी व्यक्ती जी तुमच्या अतिशय जवळची आहे, मग ती मैत्रीण,आई किंवा नवरादेखील असू शकते.
- सकस आहार घ्या. मूल झाल्यावर आपल्या बाळाकडेच आई जास्त लक्ष देते. परिणामी स्वत:च्या खाण्याकडे तिचं दुर्लक्ष होताना दिसतं. कमी कार्बोहायड्रेट्स पोटात गेल्याने तुमचा मूड बदलण्याची शक्यता अधिक बळावते.
- कोणाशी बोलणं जमत नसेल तर एक डायरी किंवा वही तयार करा. त्यात तुमचे विचार, तुमच्या

भावनांची नोंद करा. जेणेकरून बरं वाटेल.

- थोडा वेळ स्वत:साठी द्या. पाच मिनिटं घराबाहेर जाऊन थोडीशी कामं करा. बाहेरच्या हवेत फिरल्याने काही काळासाठी का होईना पण तुम्हाला डायपर बदलणे, स्तनपान करणे या गोष्टींचा विसर पडेल.
- अशा वेळी आपल्या कोणी सोबतीला असेल तर तेवढंच आपलं काम हलकं होतं. घरातलं जेवणं करण्यासाठी कोणीतरी आचारी ठेवा. शक्य असल्यास घरातल्या लहान मुलांना हाताशी धरा आणि काही कामं सांगा. त्यांनाही बाळासाळी काम केल्याचा आनंद मिळतो. आणि आपणही बाळ झालं म्हणजे आता सगळं संपलं असं कुढत न बसता त्या बाळलीलांचा आनंद लुटतो.
- सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे प्रसूतीनंतर लगेचच आपण सगळ्याच कामात तरबेज होऊ असं गृहीत धरू नका. काही महिन्यानंतर तुम्ही पुन्हा नोकरीवर रुजू झालात की तुमच्या झोपण्याच्या किंवा स्तनपानाच्या वेळा ठरतात. तेव्हा तुमची दैनंदिनी सुरळीत होईलच.
- हे सगळं होऊनही जर या समस्या कायम राहिल्या तर मात्र समुदेशनाची गरज आहे हे ओळखून मानसोपचारतज्ज्ञाची मदत घ्या.

बेबी ब्लूजला आपल्याकडे वैद्यकीय भाषेत 'पोर्स्ट मार्टम सायकोथिस' असंदेखील म्हणतात. ही अवस्था प्रसूतीनंतर एक-दोन दिवसांतसुध्दा डोकावू शकते. कधी कधी आपलं बाळं आपल्या हातातून पडेल की काय किंवा कोणीतरी घेऊनच जाईल अशीदेखील भीती या अवस्थेच्या मुळाशी असते. महिलेच्या शरीरात होणारं हार्मोन्समधील बदल हे मुख्य कारण समजलं जातं. पण असं होऊ द्यायचं नसेल तर त्या महिलेचं आसपासचं वातावरणदेखील प्रसन्न कसं राहील याची काळजी घेणं आवश्यक आहे. त्याची सुरुवात गर्भधारणेपासून करायला हवी. त्या महलेचं मन कसं प्रसन्न राहील, तिच्यावर कोणत्याही प्रकारचं दडपण येणार नाही. याची काळजी घेणं आवश्यक आहे. आपल्याकडे मुलगी नको, मुलगाच हवा अशा काही समजुती असतात, त्यांच्या तिच्या मनावर परिणाम होणार नाही याचीदेखील खबरदारी घ्यायला हवी. कारण हार्मोन्सप्रमाणेच वातावरणाचादेखील स्त्रिच्या मानसिकतेवर परिणाम घडत असतो. यातून बाहेर पडली नाहीच तर मात्र मानसोपचारतज्ज्ञांची भेट घेणं आवश्यक असतं.

◆◆◆

## आम्हाला फक्त आई-वडील आहेत

एका घर मालकाने घराबाहेर एक पाटी लावली होती त्यावर लिहिले होते 'ही जागा मुले नसलेल्या गिऱ्हाईकांनाच भाड्याने दिली जाईल.'तेव्हा अशाच भाडेकरूनी इथे यावे.

दोन तिन दिवसांनी दोन छोटी मुले त्या घर मालकाकडे गेली आणि नम्रतेने म्हणाली. ''काका ..काका.. आम्हाला ही जागा भाड्याने द्या. '' तुमच्या नियमाप्रमाणे आम्हाला कुणीही मुले नाहीत... फक्त एक आई आणि वडील आहेत आणि ती दोघेही शहाणी आहेत आणि मस्तीही करीत नाहीत.

**इन्दुमती दर्शने-ठक्कर**

*With Best Compliments from*

# S. L. Thakur

**Govt. Registered Contractor Mhapan**

# आठवणीतील सोळांकूर

**- नि. श. गुळवणी**

***त्याकाळी सोळांकूरातील रस्त्या- रस्त्यावर खेळल्या जायच्या गोट्या आणि विटी दांडू. तो एक महोत्सवच असे. क्रिकेट नंतर आलं. हल्ली कुठं कोणी हे खेळ खेळतात की नाही ते माहीत नाही परंतु ह्या साऱ्या अस्सल देशी खेळांची रम्य आठवण उर्वरित आयुष्याची एक रत्नजडित शिदोरी बनून राहिली. सोंगीभजन हे आम्हा मुलांकरिता खास आकर्षण असे. भजन हाच मुळी गावचा आत्मा होता.***

बालपण हाच खरंतर आयुष्यातील बहारदार, सर्वोत्तम असा काळ मानला गेलाय. जबाबदाऱ्या नसतात. हुंदडायला पूर्ण मुभा असते. खाण्या-पिण्यावर बंधन नव्हतं. सारंकसं अगदी दावणीतून सुटलेल्या मुक्त, मोकाट वासरासारखं वाऱ्यासम असतं. ते दिवस मुक्त आनंदासोबत तुम्हाला शिकवतात, घडवतात, भावी आयुष्याची धावपट्टी उभी करतात. माझं सारं बालपण सोळांकूरात सरलं हे खरंतर माझं भाग्य अन् व्यंकनाथाची कृपाच काय ती मानतो. माझ्या आठवणीतील ते चार दशकापूर्वीचं जुनं सोळांकूर आजही पावलोपावली मनात रुंजी घालत राहतं. आयुष्याच्या अंतापर्यंत सोबत करणाऱ्या त्या साऱ्या सुखद आठवणी आहेत.

हाकेच्या अंतरावर सह्याद्रीच्या पर्वतराशी आणि झोकदार वळत घेत गावची आस्थेने विचारपूस करीत पुढे गेलेली दूधगंगा माता ह्यांच्या आशीर्वाद गावातील व्यंकनाथ, विठोबा, ज्योतिबा, मारुती, नरसोबा आदी देवदेवतांसोबतच गावाला लाभला आहे. डोंगरमाथ्यावरून अखंड चैतन्यानं ओसंडून वाहणाऱ्या अन् दुतर्फा हिरव्यागार शेतांचा शालू ओढलेल्या नयनरम्य दूधगंगामातेला न्याहाळताना सोबतच कौलारू घरांची दारी करून उभं असलेले ते छोटेखानी. सोळांकूर न्याहाळताना मन प्रसन्नतेनं भरून जायचं. खरंच इतर गावांना हवा वाटावा असंच आमचं ते निसर्गाचा कोंदण्यात सजलेले सोळांकूर होतं आणि आहे. माती, खाचखळगे, धूळ, दगडधोंड्यांनी असलेल्या जुन्या सोळांकूरातीत रस्त्यांच्या दुतर्फा खापऱ्यांची मातीचीच साधी घरं उभी होती पण त्या घरांमध्ये बसत होता एक सच्चा सोळांकूर हेच त्याचं सर्वस्व असे, तेच त्याचं कुटुंब. असे नशिबी आलेले सारे भोग, सुखः दुखं ते सारे सोळांकूरवासी एकमेकांशी वाटून घेतच गुण्यागोविंदाने रहायचे. त्याकाळी शेतीची चार अवजारं आणि घरच्या माणसांसारखीच लाडाप्रेमाने वाढविलेली गोठ्यातली जनावरं सोडता घरात फारसा डामाडौल नसायचा पण त्या मनाची श्रीमंती, त्यात बरणारं प्रेम, आस्था, आपुलकी सदैव त्याच्या प्रसन्न चेहऱ्यावर दिसायची. डोईवर पांढरी टोपी किंवा पटका असा बापयांचा थाट तर सतत काही ना काहीतरी काम करणारी आमच्या सोळांकूरची माता-भगिनी रंगीत नऊवारी लुगड्यात खुलायची. पाय हेच वहान होतं अन्

बहुतेकवेळा त्या पायात वहाण नसायचीच. आम्ही पोरं ,टोरं तर वहाण घालून फिरणं हे नाजूकपणाचं लक्षण मानायचो.

चाळीस वर्षांपूर्वीचा तो काळ. सकाळ रेडीओवरील सुंदर भक्तिसंगीताने व्हायची. आजही ती सारी मधुर भक्तिगीतं ऐकताना सोळांकूरातील ती रम्य पहाट नजरेसमोर उभी राहते. बाहेर सडा-रांगोळी चाले, शेताकडे चाललेल्या जनावरांच्या घुंगरांचा आवाज कानी पडे अन् हवेत असाकाही सुखद गारवा असे की तातडीचे बाहेर येत सूर्यनारायणाचं ते तांबूस-गुलाबी रंगांनी नटलेलं ते प्रथमदर्शन घ्यायचा मोह आवरता आवरायचा नाही. शनिवारी ते कोवळं उन्ह तुडवत शाळेत जाताना तर इतका आनंद व्हायचा की येऊ घातलेली 'ऐतवारची' सुट्टी अधिकच रंजक वाटायची.



आमची शाळा सुरुवातीला कोंबडी केंद्रात भरे. दप्तरावरून उडणाऱ्या कोंबड्याही बाराखड्या शिकून घेत असाव्यात. गुरूजन तळमळीने शिकवायचे. मुळाक्षरांबरोबर मुळाक्षरं शिकविणारे एकच गुरुजी कायमचे आठवणीबंद झाले. पोरींना शिकून काय दिवे लावायचे आहेत असं मानणारा तो काळ. माझा वर्गातील एक-दोन हुशार मुली प्राथमिक शाळेपलीकडे जाऊ शकल्या नाहीत ही खंत आजही कधीकधी वाटते. आजकालच्या मुली खरंच मोठ्या भाग्यवान म्हणायच्या! पाचवीला कोंबडी केंद्रातून बढती घेत मुख्य शाळेत आलो आणि बा. म. पाटीलगुरुजींनी आमच्यावर वैचारिक संस्कार केले. शिवरायांचा तो सारा परिपूर्ण इतिहास वाचताना बाजूच्या सह्याद्रीच्या पर्वतराशींमधून मावळी घोड्यांच्या टापांचा ध्वनी कानी पडत असल्याचा भास व्हायचा. इतिहासाचं प्रेम त्या सह्याद्रीच्या रांगांनी मनात ओतप्रोत भरलं.

आमचं सोळांकूर देशभक्तीनं अगदी ओथंबून वहात होतं. प्रभात फेऱ्यांना सारा गाव हातातली कामं टाकून आपल्या झेंड्याला सलामी द्यायला वाकोबाच्या पटांगणात जमायचा. पोवारसरांचा कवायत घेतानाचा तो खणखणीत आवाज कुठेही तिरंगा दिसला की मनात घुमतो. भारत-पाकिस्तान सीमेवर ७१ चं युध्द पेटलं आणि आमचं सोळांकूर भक्कमपणे आपल्या सैन्याच्या पाठीशी उभं राहिलेलं मला आजही स्पष्ट दिसतं. याह्याखानची तिरडी घेऊन गावकरी फिरले. युध्दाच्या बातम्या ऐकायला स्टँडवर एकच झुंबड उडे. वर्तमानपत्रावर उड्या पडायच्या. भारतीय सैन्याच्या विजयाच्या बातमीने वातावरणात एकच जयघोष व्हायचा, निनाद घुमायचा.

त्याकाळी सोळांकूरातील रस्त्या-रस्त्यावर खेळल्या जायच्या गोट्या आणि विटी दांडू. तो एक महोत्सवच असे. क्रिकेट नंतर आलं. हल्ली कुठं कोणी हे खेळ खेळतात की नाही ते माहीत नाही परंतु ह्या साऱ्या अस्सल देशी खेळांची रम्य आठवण उर्वरित आयुष्याची एक रत्नजडित शिदोरी बनून राहिली. सोंगीभजन हे आम्हा मुलांकरिता

खास आकर्षण असे. भजन हाच मुळी गावचा आत्मा होता. थकला-भागलेला गावकरी आनंदाने रात्री भक्तिभावाने टाळ-मृदुंगाच्या जयघोषात सारं जग विसरून जात स्वत:ला झोकून द्यायचा. अधी-मधी छोट्या पडद्यावरचा सिनेमाही व्यंकनाथाच्या पटांगणात हजेरी लावून जायचा. कडक लक्ष्मीचे ते अंगावर चाबूक ओढून घेणं आठवलं की अंगावर शहारे येतात.

सोळांकूरच्या यात्रा आणि सण हे साऱ्या गावाला समावून घेत सजायचे. वाकोबांचा जागर हे सोळांकूराचं वेगळेपण. रात्री पालखीला आम्ही पोरं-टोरं उत्साहाने हजेरी लावायचो. विठोबाचा सप्ताह हा माझा लाडका सण असे. रात्री ऐनीचे, पंडेवाडीचे रामायण बत्तीच्या प्रकाशात पहायला मिळे. हनुमानाची एंट्री आम्हा पोरींना खुलवून जायची. लगेच आम्हीही गाल फुगवून 'हुप्प्' करायचो. आमच्या घरी गोकूळअष्टमीचा सण साजरा व्हायचा. अष्टमीच्या रात्री सारं गाव घरी जमायचं. आधी आठ दिवस ग्रंथवाचन चाले. वातावरणात पवित्रता अगदी ओसंडून वाहत राहायची. आमच्या बालमनावर तेव्हा आमच्या दादांनी ,श्रीपाद गुळवणींनी वाचनाचे संस्कार केले. आणि ते पुढे आयुष्यभर कामाला आले.

गावात दवाखाना आला, फिरते डॉक्टर आले, एसटी मुक्कामाला येऊ लागली, वाचनालय झालं, तालमीत लंगोटा कसून गडी डाव टाकायचे. तालमीबाहेर कधी-कधी शाहिरांचा पोवाडा वाजे अन् मराठी वीरांच्या आठवणीने वातावरणा भारून जाई. माध्यमिक शाळा निचिते गल्लीतून वाड्यावरल्या मोकळ्या हवेत गेली आणि तिथेच आम्ही लोंढे, मेरूचे, पोवार, व्हनवाडे, पानारी आदी आदरणीय गुरूजनांच्या मार्गदर्शनाखाली भाषा, गणित, विज्ञान, इंग्रजीचे सूर ग्रहण केले आणि त्या ज्ञानाच्या जोरावरच पुढील अभियांत्रिकीची आणि भाभा अणूसंशोधन केंद्रातील प्रशिक्षणाची स्वप्न साकार करता आली. साहित्य लेखनाचे बाळकडू सोळांकूरांच्या निसर्गातून,वेगळेपणातून, घरातील पोषक वाचन संस्कृतीतून, गुरूजनांच्या आपलेपणातून अन् पाठीवर वेळोवेळी शाब्बासकीची थाप मारणाऱ्या गावकऱ्यांकडून मिळत राहिले. कादंबरी, नाटक, कथा, लेख, एकांकिका भरपूर लेखन केलं. ह्या साऱ्या साहित्यसेवेची नाळ कुठंतरी बालपणीतील सोळांकूराच्या मातीशी घट्ट जुळलेली आहे हे मात्र निश्चित.

सोळांकूर बदललंय, बदलतंय आणि ते बदलायला हवं! बदल हाच खरा प्रकृतीचा स्थायिभाव. गावात चांगले रस्ते झाले, पाणी आलं, शिक्षण, वाहतूक, रुग्णायलं साऱ्या सुविधा झाल्या. कामाच्या व्यापात वर्षाकाठी भेट होते तेव्हा हे सारं पाहून बरं वाटतं. वाहनं वाढताहेत, रंग-रंगोटी होत आहे, समृध्दी येत आहे ही खरचं कौतुकाचीच बाब म्हणावी लागेल, फक्त ईश्वरचरणी इतकीच प्रार्थना आहे की, त्या जुन्या सोळांकूरातील गावकऱ्यांसारखं साऱ्यांनी एकदिलानं, एककुटुंब मानतच भविष्यात वाटचाल करीत राहावी आणि तीच आपलं ग्रामदैवत व्यंकनाथांची आम्हा साऱ्या भक्तांकडून अपेक्षा असणार. सोळांकूरची निरंतर भरभराट होत राहो हेच माझे वाकोबाचरणी दंडवत!

◆◆◆

## दूधवाला भैया

एकदा सुमित्रा बाईने दूधवाल्या भैयाला विचारले. अभी तुम बहोत दूध में पानी डालता है!

दूधवाला म्हणाला, क्या कहती है, भाभी, अभी कहा पानी डाला है. मैं तो घर में पानी डालता है!

**विजया गोरे**

*With Best Compliments From*

# M/s. Trimurty Construction

**Savantwadi**



# धाडू नको बाजारी

– ओमनी फीचर्स

*टिळक, आगरकरांची तत्त्वपालनाविषयीची आग्रही वृत्तीही विक्रेत्यांच्या अंगी पूर्णपणे बाणली असल्यामुळे आपल्याला काय हवे याची ग्राहकाला पूर्ण कल्पना असायला हवी असा त्यांचा आग्रह असे. त्यामुळे साडीच्या दुकानात गेल्यावर ग्राहकाने नुसते ''साडी दाखवा'' म्हटले तर हमखास ''कसली हवी ?'' हा प्रश्न विक्रेता विचारणारच ! कारण याविषयी ग्राहकाने पूर्ण विचार करूनच आपल्या दुकानात पाऊल टाकायला हवे*

खरेदीचा तिटकारा हा गुण माझ्या आईकडून माझ्या रक्तात उतरला असावा. दारावर येणाऱ्या मोळीविक्याकडून बरीच घासाघीस करून मोळी किंवा बोहारणीकडून आमचे जुने कपडे देऊन एखादेदुसरे भांडे घेण्यापलीकडे काही बिचारीच्या खरेदीची मजल गेली नाही. त्यातही पैसे मोजून घेण्याचे किंवा देण्याचे काम आम्हा भावंडांनाच करावे लागे. त्यालाही एक कारण होते त्या काळी मुलींच्या हातावर पैसा पडणे ही गोष्ट अशक्य कोटीतीलच ! एकदा जन्माच्या कर्मी बिचारीला तिच्या आजीने बक्षीस म्हणून दिलेली पावली म्हणजे आजचे पंचवीस पैशांचे नाणे घेऊन ती सगळा बाजार फिरली आणि काय घ्यावे याचा निर्णय न करता आल्यामुळे तिनं ती आपल्या नऊवारी लुगड्याच्या कडोसरीला लपवून ठेवली आणि तो अगदी अचूकपणे माझ्या विधवा आत्याच्या नजरेस पडली. ही आत्या म्हणजे वडिलांची मोठी बहीण, तिच्यासमोर बोलण्याची त्यांचीही प्राज्ञा नसे मग आईला तर तो विचारही करणे अशक्य. अशात तिचा हा अपराध, मला काय विचारता, ''आता काय अनुसया (माझी आई) स्वत: कारभार करू लागली ती आता आम्हाला काय विचारणार'' असा इतका त्रागा आत्याने केला की त्यापुढे शाहूमहाराजांनी स्वतंत्र कारभार सुरू केल्याबद्दल ताराबाई राणीसाहेबांनी केलेला त्रागाही फिका पडावा. त्यामुळे संत तुकारामानीसुध्दा निदान दुकान चालचण्यासाठी तरी पैशाला हात लावला असेल पण त्या माऊलींना मात्र त्यानंतर पैशाला कधी हात लावण्याचा आणि कसल्याही खरेदीचा व्यवहार करण्याचा अपराध केला नाही.

माझ्या बाबतीत मात्र असे काहीही न घडताच खरेदीविषयी असलेले माझे वैराग्य हा कदाचित माझ्या आळशी स्वभावाचाच भाग असावा. आमच्या गावात जो आठवडी बाजार भरायचा त्यालासुध्दा बाजारात मोकळ्या पिशव्या घेऊन जाणे आणि आमच्या व्यवहारचतुर भगिनींनी त्या भरून दिल्या की ''फोडिले भांडार धान्याचाच माल मी तो हमाल भारवाही'' अशा नि:संग वृत्तीने त्या खांद्यावरून घरी आणून देणे आणि आईच्या ताब्यात देणे एवढीच आमची म्हणजे माझी आणि माझ्या धाकट्या भावाची (त्यानेही अगदी लक्ष्मणासारका वडील भावाचाच आदर्श समोर ठेवला होता.) भूमिका असे. आपण काय आणि

कोणत्या भावाने आणतो याविषयी आम्ही इतके अनभिज्ञ असायचो की त्यामानाने कापूस आणि मीठ पाठीवरून वहाणारी इसापची गाढवंही जरा जास्त जाणीवपूर्वक माल वहात असतील पण त्यामुळे आम्हाला काहीही वसू खरेदी करून आणायला सांगण्याचे धाडस कोणी करत नसे. नाही म्हणायला वडिलांना दिवसातून एकवेळा लागणारे भिकुसा यमासा क्षत्रिय यांच्या उंटछाप विडीचे एक बंडल आणि त्याच्याकडे अधून मधून येणाऱ्या मित्रासाठी पिवळा हत्ती सिगारेट पाकीट या दोन वस्तूंची खरेदी मात्र करायला वडिलांना आमच्यापैकी कोणीही चालत असे. सुदैवाने त्या खरेदीचा चोरून उपभोग घेण्याचा मोह आम्हाला कधीच झाला नाही. त्याचेही कारण खरेदी केलेली वस्तू ज्याच्यासाठी असेल त्याला एकदाची देऊन मोकळे होण्याची आमची वृत्तीच!



मध्यंतरीच्या काळात महाविद्यालयीन शिक्षणासाठी शहरात एकटा राहू लागल्यावर खरेदीतील हा माझा अनुशेष भरून काढण्याची संधी जरी मला प्राप्त झाली होती तरी त्यासाठी लागणाऱ्या दामाजीपंतांची मेहेरनजर आमच्यावर नसल्यामुळे आणि तशाही अवस्थेत जी काही आवश्यक खरेदी असे तीही पुण्यासारख्या शहरात करायची पाळी आल्यामुळे ''आधीच उल्हास तशात फाल्गुनमास'' अशीच परिस्थिती होती. आज पुण्याच्या बाजारपेठेर फिरणाऱ्यांना मी ज्याकाळचे वर्णन करत आहे. त्यावेळच्या अतिउच्चसंस्कारित विक्रय तज्ज्ञांची कल्पना करता येणेही जरा कठीणच आहे. आताही त्याचे काही सन्माननीय अवशेष पाहायला मिळतात पण ते बरेच दुर्मिळ झाले आहेत असे म्हणायला हरकत नाही. त्याकाळात पुण्यातील बाजारपेठेत व्यापर म्हणे अगदी नाइलाजाने करावयाची गोष्ट असे मानणाऱ्या दुकानदारांचाच जास्त भरणा होता. त्यामुळे पुण्यातल्या बाजारपेठेतील विक्रेते ग्राहकावर आपला कमीतकमी वेळ कसा जाईल याबाबतीत इतकी दक्षता घेताना दिसत की वेळ आणि हालचाल (time and motion) याचा अभ्यासक गिलब्रेथ याने पुण्याच्या बाजारपेठेचा फेरफटका मारला असता तर आपल्या एक डझन मुलांना वेळेचा जास्तीतजास्त कसा सदुपयोग करावा याचे धडे देण्यात आपला वेळ आपण उगीचच वाया घालवायला त्याऐवजी त्यांना पुण्याच्या बाजारात पाठवून द्यायला हवे होते असे त्याला वाटले असते.

टिळक, आगरकरांची तत्त्वपालनाविषयीची आग्रही वृत्तीही विक्रेत्यांच्या अंगी पूर्णपणे बाणली असल्यामुळे आपल्याला काय हवे याची ग्राहकाला पूर्ण कल्पना असायला हवी असा त्यांचा आग्रह असे. त्यामुळे साडीच्या दुकानात गेल्यावर ग्राहकाने नुसते ''साडी दाखवा'' म्हटले तर हमखास ''कसली हवी ?'' हा प्रश्न विक्रेता विचारणारच! कारण याविषयी ग्राहकाने पूर्ण विचार करूनच आपल्या

दुकानात पाऊल टाकायला हवे अशी त्याची इच्छा असे. आपल्याला हव्या असणाऱ्या साडीचा रंग, पोत, काठाची आणि पदराची नक्षी याची किंवा छापील म्हणजे प्रिंटेड साडी हवी असेल तर छपाईत कोणते रंग, किती फुले, किती पाने प्रति चौरस सेमीमध्ये असावीत याची पूर्ण कल्पना ग्राहकाला असायलाच हवी किंवा शर्ट किंवा पँटसाठी कापड हवे असेल त्यावर डिझाइन कशा प्रकारचे व रंगाचे हवे त्याचे साद्यंत वर्णन ग्राहकाने करावे आणि आपला बहुमूल्य वेळ वाचवावा अशी दुकानदाराची अपेक्षा असे. यामागे साडया किंवा कापडाचे तागे काढण्या आणि परत ठेवण्यात वाया जाणारा बहुमोल वेळ वाचवणे हाच साधा हिशोब असे.

या वाचलेल्या वेळेचा सदुपयोग हे दुकानदार सामाजिक कार्यात म्हणजे भारताचे आर्थिक धोरण आणि त्याचे जगावरील परिणाम किंवा जागतिक मंदी आणि त्याचा भारतीय बाजारपेठेवर परिणाम किंवा सामाजिक क्रांती अशा गहन विषयावर चर्चा करण्यासाठी करत आणि या चर्चेमध्ये ते इतके रंगत की कापड मोजतानाही ती चर्चा बंद करणे त्याना मानवत नसे त्यामुळे ते हवे तेच आणि तेवढेच कापड देतात की नाही यावर आपल्यालाच डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवावे लागे. कापड फाडताना त्यांचा आवेश आपण प्रतिपक्षाच्या मताच्याच चिंधड्या करत आहोत असा असे.

विक्रेत्यांच्या या काटेकेरपणामुळे आणि माझ्या मुखदुर्बलपणामुळे बूट खरेदी करायला गेलेला मी बुटाबरोबर चपलाची जोडीपण खरेदी करून दुकानाबाहेर पडलो आहे असे होण्याऐवजी विक्रेत्याने दाखवलेल्या कमीतकमी बुटांच्या जोडीमधूनच आपल्याला खरेदी करणे भाग आहे या कल्पनेने एखादी डगळ बुटांची जोडी गळ्यात पडल्याने त्यात कागदाचे पॅकिंग घालून आणि तरीही बूट पायातून निसटतात की काय या भीतीने हळूहळू चालणे किंवा फार घट्ट बूट गळ्यात पडल्यास ते घालून लंगडत चालणे किंवा ते बूट चावल्यामुळे झालेल्या जखमांमुळे अनवाणीच चालावयास लागणे अशाही संकटात सापडलो होतो. लग्नानंतर अर्थातच खरेदीचे खाते माझ्यावर सोपवण्यात आले नाही कारण त्यामुळे हव्या त्या वस्तू हव्या त्या वेळी घरात येणार नाहीत याविषयी गृहखात्याची खात्रीच असावी, त्यामुळे मी माझी नेहमीचीच दुय्यम सहाय्यकाची भूमिका इमानेइतबारे बजावत असतो. मात्र त्यामुळे एक महत्त्वाचा तोटा असा होतो की कधी कधी गृहखात्याने एकाच वस्तूच्या खरेदीविषयी असमर्थता व्यक्त केल्यास खरेदीसाठी तज्ज्ञ व्यक्तीची नेमणूक करणे भाग पडते. घरगुती माझ्या शत्रुपक्षातले म्हणजे बायकोचे नातेवाईक असतात पण त्यांची नेमणूक करण्याची मात्र माझ्यावर असते. हा प्रकार म्हणजे आपण झाडाच्या ज्या फांदीवर बसलो ती आपल्याच हाताने कापणे (तेही अगदी मसजून उमजून) त्यातलाच प्रकार. या तज्ज्ञ व्यक्तींच्या सल्ल्याविषयी माझा अनुभव काही फार उत्साहवर्धक नाही. त्या / तिच्या सल्ल्याने खरेदी करण्यात आलेली वस्तू हमखास खराब निघते किंवा बिघडते. पण तज्ज्ञ व्यक्तीची नेमणूक ती वस्तू का बिघडली किंवा ती बिघडण्यामागे आमचाच कसा हात आहे याचे विश्लेषण करण्यासाठीच असल्यामुळे त्यांच्यावर टीका करणेही शक्य नसल्याने मीरेप्रमाणे हसत हसत हा विषाचा प्याला प्यावा लागतो. त्यामुळे झालेला गोंधळ जरी मला निस्तरावा लागला नाही तरी होणारे नुकसान मात्र घरंदाज घराण्यातील सुनेसारखे (ही वस्तू दूरदर्शन मालिकात मुबलक प्रमाणात दिसू लागली आहे.) निमूटपणे सोसावे लागते. मात्र ज्या पुण्याने माझ्या खरेदीतील अरुचीला जास्तीत जास्त खतपाणी घातले त्याच पुण्यात आज

परिस्थिती बरीच सुधारलेली दिसते. काऊंटरवर कापडाचे शेकडो तागे किंवा साड्या पडल्या आहेत तरीही समोरील पुरंध्री स्वत:च्या चेहऱ्याची घडी अजिबात बिघडू देत नाही पण त्यामुळे नाऊमेद न होता पहिल्यापेक्षाही अधिक उत्साहाने आणखी तागे अथवा साड्यांचे ढीग हसतमुखाने काढणारा किंवा काढलेल्या ढिगाऱ्यातील खालून दुसरी किंवा तिसरी (हे या स्त्रियांच्या बरोबर कसे लक्षात राहते हे त्यांचा निर्माताच जाणे) साडी परत एकदा दाखवा या विनंतीला मान देताना तिची मानच चिरून टाकावी अशी मनातील तीव्र इच्छा लपवून ती आपल्याला एखादा गौरव पुरस्कारच देत असल्यासारखा चेहरा करून त्या ढिगाऱ्यात हात खुपसून बरोबर तीच साडी बाहेर काढणारा विक्रेता आपल्याला स्वप्नातच पहायला मिळेल असे मला वाटायचे पण ते आता प्रत्यक्षात उतरलेले दिसते.

आता तर सगळीकडे अगदी मॉलमॉल झाल्यामुळे स्वत:च दुकानात हिंडून हव्या त्या वस्तू हातगाडीत टाकून बाहेर पडताना त्याची किंमत चुकती करण्याची पध्दत आपल्याकडेही बरीच रुजायला लागली आहे. त्यात हवी ती वस्तू न सापडण्याची एक किरकोळ अडचण असते पण त्यासाठीही त्यांचे सहाय्यक तत्परतेने मदत करायला तयार असतातच. हे लोक तर तुम्हाला खरेदी करायला लावण्याचा चंग बांधूनच बाजारात उतरले आहेत त्यामुळे एकावर एक (किंवा दोनसुध्दा) फुकट हा प्रकार इथेही रुढ झालेला आहे. इतक्या प्रलोभनामुळे तरी मी खरेदीचा आळस सोडेन असे वाटण्याचा काळ मात्र आता केव्हाचाच गेला आहे. मात्र याची पूर्ण कल्पना इतरांना असल्याने ''धाडू नको मज बाजारी'' असे म्हणण्याची पाळी मात्र क्वचितच माझ्यावर येते.

◆◆◆

*With Best Compliments from*

# DOT Constltant

# नशिबाचा खेळ

**– सुजाता मेहता**

***पण तिने जणू जन्मताच लिहून आणले होते की, तू सुखी राहूच नकोस. तिच्या मोठ्या मुलाचा शाळेत जाताना ॲक्सीडंट झाला आणि त्याचा डावा पाय कायमचा गमवावा लागला. विचार करवत नाही की या मुलीने खरंच किती संकटांना तोंड द्यावं आणि कां ? तिच्याच वाट्याला हे का ? नशिबाचा हा भोग तिच्या कधी संपणार. डाव्या पायाने सुरू झालेली संजनाची कर्मकहाणी मुलाच्या पायाने तरी संपावी हीच ईश्वराकडे प्रार्थना आता.***

विचार करून डोकं फुटायची वेळ आलेय. का हे सारं माझ्याचं मुलीच्या नशिबी. काय दोष तिचा ? खरंच पूर्वजन्मी आपण काही केलेल्याचे भोग या जन्मात फेडतो का ? तसंच असेल नाहीतर माझ्या संजनाच्या नशिबी इतके भोग का आले असते.

आजही आठवतंय सारं अगदी स्पष्ट जणू आपल्या नशिबाचा एक चित्रपटच. कधीही विसरू न शकणारा. भारत आणि मी पती–पत्नीच्या बंधनात अडकलो. काळ अतिशय सुखाचा. फार श्रीमंत नाही तरी खाऊन पिऊन सुखी असणारं सासर मिळालं होतं. भारत एक किराणा मालाचे दुकान चालवत होते. त्यांचे माझ्यावर अतिशय प्रेम. नवा नवा संसार. अगदी सुखाच्या हिंदोळ्यावरच झुलत होतो आम्ही. त्यातच मला दिवस गेले. मगतर काय माझे लाड कोड कौतुकाला उधाण आलं होतं. पहिलीच मुलगी झाली. साऱ्यांनी लक्ष्मी आली दारी म्हणून पहिल्या बेटीचं हसत स्वागत केलं. मीही तिच्या संगोपनात दिवस–रात्र बुडून गेले.

संजना नाव ठेवलं तिचं. फारच चपळ , सुंदर, बोलकी संजना सगळ्यांचीच लाडकी झाली. तिच्या पाठीवर दोन वर्षांनी संजय आणि संकेतचा जन्म झाला. संसारात तृप्त आणि समाधानी होते. एके दिवशी संजनाला ताप आला. डॉक्टरांकडे नेऊन तिला औषधे आणली. पण ताप उतरतच नव्हता. पुन्हा पुन्हा १०४, १०५ पर्यंत ताप आला. घाबरून मी तिला डॉक्टरांकडे नेले. इंजक्शन दिले. आणि आम्ही तिला घेऊन घरी आलो. ताप उतरला पण ती बेडवरून उतरेना. म्हणून आम्ही दोघांनीही दिला उठवून उभी करण्याचा प्रयत्न केला तर ती डावा पाय टेकेचना. म्हटलं तापाने अशक्तपणा आला असेल. मग परत तिला झोपवून ती रात्र तशीच गेली. सकाळी उठल्यावर संजनाला परत म्हटलं उठवून ब्रश वगैरे करायला लावू या तर ती डाव्या पायाने लंगडत होती. तशीच तिला घेऊन हॉस्पिटलला गेलो आणि समजले की तिला पोलिओ झाला आहे.

वयाच्या सहाव्या वर्षी माझी मुलगी अधू झाली कायमची. हे दु:ख पचवणं फार फार जड गेलं. घरातील आनंदच संपला. दोन्ही मुलं शाळेत जात होती पण माझं

कशातच लक्ष लागत नव्हतं. संजनाच्या काळजीने मन कुरतडून निघत होतं. तिच्या काळजीत आम्ही दोघेही रात्र रात्र झोपत नसू.

हळू हळू संजना डाव्या गुडघ्यावर हात टेकून चालत शाळेत जाऊ लागली. पदरचे दु:ख झाकून पुन्हा नव्याने आम्ही संसारात मन रमवू लागलो. हळूहळू संजना वयात येऊ लागली. रूपाने आणि अंगानेही भरू लागली. बघताक्षणी कुणालाही आवडायची इतकी सुंदर मुलगी पण चालताना बघितली की समोरचा लगेच अरेरे ''देवाने किती अन्याय केलाय हिच्यावर'' असे म्हणे.



फारसं शिक्षणही ती ह्या पायामुळे घेऊ शकली नाही आणि आता तिच्या लग्नाचा विचार मानत येऊ लागला. कोण स्वीकारेल आपल्या मुलीला याचीच चिंता वाटू लागली. मुंबईमध्ये तर स्थळ मिळेना. मग म्हटलं गावाकडे बघूया आणि पायाच्या दृष्टीने गावाकडच्या स्थिर लाइफमधेच तिचा टिकाव लागेल. अशातच चंदरच स्थळ कुणीतरी सुचवलं. घरची गरिबी आहे पण मुलगा चांगला आहे आणि मेहनती आहे. संसारापुरते नक्की कमवेलं अस समजलं.

मग दाखवायचा कार्यक्रम झाला. तिच्या पायाचे पण सांगितले. पण चंगर मुळातच शांत आणि समंजस होता. त्याने अतिशय प्रेमाने संजनाचा स्वीकार केला. म्हटलं चला आता आपण सुटलो मुलीच्या काळजीतून. चांगला जावई मिळालाय आता तिला फारतर थोडी आर्थिक मदत करू पण बाकी चिंता नाही.

पहिलं बाळंतपण मी हौसेन केलं. दुसरं सासरी झालं आणि हळूहळू संजनाची गाडी रुळावर चालते म्हटल्यावर मी पण निश्वास सोडला.

आणि अचानक एके दिवशी तिचा मला फोन आला. आई मी तिकडे येतेय. बहुधा दिवस गेलेत वाटतंय. इथे मी कुणालाच काही बोलले नाही. फक्त यांना माहीत आहे. ते म्हणाले आईकडे जा आणि गर्भपात करून घे. मी म्हटलं ठीक आहे तू ये मी बघते सर्व.

संजना मुंबईला आली. नुकतेच तीन-चार दिवसच झाले होते म्हटलं पाहू या वाट येतेय का पाळी. नाहीतर ८/१० दिवसांनी विचार करू. काय करायचं त्याचा.

तिकडे गावी पुरुष नसबंदीचा कॅम्प लागला होता. चंदरच्या मनात आलं संजनाला पण पायामुळे खूपच त्रास होतो. त्यात आता हे फुकटचे टेंशन नको. आपणच आपलं ऑपरेशन करून घेऊया. याप्रमाणे दोघांचं फोनवर बोलणं पण झालं की इकडे हिने ऑपरेशन करून घ्यायचा आणि त्याने नसबंदीचा ऑपरेशन.

दुसऱ्याच दिवशी चंदर त्या कॅम्पमध्ये हजर झाला. ऑपरेशन करून घरी आला. आणि काय दुदैव त्याची कुठली तरी नस कापली गेली होती. अंतर्गत रक्तस्त्राव होऊन तो खूपच सिरीअस झाला. इकडे संजनाला त्याप्रमाणे फोन आला. म्हणून आम्ही तिला घेऊन लगेच गावी गेलो. फक्त तिसऱ्याच दिवशी चंदरने आपले प्राण सोडले. आणि संजनावर आकाश कोसळले.

काय झालं कसं झालं हे समजण्याच्या आतच चंदर सर्वांना सोडून गेला. अतिशय गुणी माणूस होता तो. संजनाचा तर सर्वस्वच होता. दोघांचं एकमेकांवर इतकं प्रेम होतं की म्हणून त्याने स्वत:च ऑपरेशन करून घेण्याचा निर्णय घेतला होता.

संजना, मी आणि हे तिघंही सुन्न मनाने दिवस पार पाडत होतो. पण संजना आता पूर्ण कोसळली होती. दोन लहानग्यांना घेऊन ती शून्यात नजर लावून एखाद्या भूतासारखी बसून रहात होती. या सर्व दगदगीत तिच्या ऑपरेशनचं आम्ही विसरूनच गेलो होतो.

तिच्या सासू सासऱ्यांना धीराचे चार शब्द सांगून आम्ही मुंबईला आलो. भकास मनाने संजनाच्या काळजीचे ओझे पुन्हा एकवार डोक्यावर घेऊन रहात होतो.

तिकडे संजनाला चार महिने झाल्यावर तिचे सासू-सासऱ्यांना सांगितले की मी खरंतर मुंबईला ऑपरेशनचा करायला गेलो होतो पण या साऱ्या धकाधकीत ते राहूनच गेलं तर त्या दोघांनी इतका तमाशा केला. तिच्यावर घाणेरडे आरोप केले हे मूल त्याच नाहीच इतकचं बोलून ते थांबले नाहीत तर तूच गीळलस आमच्या मुलाला हाही दोष लावला. दुर्दैवाची आणखी एक तोफ तिच्यावर डागली गेली मुळातंच पती निधनाने हल्लक झालेली संजना या आरोपाने हबकून गेली. जबाबदारी नको म्हणून त्यांनी लबाडीने तिला घराबाहेर काढले.

आणि एके दिवशी भल्या पहाटे संजना दोन मुलांना आणि पोटात असलेल्या तिसऱ्याला घेऊन कायमची माहेरी आली. कुणी कुणाचं सांत्वन करायचं आणि कुणी कुणाला सावरायचं असं होऊन गेलं.

माझी मुलं तशी समंजस होती. त्यांनी ताईला तिच्या बाळासहित आपलंसं केलं. पण दुर्दैवाची मालिका थांबायला तयार नव्हती. त्यांना आपल्या मुलीवर कोसळलेल्या दु:खांनी असह्य झालं. छातीत थोडं थोडं दुखत होतं पण त्यांनी दुर्लक्ष केलं. लेकी साठी काय करता येईल याचाच विचार ते करत होते.

अतिशय नाराजीतच संजनाचे तिसरे बाळंतपण पार पडले. पुन्हा नवीन पाहुणा घरात आला. पण कुणालाच उत्साह नव्हता. या साऱ्या दगदगीत यांच्या तब्बेतीकडे यांनी पूर्ण दुर्लक्ष केलेलं आणि एक दिवस दुकानात छातीत दुखल्याच निमित्तं होऊन त्यांना ॲटक आला आणि त्यांनी तिथेच डोळे मिटले.

काय करणार होते मी तरी आता. संकटाची मालिका संपतच नव्हती. जगण्याची इच्छाच संपली. असं वाटे मारावी उडी भरलेल्या नदीत. पण नाही ना हेही जमत. पित्याने थोडं काही केलं असत संजनासाठी तर तेही संपलं. काय कराव त्या पोरीने ? पायाने अधू म्हणून ना काही काम करू शकत ना नोकरी.

मुलांनी खटपट करून अपगांना सरकारकडून मिळणाऱ्या टेलिफोन बुथची सोय केली. तिच्यासाठी दिवसभर बुथवर तिचा वेळही जात होता आणि चार पैसेही मिळत होते.

पण तिने जणू जन्मताच लिहून आणले होते की, तू सुखी राहूच नकोस. तिच्या मोठ्या मुलाचा शाळेत जाताना ॲक्सीडंट झाला आणि त्याचा डावा पाय कायमचा गमवावा लागला. विचार करवत नाही की या मुलीने खरंच किती संकटांना तोंड द्यावं आणि कां ? तिच्याच वाट्याला हे का ? नशिबाचा हा भोग तिच्या कधी संपणार. डाव्या पायाने सुरू झालेली संजनाची कर्मकहाणी मुलाच्या पायाने तरी संपावी हीच ईश्वराकडे प्रार्थना आता.

◆◆◆

*With Best Compliments From*

# M/s. Vasant Construction

**Mumbai**

# माझी वजनदार गोष्ट

**– वैशाली संजय सांगावकर**

*डायरी पाहून आपण किती माणसे जोडली आहेत असं म्हणत उगीच आरशात डोकावले. आपलं व्यक्तिमत्त्व जास्तच 'वजनदार' जाणवलं पण..... अभिमानान हं !*

मागची बरीच वर्षे मी पेपरमध्ये, पुस्तकांतून, मासिकांतून वजन कसे कमी करायचे याबद्दल वाचतेच आहे. बऱ्याचदा त्याची सुरुवात ही केलीच पण शेवट काही झाला नाही असो.

पण यावर्षी मात्र एक गोष्ट करायची नक्की ठरवली की आपलं वजन कमी करायचं! बरेच लोक नवीन वर्षाची सुरुवात; जानेवारीत असे संकल्प सोडतात पण मी मात्र ठरवलं की आपलं जग म्हणजे मुलामुलींच्या शाळा जूनच्या सुरू होतात मग आपणही आपला नवा संकल्प जूनला सुरू करूया.

जून महिना सुरू झाला. मुलांचे दप्तर, वह्या,पुस्तके, रेनकोट, छत्र्या घेता घेता जूनचा मध्य आला ठीक आहे. शाळेची सुरुवात व आपली वॉकिंगची सुरुवात एकाच दिवशी करू! रात्री शूज वगैरे शोधून ठेवले. पिंकीला खाली सोडायला जाताना आपणही वॉकिंगला जायचे ठरवले. असे आज शाळेचा पाहिला दिवस उजाडला. काहीतरी स्पेशल हवयं! मग काय उशीर झाका टाइम टेबल बिघडलं. अन् तेच त्यादिवशी वॉकिंगला सुट्टी चालेल मनात म्हटलं, आजचा तर पहिलाच दिवस ना! उद्या बघू.

दुपारी पिंकी अगदी उड्या मारतच घरी आली. मला मिठी मारत म्हणाली, 'मॉम, यूआर ग्रेट! तू डब्याला दिलेले चिझ टोस्ट सर्वांना आवडले अन् सर्वात हुशार मुलीशी माझी मैत्रीपण झाली. उद्या शेजवान राइस डब्याला आणणार म्हणून मी सर्वांना प्रॉमिस केलंय! मुलीच्या आनंदाने व माझ्या पाक कौशल्यामुळे माझं वजन शाळेतही वाढलंच.

मग काय हे रोजचच सुरू झालं. आज काय बटर डोसा, उद्या काय बटाटा वडा, मसाला इडली, सॅन्डविच विथ मेयॉनीज इ. मुलं शाळेत गेल्यावर आता फक्त आपल्यासाठी कशाला नवीन नाष्टा चला हेच खाऊया!! बघता बघता जून संपला.

जुलैच्या सुरुवातीला मनात म्हटलं जाऊ दे. नवीन रूटीन मलाच नवीन वर्ष. थोडी वजनाची हेळसांड होणारच. पण हा महिना मात्र नक्की वाया घालवायचा नाही. नेहमीप्रमाणे दिवस उजाडला. वॉकिंगचे वेध लागले पण आज पाऊस जरा जास्तच पडत होता. पावसात भिजले तर सर्दी, पडसं, खोकला......नकोच बाई वॉकिंग.

त्या दिवशी बाजारात पवारबाई भेटल्या होत्या. योगाला येणार का म्हणून विचारलं ? मी तत्काळ होकार दिला. विचार केला पावसाळा संपेपर्यंत इनडोअर योगाच बरा. झालं. योगाची जय्यत तयारी केली. कपडे वगैरे!

जावेला, आईला फोन करून कळवले मी दुपारी योगाला जाणार आहे. फोन करू नको. त्यावेळी घरी मंडळी सर्व आनंदात.....चला आई दुपारी दोन तास तरी घरी नाही म्हणजे टी.व्ही. आपला. पण मी तरी काय करणार काहीतरी कमवायला (खरंतर वजन) काही गमवायला लागणारचं! पण हा अंदर का गम अंदरच रहने दो.

आज रिमाच्या घरी भिशी होती. शाळा सुरू झाल्यानंतरची पहिलीच भिशी म्हणून बेत मस्त होता. भेळपुरी, पाणीपुरी, वडा, पावभाजी, भजी तर हवीतच. तशी पावसाळा सुरू झाल्यापासून मेन्युकार्डवर भजी मस्टच! भिशीमध्ये पुढे कोणाकडे काय काय करायचे हेही ठरतंच. म्हणजे नवीन जॉइन झालेल्या राठोडबाई मालपुवा अन् डालबाटी करणार होत्या. सिमाने सुट्टीत पेस्ट्री अन् पास्ताचा कोर्स केल्याने तोच तिचा मेनू होता. स्नेहा पुरणपोळी तर रेणू पंजाबी डिशेस करणार होती. मी योगाला जाणार असल्याचं व डायट करणार आहे ही खबर सर्वांना दिली. सर्वजणींनी डोळ्याच्या कोनातून एकमेकींकडे पाहिले. मी म्हटलं की महिन्यातून एकदाच आपण भेटणार ना. तर त्यावेळी खायला काय हरकत नाही माझी. मी नक्कीच तुमच्या डिशेस खाणार.

झाली सुरुवात! माझ्या योगा सुरू झाला. मी स्वप्नात पाहिले देखील की वजनाचा काटा सर्र....सर्र डावीकडे वळत होता. आरशासमोर उभी राहून दोन महिन्यांनी नक्की सिंगापूरहून दोन वर्षांपूर्वी आणलेला ड्रेस घालायचाच हे पक्कं ठरवलं. मुलं, नवरा सतत माझ्या वजनाकडे बघून टोमणे मारतात काय. आता बघाच! १५ दिवसात मलाही थोडे हलके हलके वाटू लागले.

ऑगस्ट सुरू झाला अन् मुलांच्या चाचणी परीक्षांच्या टेन्शनमध्ये योगाला दांडी झालीच. पण जाऊ दे पहिलं कर्तव्य मुलं....मग वजन. कॅलेंडर उघडलं, अरे हे काय! मस्त योग जुळून आलाय ह्या महिन्यात. अहो कसला म्हणून काय विचारता, श्रावण! छानच, आता दुधात साखर म्हणजे मी श्रावणीच करते ना! पण एकावळ हा, योगाबरोबर. नक्की वजनही आटोक्यात योणारच.

आता तुम्हाला माहीतच आहे की श्रावण म्हणजे उत्सवाचे उधाण. पहिला शुक्रवारच म्हणजे पुरणपोळी हवीच देवीला साग्रसंगीत नैवेद्य हवाच. पुरणपोळी म्हटली की किती तो उपद्व्याप. म्हणजे दोन दिवस तरी हाच मेनू हवा. मुलांना आवडतातही. आता श्रावण म्हणजे नो नॉनव्हेज मग रविवारी स्पेशल मिसळ रात्री सोप्यात सोपं म्हणून दुपारीच श्रीखंड मागवूया म्हणजे पोळ्या लाटल्या की झाला स्वयंपाक. हुश्य!! तेवढ्यात अमिताचा फोन आला सवाष्ण बोलण्यासाठी पण मी म्हटलं तिला अगं माझं डायट आहे. तर म्हणाली, 'अग एका दिवसानं तुझं काय ते वजन वाढणारेय.' खरचं होतं म्हणा तिचं. श्रावण म्हणजे सणासुदीला सुरुवात मग काय....सोमवारी शंकराला आटवलेली बासुंदी, मंगळावारी थालीपिठं, बुधवारी उकडीचे मोदक, गुरुवारी शिरा, शुक्रवारी देवीला पुरणपोळी इ. पण हे सर्व आपली परंपरा जपण्यासाठी हो. देवांना कसा नैवेद्य पूर्ण हवाच, वर माझाही एकवळ.

उपवास काही जेवायचे नाही म्हणून मी थोडी तयारी केलीच होती. म्हणजे केळी, केळ्याचे वेफर्स, बटाट्याचे वेफर्स, साबुदाण्याची खिचडी , वडे, राजगिराच्या पुऱ्या, कधी मसाला दूध, अधेमधे ड्रायफ्रुटस् बस इतकेच.

चला श्रावण संपला अन् हे काय गणपती आले. दहा दिवस सकाळी-संध्याकाळी आरतीला जावेच लागते सोसायटीमध्ये. आरतीसाठीच हं. नंतरच्या प्रसादासाठी नाही. पण करणार काय प्रसादाला नाकारायचं कसं? रोजचे

२५-३० वेगळेवेगळे पदार्थ. गणपतीचे पोट फक्त वासाने इतके भरलेले दिसते तर आपले खाऊन थोडे वाढणारच ना! गणपती उत्सव संपला. योगापण मध्ये मध्ये गुल होतच होता. वजन काट्यावर भलतंच काही दिसत होतं. एक दोनदा काटा आदळआपट केलाही पण काटा काही हलतच नव्हता! म्हटलं जाऊ दे रितिरिवाज, उत्सव यात थोडी तरी वजनाची हेळसांड होणारचं.


पण आता मात्र पक्के ठरवलेच की वजनाचा काटा डावीकडे वळवायचाचं. श्रावण, गणपतीनंतर थोडाफार नोनव्हेज झालचं... मुलांसाठी हो. गोड खाऊन कंटाळली होती ना. पुन्हा नवरात्री येणार म्हणून.



नवरात्रीला परत मला आनंद झाला. नवरात्रीत उपवास करूयात. म्हणजे पुण्यही मिळेल अन् वजनही घटेल. आमचं एक भजनी मंडळ आहे. नऊ दिवसात एकाकडे आम्ही भजन करतो. भजनानंतर थकवा येईल म्हणून सक्काळी सक्काळी (भरपेट) उपवासाचे पदार्थ खाऊन घेतो. संध्याकाळी प्रत्येकाकडे काहीतरी खास असतेच. नाहीतरी वर्षातून एकदाच जातो ना त्यांच्याकडे मग काय प्रशांतची बासुंदी, टिपटॉपची उपवासाची मिसळ, घरचे साबुदाणे वडे इ. करणार तरी काय? यजमानांचा मानही राखायला हवाचं. ह्या सगळ्या घाईत वजनावर मात्र माझा वचक (की वजन) बसलाच नाही. साडेतीन मुहूर्तातील दसरा देखील मस्त गोडाधोडात साजरा केला.

त्यानंतर मात्र पक्के ठरवलं की उपवास नसले तरी डायट कंटिन्यू ठेवायचे. थोडा थकवाही मावळलाच होता. अन् हे काय दिवाळी ही आलीच तोंडावर. चला सामानाची यादी करूयात; साखर, मैदा, तूप, रिफाइन्ड ऑईल,रवा...... इ. इ.

अरे, घरी लक्ष्मीचा वास असण्यासाठी म्हणून हे सर्व. वर्षाची दिवाळी म्हणजे सर्व फराळाचे पदार्थ करायलाच हवेत. मनाची नाहीतरी जनाच्या लाजेखातर! कोणी आले गेले तर रिकामे थोडेच पाठवणार. पण दिवाळीच्या साफसफाईत मी वजनाचा काटा मात्र सफाईतदारपणे माळ्यावर ठेवला. टेलरला कपड्यांचे माप जरा अंमलच दिले. उगीच मागच्या लक्ष्मी पूजनाच्या वेळेसारखी फजिती नको. म्हणजे नव्या साडीचा ब्लाऊज



आलाच नाही, मग जाऊ मात्र गालातल्या गालात हसत होती.

दिवाळी झाली. वर्ष जणू संपतच आले. पण माझ्या कॅलेंडरचे मात्र अजून सहा महिने होतेच जूनपर्यंत. माझी डायरी काढली. डिसेंबर म्हणजे ॲनीव्हरसरीचा महिना, आमची, जावेची, नणंदेची वगैरे. पार्टीचे दिवस मात्र वाटूनच घ्यायला हवेत. म्हणजे काय वर्षातून एकदाच भेटतो ना! पार्टी हवीच. पण ह्यावर्षी घरी नको. कामातून बोलायला वेळच मिळत नाही. म्हणून आम्ही चक्क हॉटेल वाटून घेतली. म्हणजे एकानं चायनिज्, एकानं पंजाबी, राजस्थानी, मालवणी वगैरे.......

जानेवारीत काय आहे? रिमाच्या नणंदेच डोहाळजेवण म्हणजे बारसं. मार्चमध्ये. जानेवारीत संक्रांतीनतर तर आम्हला इकडे तिकडे बघायलाही वेळ नसतो. दिवस पुरत नाहीत हळदी कुंकवाला. रोज कुणाकडे, एकाच दिवशी दोघींकडेही. अन् प्रत्येकीला आपल्या पाककौशल्याची कला ही दाखवायची असतेच की! पण वर्षातून एकदाच इ.

पुढची डायरीची पाने ही समारंभाच्या तारखांनी हाऊस फुलचं होती. फेब्रुवारीत आत्याच्या मुलीचा साखरपुडा, कोमलच्या घराची वास्तुशांती, सुधीरच्या ऑफिसचे उद्‌घाटन, यांच्या ऑफिसची पार्टी (इंटरनॅशनल हॉटेलमध्ये) मिनूचा वाढदिवस, काकांची एकसष्टी अबब!!! अन् मामा-मामीच्या शेवटच्या मुलाचे लग्न. मुद्याम परीक्षेनंतरचा मुहूर्त धरला होता. मामीचं आग्रहाच आमंत्रण होतंच. म्हणाली होती, 'बघा बाई, शेवटचंच मोठं कार्य . घ्या सांभाळून' अन पदराचे टोक डोळ्याला लावले तिने म्हणजे मुहूर्तमेठ,सवाष्ण, देवकार्य, हळदी, पूजा नंतर गोंधळ सर्व योगाने आलेच. 'मे' च्या सुट्टीच्या यावर्षी दादाकडे दिल्लीला जायचे ठरलेच आहे. त्याच्या बदलीनंतर गेलोच नाही. वहिनीही किती आग्रह केलाय. तिथल्या पाणीपुरीचा, डाळमाखणी व मऊ, लज्जतदार पनीरचा वास आत्ताच नाकापर्यंत येऊ लागलाय. असो.

डायरी पाहून आपण किती माणसे जोडली आहेत असं म्हणत उगीच आरशात डोकावले. आपलं व्यक्तिमत्त्व जास्तच 'वजनदार' जाणवलं पण.....अभिमानान हं!

◆◆◆


*With Best Compliments from*

**Venkatesh Construction Co.**

**Venkatesh Bammanakatti**
**B.E. (civil)**



1 Gokul Niwas, Opp. Telugu Church,
Sahar Village, Andheri (E), Mumbai -99
Mob : 9773430400 /9863475441
E mail : venkateshvb90@rediffmail.com
venkateshvb90@gmail.com

# नात्यांचे पाश तुटलेली नाती

- गिरीजा र. पागनीस

*आज सकाळी ते गाणं ऐकताना तिच्या हातांत साखळी होती. नमूताई चहा ठेवायला आल्या होत्या. रेडिओवर गाणं चालू होतं. 'टिक टिक वाजते डोक्यात - ठकठक वाजते ठोक्यांत........' अन् तिनं शेवटचा श्वास घेतला. शांतपणे......अगदी शांतपणे. या विकृत, भोगवादी, स्वार्थी, मतलबी लोकांपासून ती फार दूर गेली होती. कायमची नात्याचे पाश सोडून.*

शकुनताई कॉटवर डोळे मिटून पडल्या होत्या तसं पाहिलं तर आजकाल त्या बरेच दिवस तशाच पडून रहायच्या पण आज जरा त्या वेगळ्या वाटत होत्या.

आणि बघायला गेलं तर या 'माहेरघर' नावाच्या या वृध्दाश्रमात त्या काय करणार होत्या हेही तितकचं खरं. हल्ली त्या शरीरानं तर थकल्या होत्याच पण त्याहीपेक्षा मनाने जास्त.


मनूताई त्यांच्या रूमच्या सेवेकरी बाई होत्या त्यांनी अगदी अदबीनं आणि प्रेमाने त्यांच्या बाजूच्या टेबलावर चहाचा कप ठेवला पण शकुनताईंची तंद्री लागली होती. बाजूच्या बिल्डिंगमध्ये कुठे गाणे लागले होते 'टिक टिक वाजते डोक्यात' हे गाणं ऐकून शकुनताई त्यांच्या कॉलेज जीवनात पोहचल्या. अगदी पन्नास वर्षांपूर्वी त्यांनीही एकेकाळी कॉलेजजीवन एन्जॉय् केलं होतं. स्पोर्टस्, डिबेटिंग, नाटक कशाकशांत म्हणून त्या कमी नव्हत्या. साहजिकच कॉलेजमधील व आजूबाजूच्या एरियातील हीरोंचा ससेमिरा असायचा. अगदी गुळामागे मुंगळे जसे.

त्यात मुख्य हीरो होता धैर्यवान शिर्के. मोठा रुबाबदार. नावाप्रमाणे ऐटबाज! बाईकवरून यायचा, डौलात पार्क करायचा. शकुन कुठं दिसते का ते हेरायचा आणि ती ज्या वर्गात ,ज्या लेक्चरला असायची तिथं जाऊन बसायचा. परंतु शकुनला याची जाण नसायची. काही मुली चिडवायच्या पण तिनंही फारसं लक्ष दिलं नाही त्यांच्याकडे.

इकडे गावाकडे अप्पांनी शकुनचं लग्न त्यांच्या भाचीच्या दिराबरोबर जवळजवळ पक्कं केलं होतं. पाहण्या बघण्याचा प्रश्नच नव्हता. नात्यातील असल्यामुळे दोघे थोडेफार एकमेकांना ओळखत होते. पाहिलंही होतं एकमेकांना परंतु जीवनाचे साथीदार म्हणून नव्हे! पण अप्पांना कुठ कळतंय हे ? त्यांना फक्त जात-धर्म-कूळ आणि पोट भरण्यापुरती मिळकत एवढंच माहीत! शेवटी अप्पाच जिंकले. शकुन पहिल्या वर्गात बी.ए. पास झाली. लवकरच धार्मिक विधीसहित लग्नसमारंभ पार पडला. शकुन ही सौ. शकुंतला आनंदराव धुपकर झाली. आनंदरावांच्या संमतीने लवकरच तिने बी.एड्. केलं. जवळच्याच जीवनविद्या प्रसारक मंडळाच्या शाळेत रुजू झाली. स्वकर्तृत्वाने लवकरच ती शाळेची

मुख्याध्यापिका झाली.

मध्यंतरीच्या काळात तिच्या संसारवेलीवर सुमन, विजय व राज अशी तीन फुलं आली. संसाराच्या रहाटगाड्यात आनंदरावांचा म्हणावा तसा काही उपयोग नव्हता. कधीमधी तिनं आनंदरावांना म्हटलं की, 'अहो, आज आमच्या शाळेत इन्स्पेक्शन आहे. आजचा दिवस तुम्ही घरी राहू शकाल का ? राजला थोडा ताप आहे.'



'छे छे मला नाही जमणार ते. तुझं तूच काय ते मॅनेज कर' अगदी अंगावरील झुरळ झटकल्यासारखं त्यांनी ते तिचं मागणं झटकून टाकलं. तिने आपल्या परीनं काहीबाही करून तो दिवस निभावून नेला आणि हे असं बऱ्याच वेळा नव्हे तर प्रत्येक वेळी घडलं. संसाराच्या या रहाटगाड्यात आनंदरावांनी म्हणावी तशी काही मदत केली नाही. मुलांची आजरपणं, अभ्यास, शिक्षण सर्व काही ती एकखांबी तबूंत तारेवरची कसरत करत पार पाडली होती.

यथावकाश मुलांची शिक्षणं, लग्न पार पडली. मुलांना पंख फुटले. आकाशी झेप घेऊन घरट्याबाहेर उडून गेली. प्रत्येकजण स्वतंत्र विचाराने स्वतंत्र राहू लागले.

शकुनताईने सुटकेचा नि:श्वास सोडला. मनाशी म्हणाली, 'चला सुटले बाई मी ! गंगेत घोडी न्हाली. आतां मी कुठेही जायला मोकळी. आता आमचंही वार्धक्य जवळ येत चाललंय. चार चार दिवस राहू एकेकाकडे.'

पण काय ? नियतीनं तिच्यासमोर काय काय वाढून ठेवलं होतं देव जाणे ? जशी काय एकेक स्पर्धाच जणू ! आणि त्या स्पर्धा तिला तिच्या संसाराच्या पटावर जिंकायच्या होत्या. आनंदरावही आताशा घरांत थोडेफार विसावले होते. आता आयुष्याच्या संध्याकाळी तरी त्यांची साथ मिळेलं या आशेवर ती उगवत्या सूर्याकडे पाहून जगत होती. पण काय ! 'Man Proposes and God disposes.' तसं झालं होतं तिच्या आयुष्याचं.

एक दिवस राज आला. आईशेजारी ऐटीत बसला, म्हणाला, 'आई, मी नवीन जागा घेतोय. थोडे पैसे तुझ्याकडचे दे.' सरळसरळ मागणीने ती अवाक् झाली. होयनाय म्हणता म्हणता साठ हजारांची बँकेची F. D. सही करून त्याच्या स्वाधीन केली. दुसऱ्याच आठवड्यात जय आला. 'आई मला गाडी घ्यायचीय् पैसे थोडे कमी पडतायत, थोडे मिळतील का ?' थोडं नरमाईच्या सुरात बोलला. किती झालं तरी आईचं हृदय ! हेलावलं. मुलांची प्रगती, उत्कर्ष झालेला कुठल्या आईला नाही आवडणार ? तिनं आपल्या पाच तोळ्यांच्या पाटल्या काढून त्याच्या स्वाधीन केल्या. हे सर्व आनंदरावांच्या समक्ष घडत होतं. पण त्याचं त्यांना काही सोयरसुतक नव्हतं. वडीलकीच्या नात्याने मुलांना त्यांनी कधीच प्रेम माया दाखवली नाही. स्वत:ला मिळालेला पैसा त्यांनी राखून ठेवला होता.

जून महिना आला. सुमन आली, 'अगं, आई मितेशची ॲडमिशन झाली. ह्यांनी कर्ज पण काढलंय. पण त्याचा हप्ता भरायची सोय झाली असती तर बर झालं असतं. काही होईल का मदत ?'


होय-नाय म्हणता म्हणता शकुनमधली शिक्षिका जागी झाली. तिनं तिच्या पेन्शनमधून महिना सातहजार रुपये देण्याचं कबूल करून तिन्ही मुलांची उघडी तोंड बंद केली.

त्यांची मागणी व गरज रास्त होती का देव जाणे? परंतु तिनं ती पुरवली कारण ती पुरवण्यासारखी तरी होती. मुलं घरट्याबाहेर गेली.

रात्र झाली. आनंदराव जवळ आले. ती मनोमन सुखावली. वाटलं मुलांच्या गरजा पुरवल्या तर खूश होतील.

जवळ येऊन म्हणाले, 'शकू डार्लींग, तू या वयातसुध्दा किती छान दिसतेस. आपण रात्री खूप मज्जा-धम्माल करू. तरुणपणी नाही जमलं. फक्त मुलांना जन्म देण्यापुरताच आपण संग केला. आता तसं नको. रात्रभर आपण धुंद राहू! तशाच विवस्त्र अवस्थेत आणि हे रोजचंच चालेल.' शेवटचं त्यांचं वाक्य जणू हिटलरशाहीच आणि तिही या मागणीखातर आणि वयाची सत्तरी ओलांडलेल्या माणसाकडून! शकुन चक्रावलीच, भोवळ यायची काय ती बाकी राहिली. काय ही विकृती!

दोन दिवस तिने हा किळसवाणा छळ सोसला. कसाबसा सहन केला. तिसऱ्या दिवशी मनाचा निग्रह करून आपला गाशा गुंडाळला. दोन दिवस एका मैत्रिणीकडे राहून एक खोली पाहिली. एकटी राहू लागली. आर्थिकतेने मुलांनी तिला नागवलंच होतं. आता नवरा तिला पुरती नागवी करायला निघाला. वीट आला आयुष्याचा. क्षणभर ती मनातल्या मनात चरफडत राहिली, 'काय म्हणावं यांच्या या मागणीला? काय हे खूळ? की म्हातारचळ? नवरा झाला म्हणून काय झालं? वयाची पंचाहत्तरी ओलांडलेला माणूस! माणूस कसला! जनावरच की. तीसुध्दां ठरावीक वेळीच मैथून करतात. काय म्हणावं या प्रकाराला? मुलंही अशी , नवरा हा तसा! काय करणार?'



परंतु शकुन तशी हरणारी नव्हती. रडत बसणारी नव्हती. नव्या खोलीत ती एकटी व्यवस्थित राहू लागली. शेजारीपाजाऱ्यांशी गोड बोलून राहूं लागली. नाटक, सिनेमे प्रवास यांत मन रमवू लागली.

बऱ्याच दिवसांनी मुलांना सुगावा लागला. अधून मधुन त्यांची ये-जा वाढली, पण 'आई ये माझ्याकडे , इकडे एकटी कशाला राहतेस?' अस. चुकूनही कोणी म्हटलं नाही. कधीतरी ती बहिणीकडे ,नंदाकडे एखाद-दुसरा दिवस रहायला जायची. नातवंडामध्ये जाऊन रहावं असं वाटायचं.

एक दिवस ती राजच्या मुलाच्या वाढदिवसाच्या निमित्त गेली. 'राहीन चार दिवस मुलांच्या संसारात' विचार करत. त्याची बायको फारच आगाऊ 'झाला म्हणावं आता बर्थडे' पुढच्या 'बर्थडे' पर्यंत राहणार की काय ही ब्याद? दुसऱ्यास दिवशी तिला ऐकू जाईल अशा बेतानेच बोलली.

आणखी सहा महिन्यांनी जयच्या प्रियांकाचा वाढदिवस आला. ती तर भलतीच कजाग निघाली. दगडापेक्षां वीट मऊ म्हणण्याची पाळी. तिनं सरळंच सांगितलं 'माझ्याच्याने काही होणार नाही. माझी नोकरी

महत्त्वाची, माझ्या नवऱ्याला जन्म दिलात तेवढा पुरे. तुमचा माझा काही संबंध नाही.' आणखीही काही बाही बोलत राहिली. काही न बोलता ती गुपचूप घरी आली.

'असं कु:संतान असण्यापेक्षा नि:संतान असणं बरं' हे तिला कळून चुकलं. 'आलिया भोगासी' म्हणत तिनं खोलीचा दरवाजा उघडला. शेजारची मुलं 'आजी आजी' म्हणत धावत आली. त्याच्या हातांत खाऊ ठेवून ती जरा आत जाऊन आडवी झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी जाग आली तेव्हा तिला सणकून ताप भरला होता. डोकं ठणकत होतं. कोणाला तरी बोलवावं म्हणून ती दरवाजा उघडायला गेली, तिकडेच भोवळ येऊन अर्धी आंत आणि अर्धी बाहेर अशी पडली. शेजारच्या शारदाकाकू व सदू आले. चहा, पाणी देऊन सावध केलं. 'आजी कोणाला फोन करून कळवू का ?' डॉक्टरना बोलवू का ? शारदाकाकू.

शकुननं जयचा नंबर दिला. जयचं उत्तर 'अरे म्हतारी आजारी पडणारच, मेल्यावर कळवा. मग येईन' निष्ठूर हा शब्द कमी पडेल. दुसऱ्याचंही बहुधा तसंच उत्तर असावं. मुलीने पण तशीच नेहमीची कारण सांगितली.

कोणाच्याही मदतीला धावून जाणारी शकुन, तिच्या पोटी अशी औलाद निपजावी हा देवदुर्विलास ! दुसरं काय ? नाहीतरी बापाचं 'जीन्स' उतरलं असणार.

होय नाय म्हणता राजने आपल्या घराच्या दोन गल्ल्या सोडून एका वृध्दाश्रमांत नेऊन तिला भरती केलं. तिच्याकडे थोडेफार राहिलेल्या दागिन्यांची वाटणी करण्याचं काम तिनं नंदा (तिची बहीण) वर सोपवलं होतं. आश्रमात आल्यावर तिनं नंदाला फोन लावून हे सांगितलं, ते ऐकून नंदा चक्क फोनवर ओरडलीच 'अगं, काय संबंध त्यांचा ? मी बोलते त्यांच्याशी, असे ती तुमची जन्मादाती आहे. तिनं काय नाही केलं तुमच्यासाठी ? शिक्षण, आजारपणं सर्व बिचारीनं एकटीनं सावरलं. त्याची परतफेड म्हणून तुम्ही तिला वृध्दाश्रमाचा रस्ता दाखवला ? काय उपयोग मुलांना जन्म देऊन ?' दोघांनी ठरवल्याप्रमाणे एचक उत्तर दिलं. 'मावशी, आमचा जन्म म्हणशील तर त्यांच्या वासनेतून झालाय आणि संगोपनाचं म्हणशील तर कुठच्याही आईचं ते कर्तव्यच आहे आणि पैशाची मदत म्हणशील तर होते म्हणून दिले. नाहीतर तिचे म्हणजे आमचेच नाही का ?' दोघे इतके निर्लज्ज व निर्दयपणे बोलत होते की नंदाचा तिळपापड झाला. हे सर्व फोनवर झालेलं बोलणं नंदाने शकुनला सांगितलं व म्हणाली, 'जर हे माझ्यासमोर बोलले असते तर दोन थोबाडीत ठेवल्या असत्या सणसणीत. अशा नीच मुलांना आणि काय द्यायचं ?' नंदा कावून त्रासून बोलत होती. 'अगं नंदे, माझी नातवंड आहेत. ती तर दुधावरची साय ! त्या बिचाऱ्या चिमण्यांचा काय दोष ? त्यांच्या वाट्याला येईल तसं तूच त्यांना वाटून टाकं. ते काम तूच कर आणि हे बघ. माझ्या गळ्यातली ही छोटी साखळी माझ्या शेजारी शेवटी कोण असेल त्याला दे. करशील ना तू हे सर्व ?' हे आधीच्या आठवड्यातील शकुनताईचं बोलणं झालं. हे बोलतानाही तिला थोडी धाप लागत होती. फोन बंद झाला.

आज सकाळी ते गाणं ऐकताना तिच्या हातांत साखळी होती. नमूताई चहा ठेवायला आल्या होत्या. रेडिओवर गाणं चालू होतं. 'टिक टिक वाजते डोक्यात – ठकठक वाजते ठोक्यांत........' अन् तिनं शेवटचा श्वास घेतला. शांतपणे......अगदी शांतपणे. या विकृत, भोगवादी, स्वार्थी, मतलबी लोकांपासून ती फार दूर गेली होती. कायमची नात्याचे पाश सोडून.

◆◆◆

# ती

**शैला श. जोशी**

***त्या दिवशी अचानक, भरदूपारी दारावची बेल वाजली, आता या वेळी कोण आलं या विचारानंच मी दार उघडलं आणि पुन्हा अवाक् दारात तीच उभी होती, येऊ नं आत असं विचारतच तिने घरात प्रवेश केला. तुला न सांगता, कळवता आले पण मला वाटलं तू नक्की भेटशील. माझ्याकरितां वेळ काढशील. काढशील ना ? आहे ना वेळ ? तिच्या डोळ्यांत पाणी तरळत होतं.***

आज अगदी अचानक, ध्यानीमनी नसताना तिची आणि माझी भेट झाली. साड्यांच्या दुकानात, मी आत शिरत होते आणि ती बाहेर पडत होती. आम्ही एकदमच थांबलो आणि आश्चर्याने, आनंदाने बघतच राहिलो. आश्चर्याचा पहिला भर ओसरला आणि ती एकदम गंभीर झाली, मीच तिला विचारलं, अगं, तूं इकडे कधी आलीस रहायला ? आणि मला कळवलं नाहीस ? तिच्याबरोबर असलेल्या गृहस्थांना ती म्हणाली, तुम्ही बाहेर उभे रहा, मी येतेच. मला जरा चमत्कारिकच वाटलं. तिचे ते मिस्टर तर नक्कीच नव्हते. मग, होते कोण ? आणि आपल्याशी तिने ओळख का करून दिली नाही ? एकदम गंभीर का झाली ही ? मग तीच म्हणाली, अगं, २-३ महिने झाले, या शहरात मी रहायला आले. तुला कळवणारं होते, पण वेळेच झाला नाही. बरं, अच्छा येते. माझ्याकडे तुझा नंबर आहेच, मी करीन तुला फोन आणि ती सटकलीच तेथून. मला तिचं सगळं वागणं चमत्कारिकच वाटलं. तिचा असा स्वभाव नाहीच, किती उत्साही, आनंदी बडबडी मग, आज अशी का वागली ? काहीतरी लपवीत होती. बऱ्याच वर्षांनी भेटण्याचा आनंद दिसत नव्हता. खरंतरं झाला होता पण तो आनंद ती लपवीत होती. माझ्यापासून पळू पाहत होती. या शहरात रहायला येऊन २,३ महिने झाले म्हणते, मग एक फोन करण्याइतका वेळ नाही ?

खरं तर आम्ही बाल मैत्रिणी, अगदी १लीपासून ७-८वीपर्यंत एकाच वर्गात होतो. रोज एकमेकीकडे जात होतो. एकत्र खेळत होतो. एकत्र अभ्यास करणं, मनातलं एकमेकींना सांगणं. चिमणीच्या दाण्यांनी एकमेकींना खाऊ देणं सगळं एकत्र. मला वाटतं ९वीमध्ये असताना, तिच्या वडिलांची बदली झाली आणि मुंबई सोडून दूर औरंगाबादला आणि मग कुठे कुठे. सुरुवातीला आमचा पत्रव्यवहार चालू होता. दोघी मोठ्या होत होतो. शाळा, कॉलेज मग संसार यामध्ये पत्रव्यवहार थांबला पण दोघी एमकेकींच्या लग्नाला हजर होतो म्हणूनच ती व्यक्ती, तिच्याबरोबर असलेली ती व्यक्ती, मला अपरिचित वाटली कारण, माझ्या मुलाच्या मुंजीला ती दोघं आली होती. अगदी आदल्या दिवसापासून पण तेव्हा मला ती बदलल्यासारखी वाटली. थोडी अबोल, थंड अशी. पण तिने ते कबूल केले नाही आणि त्यानंतर फोन नं. च्या देवाणघेवाणी पुरताच संबंध राहिला. तिचे फोन एकदोनदा आले आणि बंदच झाले.

मी फोन केला तर घरात नाही, राँगनंबर वगैरे उत्तर येतं. मग मीही फोन करणं थांबवलं आणि आज अशी अचानक समोर आली पण तीसुध्दा बदललेली, घाईत असल्यासारखी. डोक्यात थोडे दिवस तिचे विचार येत होते. का बरं मला तिने सांगितलं नाही, का माझ्याशी नीट बोलली नाही, अशी वेगळीच, बदललेली का बरं वाटते ? पण, माझ्या व्यापात काही दिवसांत मी हे विसरले.



त्या दिवशी अचानक, भरदूपारी दारावची बेल वाजली, आता या वेळी कोण आलं या विचारानंच मी दार उघडलं आणि पुन्हा अवाक् दारात तीच उभी होती, येऊ नं आत असं विचारतच तिने घरात प्रवेश केला. तुला न सांगता, कळवता आले पण मला वाटलं तू नक्की भेटशील. माझ्याकरितां वेळ काढशील. काढशील ना ? आहे ना वेळ ? तिच्या डोळ्यांत पाणी तरळत होतं. अग हो हो, आहे वेळ मला अगदी निवांत बस. आधी हे थंडगार पाणी पी, मग बोलू आपण आणि अगदी शोधून छान दिवस काढला आहेस. आमचे हे पण आज घरात नाहीत, त्यांच्या मंडळाच्या कामाकरिता बाहेरगावी गेले आहेत. मुलं यायला वेळ आहे. छान गप्पा मारू, मी तिला म्हटलं. ती जरा मोकळी झाली आणि तिने एकदमच सुरुवात केली.

त्या दिवशी मला अचानक बघून तुला आशचर्य वाटलं ना ? आणि खरं सांगू मी तर, एकदम गांगरून गेले, काय सांगू, कसं सांगू, काय बोलू ? मग, पळालेच तेथून. तुझ्यापासून काही लपवावं असं वाटलं नाही आणि शेवटी आलेच बघ तुझ्याकडे. थांब, मध्ये मध्ये बोलू नकोस, मी तुला सगळं सांगते.

तुला माहीतच आहे, माझा बडबडा स्वभाव, वाचनाची, कवितांची आवड. सिनेमापेक्षा मला नाटक बघायला आवडतात, त्याच्यावर बोलायला आवडतं. पण माझ्या नवऱ्याला यापैकी कसलीच आवड नाही. लग्न झाल्यावर काही महिन्यांतच माझ्या लक्षात आल ग्रॅज्युएशन झाल्यावर लगचेच माझ्या आईवडिलांनी माझ्याकरितां मुलं पहायला सुरुवात केली आणि त्या वयात कुठे ग कळत होतं आवडी निवडी वगैर विचारणं, आईवडिलांनी पसंत केला, शिकलेला चांगल्या पगाराचा मुलगा, एकुलता एक, मी हो म्हटलं. लग्न झालं. संसार सुरू झाला पण मने जुळली नाहीत. यांना कशाचीच आवड नव्हती. ना वाचनाची. ना फिरण्याची की सिनेमाची. घर आणि नोकरी. कुठे जाणं येणं नाही, मित्र नाहीत नाही.

म्हणायला एकच मित्र होता, कधीतरी घरी यायचा. तुला सांगू यांच्यापेक्षा माझ्याशीच त्याच्या गप्पा रंगायच्या. नव काही वाचलं की तो मला सांगायचा मग मीही ते पुस्तक वाचायचे, मी वाचलेलं त्याला सांगायचे. आमच्या आवडी निवडी छान जुळत होत्या. तोही खूप मोकळे पणे वागायचा, बोलायचा पण एक मर्यादा ठेवून. यांनाही त्यात वावगं काही वाटत नसे. तुला सांगते, यांच्या शेवटच्या आजारपणात हे मला म्हणाले देखील, तुला चांगला मित्र मिळाला आहे अशीच मैत्री ठेवा. मधल्या काळात बऱ्याच उलथापलथी झाल्या होत्या. त्याची पत्नी आजारपणातच गेली. मुलगा परदेशात होता, तेथेच स्थायिक झाला. माझ्याही मुलीच लग्न झालं, तिला जरा लांबचं भोपाळचं सासर मिळालं. मुलगा, त्याच्या घरातील सर्व माणसे चांगली आहेत. साधारण ५ ते ६ वर्षांपूर्वी हे गेले. मी एकटीच राहिले. तुला म्हटलं तसं यांची तब्येत अलीकडे बरी नसायची. मुलीकडे जाऊन राहणं मला पटत नव्हतं. नवीन प्रदेश, नवीन माणसं जोडणं या वयात शक्य नव्हतं. हातपाय ठीक आहेत तोवर एकटच रहावं. पुढचं पुढे असं ठरवलं होतं. यांच्या मित्राच अधूनमधून येणं चालूच होतं. एक दिवस मनात आलं. ते एकटे मी एकटी. आवडी निवडी स्वभाव छंद जुळतात. एकत्र का राहू नये. केवळ जवळचा मित्र म्हणून आधार, सोबत सोबती म्हणून, शुध्द मैत्री म्हणून एकत्र राहू शकत नाही का ? पण मुलीला माझं हे वागणं पटत नाही. तिला खूप समजावलं. अगदी दोघांनी, पण तिची समजूत नाही पटली. म्हणाली, लोक काय म्हणतील ? माझ्या सासरी काय सांगू ? तुमच्या एकत्र राहण्यात शुध्द मैत्री आहे यावर कोण विश्वास ठेवणार ? मला हे पसंत नाही. आई, मी येथे येणार नाही. तू एकटी माझ्याकडे ये. नाहीतर एकटी रहा, मी तुझ्याकडे लक्ष ठेवेन पण असलं मला चालणार नाही. अगं, मला सांग २४ तासांची कामवाली स्वयंपाक, धुणी-भांडी करीत पण माझी बौध्दिक भूक भागवेल ? तिच्या सोबत राहण्यात आनंद वाटेल ! मी अर्थातच तिचं ऐकलं नाही. आम्ही एकत्रच राहू लागलो. पण असं लक्षात येऊ लागलं की शेजारी संशयाने पाहतात, नको ते बोलतात. मग ते शहरचं सोडलं. येथे आलो. नवीन शहर, नविन माणसं पण तुझ्याकडे यायला मन धजावत नव्हत, तू तरी समजून घेशील की नाही शंकाच वाटत होती, त्या दिवशी तुला पाहिलं आणि वाटलं हिला सगळं सांगावं. मला सांग अगं, अशी शुध्द मैत्री, या शुध्द मैत्रीचा आधार मिळत असेल तर तो सोडायचा का अगं, आम्ही कुठचीही लक्ष्मण रेषा ओलांडली नाही मग तरीही हे जगावेगळं नातं कुणी कां मनात नाही. एक पुरुष व एक स्त्री याचं शुध्द नातं, शुध्द मैत्री असूच शकत नाही का ? हे सगळं असं आहे म्हणून तुला कळवलं नव्हतं. आता सगळं मनं मोकळं केलं. तूच ठरव तू काय करायचस ते आणि ती गप्प झाली.

मीही थोडा वेळ गप्प होते, मग एकदम मनात आलं, आयुष्याचे उरलेले दिवस ती म्हणते त्याप्रमाणे तिने घालवले तर काय हरकत आहे. उठले. तिच्या जवळ गेले. तिचे डोळे पुसले व तिला मिठीत घेऊन पाठीवर थोपटत राहिले. त्या माझ्या आश्वासक स्पर्शात तिला माझं मन कळलं आणि रडता रडता ती खुदकन् अगदी पूर्वीसारखं मनमोकळं हसली.

◆◆◆



*With Best Compliments From*

# NIRMAN
# Infrastructure

**Ratnagiri**

# उजळलेली संध्याकाळ

- अनुराधा साळवेकर

*माझ्या या बोलण्यासरशी अशी काही खसखस पिकली की मागंच पुढचं मळभ नाहीसं झालं. संध्याकाळ खुलली ! उजळली एका क्षणात.*
*'हं, मग काय प्रभुराजा, जायचं ना शाळेत मात्र शिस्तीत रहावं लागेल, अभ्यास करायचा बरं का, मनापासून; नवी पुस्तकं आणून देईन मी. पहिला नंबर आला पाहिजे ?'*
*'पण बाबा, तुम्ही घरी शिकवाल ना मला ? मग काय अवघड आहे ! अभ्यास तर करणार मी. मग काय, झाडाला आंबे शंभर ! माझा पहिला नंबर !'*
*बाबांच्या डोळ्यात माझं कौतुक ओसंडून आलेलं आणि मी पुन्हा त्यांना बिलगून माझा हक्क सिध्द केलेला ! बाहेर संधिप्रकाश प्रसन्नतेने उजळ झाला होता.*

---

किरमिजी अंधुक संध्याकाळ। सूर्य आपली किरणं आवरून परतीच्या वाटेवर निघालेला। एक उदासी सर्वत्र भरून राहिल्यासारखी मरगळलेलं। मळभ पसरावं तशी

आजी आणि आई हलक्यानं काही गहन बोलत बसलेल्या. म्हणजे आजी बोलतेली आणि आई हूं हूं करून साथ देत असलेली. आपण काय करायचं, हे समजत नसल्यानं मी आपली त्या दोघींच्या मध्ये जाऊन आईच्या मांडीत घुसून गालावर हात ठेवून त्यांच्या गप्पा ऐकत बसलेली. समजत काहीच नव्हतं. समजावं असं वाटतही नव्हतं. मनच लागत नव्हतं कशात. उलट यांच्या या गप्पा किती वेळ चालणार आहेत आता ? अशी चिंताच मला लागलेली. कारण त्याशिवाय त्यांचं माझ्याकडे लक्ष कसं जाणार ?

'आई , हे काय गं ? बाबा का येत नाहीयेत लवकर ? मला बाई कंटाळा येऊन गेलाय्!' असं म्हणत तिचं लक्ष आपल्याकडे वळवण्याचा माझा प्रयत्न आताही व्यर्थ झालेला. आजीकडे येऊन आता किती दिवस झाले. कधी जायचं आपल्या घरी ? असं मला सारखं वाटत असलेलं, पण त्यासाठी बाबा आले पाहिजेत ना !

मध्येच सलग आठ-एक दिवस माझ्या तापाचं झेंगट पार पडलेलं तेव्हा तर मला बाबांशिवाय मुळीच राहवेना. कधी येणार गं बाबा ? सांग ना हा घावून मी आईला नको करून टाकलं. तिनं कशीबशी समजूत घालावी. त्यात आजीचं - 'अने, ही पोरगी म्हणजे व्हईकच बाई तुझी ! घरात काय दुसरी माणसंच नाहीत की काय ! इतकं बापाचं लागतं नव्हतं बाई पाह्यलं. आक्रीतचं एकेक' म्हणून त्यात भर घालत असलेली.

आठ दिवसांच्या तापात किती भ्रम होऊन गेले. वरचेवर एक स्वप्न मात्र हटकून पडायचं. कुठल्याशा रानातल बाबा घोडा दौडवीत येताहेत. अचानक मोठो उजेड पडलेला पायउतार होतं माझं हसणं थांबतच नाहीये,

त्यांचे डोळे डबडबलेत आणि मी त्यांना पालीसारखी चिटकून राहिलेय. डोळे उघडले की हे सारं नाहीसं व्हायचं जादूसारखं! आणि मग तर मला खरंखुरं रडू येऊ लागयचं.

.....पण आत्ता मात्र खरंच समोरून बाबा येत असल्याचं मी पाहिले आणि टुणकन् उडी मारून मी अंगण पार केलं त्यांच्या हाताला झोंबत 'आई, बाबा आऽले' म्हणत त्यांनी पुन्हा घ्यावं म्हणून हात पसरून उभी राहिले.

'हो, हो, घेतो ना राजा तुला' असं म्हणतं बाबा ओसरीवर येऊ लागतात. पण मला तेवढाही धीर नसतो. बैठकीत टेकेपर्यंत पुन्हा मी त्यांच्या मांडीवर!

'अगं हो, जरा श्वास तरी टाकू देशील की नाही? माणूस बाहेरून आलंय जरा पाणीबिणी विचार त्यांना. भारीच बाई लोपटाळ हो!' असा निषेध करीत आई त्यांच्या हातातून सामान घ्यायला आली, तर 'कसा आहे आमचा प्रभुराजा? मजेत ना?' असं त्यांनी म्हणायचा अवकाश की, आमची बयादींची यादी हजर करायला मी तत्परतेनं पुढं – ''बाबा, किती उशीर केलात हो यायला. आम्हाला मुळीच करमत नव्हतं. आईलासुध्दा सारखी आठवण यायची. हो की नाही गं आई?'' बाबा, तुम्हाला सांगू, आई माझं काहीसुध्दा ऐकत नाही आणि आजी, देते गुळपापडीचा लाडूबिडू. पण तो मला मुळीच आवडत नाही. तुम्ही खारका आणल्यात ना बाबा, त्या फोडून खायला किती मजा येते!आणि तुम्ही मला फ्रॉक आणणार होतात तो? पण असू दे हो शर्टचड्डी देखील आवडते मला! ती कासाराची रत्नी म्हणते, तू काय मुलगा आहेस शर्टचड्डी घालायला? मी म्हणते असू दे. माझ्या बाबांना मी शर्टचड्डी घातलेली आवडते. बाबा, इथं आपल्या तिथल्यासारखं खेळायला कुणीसुध्दा येत नाही. ती सोनी येते केव्हा केव्हा पण काचापाण्याच्या खेळात रडीचा डाव खेळते ती. भारी खोटं खेळते हो! काच हलली नाही तरी हललीच म्हणते!



आणि सारा डाव मोडून टाकते. बाबा, सगळ्या रंगीत बांगडीच्या काचा स्वत:च घेऊन जाते. आता येऊ दे तिला. सांगते मग– मला नको तुझं काचपाणी खेळ. बाबा आलेत आता आमचे! बाबा, तुम्ही खेळणार ना माझ्याशी?

बाबांचं तोंड वळवून वळवून माझी चटरपटर चाललेली. उत्साहात ते माझ्याशी असं तसं बोलत असतात त्या माझ्या अखंड बडबडीतून आईसाठी एक वाक्य 'अगं जागेची तजवीज केल्याविना कसा येणार? गजादादाच्या आणि बापूकाकांच्या कड्यातून सुटता सुटता बेजार झालो. त्यांना समजावणं तसं सोपं नव्हतं हे माहीतच आहे तुला! पण निपटलं सगळं तेव्हा कुठे यायला सवड मिळाली' 'हं, काय म्हणतेय आमचा प्रभुराजा' म्हटल्यावर मी पुन्हा चिटकले बाबांना ती काही दूर व्हायला तयार नाही!

''हो, ते सगळं खरं, पण टपाल तरी धाडायचं होते. इकडे तुमच्या लेकीनं धोसा काढला होता. ताप काढून घेतलं हो चांगला आठ दिवस. आम्ही दोघी पार

हडबडून गेलो. वाटलं, कुठून या लेकराला परदेशी केलं. हिच्या तर डोळ्याचं पाणी खळत नव्हतं.'' आजीच्या या बोलण्यावर बाबा स्तब्ध झाले. मग म्हणाले 'तुमचं म्हणणं रास्तच आहे. पण जाळपोळीतलं घर निदान निवायला तर हवं. त्याशिवाय जळितातलं सामान कसं हाती लागणार ?' आणखीही बरीच सारासार करायची होती म्हणून झाला उशीर. आता डोक्यावरचं खांद्यावर केलंय जरा. सगळ्या गावाची एकच कथा! तुम्ही नका काळजी करू. आता पुन्हा येईन तेव्हा घेऊनच जाईन यांना.

''म्हणजे बाबा, तुम्ही परत जाणार ? आम्हाला न घेता ? मी पण येणार हं तुमच्याबरोबर. मला इथं फार भीती वाटते हो. कोठीच्या खोलीत कुणीतरी भूत असतं. माझ्या घशात दाटून येतं. मला तुमच्या जवळ झोपायचंय, नाहीतर झोपच नाही येत मला! भीतीची स्वप्नं पडतात. कुणीतरी धरायला येतं. धूम पळून जावंसं वाटतं. पण पाय हलतचं नाहीत. नाही, नाही बाबा, तुमच्याबरोबरच येणार मी, हो ना गं आई ?''



आई बिचारी स्तब्ध झालेली. आजीच म्हणते मग हो हो. सगळ्यांनीच जायचं बर का इथं तरी काय आता राहलंय ? मेल्यांनी पुढच्या दारानं घर पेटवलं आणि मागल्या दारानं लुटून नेलं. वाडवडिलांपासूनच नांदतं जागतं घर होत्याचं नव्हतं करून टाकलं पार सगळ्यांचं. ग्यानबा सरकती देवासारखा धावून आला नसता, त्यानं रात्रीपुरता निवारा दिला नाहीतर आम्ही दिसलो तरी असतो की नाही कुणास ठावूक! अनीची सासर–माहेर दोन्हीकडची घरं जळितात गेली. काय करायचं. कुणाकुणाला धीर द्यायचा ?...

हे सगळं चाललंय तरी माझं आपलं टुमणं वेगळंच. मी आजीला म्हटलं – 'अगं, तू कशी येणार आमच्याबरोबर ? मामा नाही का इथं ? त्याच्यासाठी तुला रहावं लागेल ना! नंतर घेऊन जाईन हं मी तुला. हो की नाही हो बाबा ?'

''बघा कशी हयशाय आहे लेक तुमची हो जावईबापू; वळणाचं पाणी वळणालाच जायचं, चुरूचुरू बोलतेय पहा कशी! नाही गं बाई, तुझ्या बाबांच्या मायेत वाटेकरी नाही व्हायचं बरं आम्हाला! तुला एकटीलाचं राहू दे त्यांचं प्रेम आंदण!''

इतक्या सगळ्या तणावातही आईला हसू फुटलं बाबांनी पुन्हा एकदा मला जवळ लपेटल तेव्हा कुठं मला हायसं झालं. 'अजून कोणी वाटेकरी नाही ना आलंय तिच्या प्रेमात, तवर गाजवून घेऊद्या हक्क!' असा आजीचा शेरा त्यावर होताच.

'सहावं लागेल आता तिला. मुलं शाळेत दाखल व्हायला लागलीत. तिलाही दाखला काढायचाय. जायला तर हवंच. तुमच्या भरोशावर तर मी तिकडे तजवीज करू शकते. आता तुम्हालाही आहेच इथलं शिस्तशीर करायचं. तेव्हा एकदोन दिवसांत निघायची तयारी करायला हवी, नाही का गं ?' 'हो तर' तशी थोडी बांधाबांध करायला सुरुवात केलीये ' आईही हरखलेली द्रिसली, म्हणाली, 'तुम्ही म्हणाल तसं

मग लागायचं तयारीला ?'

'हो, पण त्या चिमुरडीच्या सगळ्या जिनसा नीट पाहून घे हो बरोबर. नाहीतर त्यासाठी त्यांना खेटा घालायला लावील ती ! शिवाय आजी बरोबर येते की काय हा धाक पडेल तिला.' आजी.

'तसं नाही गं आजी, तू पण चल ना आता. बाबा आहेत आपल्याबरोबर. मग कसलीच भीती नाही. ते सगळ्यांना ठेवतील बांधून ! माझे बाबा आहेतच मुळी शूर ! त्या मोटरीतल्या सरदारासारखे ! नाही का हो बाबा ?'

माझ्या या बोलण्यासरशी अशी काही खसखस पिकली की मागंच पुढचं मळभ नाहीसं झालं. संध्याकाळ खुलली ! उजळली एका क्षणात.

'हं, मग काय प्रभुराजा, जायचं ना शाळेत मात्र शिस्तीत रहावं लागेल, अभ्यास करायचा बरं का, मनापासून; नवी पुस्तकं आणून देईन मी. पहिला नंबर आला पाहिजे ?'

'पण बाबा, तुम्ही घरी शिकवाल ना मला ? मग काय अवघड आहे ! अभ्यास तर करणार मी. मग काय, झाडाला आंबे शंभर ! माझा पहिला नंबर !'

बाबांच्या डोळ्यात माझं कौतुक ओसंडून आलेलं आणि मी पुन्हा त्यांना बिलगून माझा हक्क सिध्द केलेला ! बाहेर संधिप्रकाश प्रसन्नतेने उजळ झाला होता.

◆◆◆

*With Best Compliments from*

**Architect**
**Samir Kulkarni**

# दोन तपानंतर ....

- अर्चना कुलकर्णी

***घरी आल्यावर आठवडा भर्रकन गेला. महेश आता पोस्टिंगच्या ऑर्डरची वाट पाहत होता. लहानपणी शांत, सोशिक असलेला महेश मिलिटरीच्या खडतर ट्रेनिंगमुळे, तिथे मिळालेल्या शिक्षणामुळे करारी, आक्रमक वृत्तीचा झाला होता.***

महेश एलकुंचवार! आज खूपच आनंदात होता! डेहराडूनला मिलिटरी कॅंपमध्ये तीन वर्षांचे खडतर ट्रेनिंग पूर्ण करून ''Passing parade'' मध्ये तो उत्तीर्ण झाला होता. ही बातमी घरी जाऊन आईला केव्हा सांगेन असे त्याला झाले होते. दुसऱ्या दिवशी सकाळच्या गाडीने निघून महेश नागपूरला पोहोचला. रिक्षेतून उतरल्यावर, धावतच तो घरात शिरला. ''आई गं, मी आलोय!''

महेशचा आवाज ऐकल्याबरोबर भागीरथीबाई स्वयंपाक घरातून बाहेर आल्या. मिलिटरीच्या वेशातील आपल्या रुबाबदार लेकाला पाहून त्यांना इतका आनंद झाला की तो कसा व्यक्त करावा हे देखील त्यांना कळेनासे झाले. डोळ्यातून अश्रूंच्या धारा आणि चेहऱ्यावर आनंदाचे हसू. भावनांचा हा अनोखा संगम महेशदेखील क्षणभर पाहत राहिला. तो आईजवळ गेला, आईला वाकून नमस्कार केला.

''आई, मी पास झालो.''

हे वाक्य ऐकल्यावर भागीरथीबाईंनी आनंदाने डोळे गच्च मिटले. त्यांनी महेशच्या डोक्यावर हात ठेवून खूप खूप आशीर्वाद दिले.

महेशने हलक्या हाताने आईच्या गालावरचे पाणी पुसले. गोऱ्यापान रेखीव चेहऱ्यावर अती कष्ट केल्याच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या. त्या आनंदाच्या क्षणीदेखील महेशचे मन कळवळले.

थोड्या वेळाने निशा व आशा कॉलेजमधून आल्या. धाकटे शिरीष व गिरीशदेखील शाळेतून आले. महेशदादाभोवती सगळ्यांनी गराडा घातला. जेवण व त्यानंतर संध्याकाळपर्यंत गप्पा-गोष्टी व सगळ्यांचे खळखळ हसणे आमचे ते दोन खोल्यांचे घर आनंदाने भरले होते.

आपल्या गुणी मुलांकडे पाहत भागीरथीबाई मनात म्हणाल्या, ''देवाने पैसा कमी दिला, पण त्याबरोबर निरोगी, कष्टाळू, बुध्दिमान, हसरी मुलं देऊन आम्हाला श्रीमंत केलं. परमेश्वरा, माझ्या बाळांवर तुझी सदैव कृपा असू दे.'' रात्री दत्तात्रय घरी आले. गाण्यांची दुसरी फेरी त्यांच्याबरोबर सुरू झाली. कष्टात व गरिबीतही दत्तात्रय मुलांइतकेच मिश्कील होते.

घरी आल्यावर आठवडा भर्रकन गेला. महेश आता पोस्टिंगच्या ऑर्डरची वाट पाहत होता. लहानपणी शांत, सोशिक असलेला महेश मिलिटरीच्या खडतर ट्रेनिंगमुळे, तिथे मिळालेल्या शिक्षणामुळे करारी, आक्रमक वृत्तीचा

झाला होता.

बाहेरच्या खोलीत महेश एकटाच बसला होता. आई नेहमीप्रमाणे स्वयंपाकघरात होती. त्याने खोलीवरून नजर फिरवली. मनात विचारांचे, आठवणींचे थैमान चालू झाले.

हे आपले घर! चार फुटांची भिंत सोडली, तर घराचा वरचा भाग फक्त पत्र्याचा आहे. नागपूरच्या कडक उन्हाळ्यात पत्रे खूप तापायचे, तर जीवघेण्या थंडीत कमालीचे गारठायचे. पावसाळ्यात पाणी घरात यायचे. शिरीषच्या मदतीने आई घरातले पाणी उपसून बाहेर टाकायची. शिरीष लहानपणापासून विशेष चपळ आणि कष्टाळू ! किती गुणी आहे माझा भाऊ! दिवसभर न कंटाळता, न थकता काम करतो आणि अभ्यासही तितक्याच उत्साहाने करतो. आईला घरकामात सर्व प्रकारची मदत करतो. स्वत:चा सर्व खर्च भागवण्यापुरता पैसे मिळवण्यासाठी सकाळी लवकर उठून पेपर वाटण्याचे काम करतो. आशा आणि निशा स्कॉलरशिपवर शिकताहेत. आशा या वर्षी बी. एस्.सी. होईल. निशा अजून दोन वर्षांनी बी.एस.सी.होईल. थोड्याच वर्षात त्यांच्या लग्नाची वेळ येईल. या घरात लग्न–कार्य कसे करायचे ? मुळात या घरात पाहुण्यांना बोलवायचे तरी कसे ? मुलाकडची मंडळी सर्वप्रथम मुलीचे घर प्रतिष्ठा बघतात. नव्हे घरावरूनच प्रतिष्ठा ठरवतात. माझ्या बहिणी हुशार आहेत, सुंदर आहेत, कष्टाळू आहेत तरीही..............मी ड्युटीवर रुजू झाल्यावर कित्येक दिवस, महिने, कदाचित काही वर्ष देखील घरी येऊ शकणार नाही. इथली परिस्थिती अशीच राहिली तर पुढे कसे होईल ? आपल्या कुटुंबात या परिस्थितीतून बाहेर काढायची जबाबदारी माझी आहे! मी मोठा मुलगा आहे या घरातला!



वमदासपेठेत आजी–आजोबांचा केवढा मोठा वाडा आहे. किती सुविधा आहेत तिथे. विहीर आहे, घरात देखील नळ आहे, घराचे बांधकाम पक्के आहे. तळमजला व त्यावर पहिला मजला असल्यामुळे उन्हाळ्यात गारवा व थंडीत ऊब मिळत असेल. घर उंच चौथऱ्यावर आहे. म्हणते पावसाळ्यात पाणी घरात येत नसेल. आम्ही तर कधीच त्या घरात गेलो नाही. बरेचदा लांबून पाहिले आहे, पण आजी व दादांच्या भीतीने तिथे जाण्याचे धाडसच झाले नाही.

आई सांगते कधी थोडेच तिच्या सांगण्यावरून समजले की आजी खूपच करारी, हट्टी आहे, वाड्यातच मंगल कार्यालय आहे आजीचे. पैशांची आवक भरपूर आहे. घर सर्व सामानाने गच्च भरलेले आहे. या वैभवापासून मामी सर्वजण मात्र वंचित राहिले दादांनी आजी–आजोबांच्या मनाविरुध्द लग्न केले, त्यामुळे त्यांनी आईला व दादांना घराबाहेर काढले, नव्हे घरात घेतलेच नाही लग्नानंतर. मोठ्यांच्या या वादामुळे आम्ही भावंड लहानपणापासून शिक्षा भोगतोय. इतरांच्या घरी आजी–आजोबा नातवंडांचे किती कौतुक करतात ? किती प्रेम करतात नातवंडांवर ? पण आमच्या आजी–आजोबांना कधीच आमची आठवण आली नाही ? काळजी वाटली नाही ? या घरात आम्ही आमचं बालपण कसं घालवत असू याबद्दल खंतही नसेल वाटली ?

आई-दादांनी तरी असे काय पाप केले आहे की, ज्याची एवढीमोठी शिक्षा? आई उच्चशिक्षित ब्राम्हण कुटुंबातली, देखणी, हुशार, सालस आहे, तरीही तिच्यावर आजी-आजोबांचा राग का? दादांनी स्वत:च्या पसंतीच्या मुलीशी लग्न केले. हा काय गुन्हा आहे? बावीस वर्षांच्या मुलाला व अठरा वर्षांच्या मुलीला तर कायद्याने देखील स्वत:च्या पसंतीने विवाह करण्याची परवानगी आहे, म्हणजे आई-दादांनी तर कोणाताच गुन्हा कोण नव्हता मग आम्ही सर्वजण आजपर्यंत का गप्प बसले? का वर्षानुवर्षे इतक्या हालअपेष्टा सोसल्या?

या विषयावर बराच वेळ विचार केल्यावर महेश एका निर्णयावर पोहोचला. आपण सर्वांनी आजोबांकडे, म्हणजे आपल्या हक्काच्या घरी रहायला जायचे उद्याच!

हे सर्व कसे घडवून आणायचे याचे नियोजन करून महेश खुर्चीतून उठला. आईजवळ गेला आईला म्हणाला, ''आई, मी काय सांगतोय ते ऐक. उद्या आपण, आपलं सगळं सामान घेऊन, आजोबांच्या म्हणजे आपल्या मोठ्या घरात रहायला जाणार आहोत. तू आवरा-आवर करायला सुरुवात कर.''

''अरे, महेश! बाळा, तू हे काय बोलतोय? सासूबाई आपल्याला कधीच त्या घरात येऊ देणार नाही. तुझ्या उगाच अपमान करतील बेटा. तू नको या भानगडीत पडूस. तुझ्या दादांना तर हा विषयसुध्दा काढलेला चालत नाही, आणि तू......''

''मी काय सांगितलेय, तेवढेच ऐक.''

असे ठामपणे सांगून महेश लगेच घराबाहेर पडला. त्याने रामदासपेठ गाठली. सर्व बल व आत्मविश्वास एकवटून महेशने पाऊल टाकले!

फाटकातून लांबपर्यंत वाड्याचा परिसर दिसत होता. बाजूच्या कंपाऊंडच्या भिंतीजवळ ओळीने झाडे लावली होती. गुलाब, शेवंती, पारिजातक आणि कितीतरी प्रकारची फुलझाडे होती. लिंबाचे झाड रेखीव होते. समोरच्या कंपाऊच्या भिंतीवर कारली, गिळके, वाल यांचे वेलही चढले होते. स्वच्छता व नीटनेटकेपणा यामुळे वाड्यातील वातावरण आल्हाददायक होते.

वाड्यात सुरुवातीला दोन-दोन खोल्यांची चार कौलारू घरे होती. बहुधा तिथे भाडेकरू राहत होते. पाचवी खोली मोठी होती. त्या खोलीवर एक मजला होता. बाहेरील दारावर आजोबांच्या नावाची पाटी होती. ''विष्णूपंत माधवराव एलकुंचवार'' आजोबांच्या घराचे दार उघडेच होते. बूट बाहेर काढून महेश घरात गेला. मंगल कार्यालयात भाड्याने दिलेले पाट, गाद्या, भांडी इ. सामान न्यावयास आलेल्या नोकरांना आजी कणखर आवाजात सूचना देत होती. आजीच्या आवाजातून, बोलण्यातून, देहबोलीतून, तिच्या करारी स्वभाव लगेच लक्षात येत होता. सौंदर्य, कर्तृत्व याचा आभिमान ,नव्हे गर्व चेहऱ्यावर आपले अस्तित्व सांगत होते.

महेश काहीही न बोलता, शांतपणे उभा राहिला. थोड्याच वेळात नोकरांनी सामान हॉलच्या बाहेर नेले. आजीने महेशकडे पाहीले.

''महेश ना तू? काय काम आहे आमच्याकडे?'' आजीचा धारदार आवाजातला प्रश्न ऐकून महेश जरा गडबडला, तसेच आजी आपल्याला नावानिशी ओळखते याचे त्याला आर्श्चही वाटले. काही क्षणातच त्याने स्वत:ला सावरले. त्याचे आतले मन त्याला सूचना देत होते.


''तुझ्या कणखर आजीचा तू नातू आहेस, शिवाय

मिलिटरीचे कठीण ट्रेनिंग उत्तीर्ण झालेला आहेस.'' ''हो, मी महेशच. आजी, तू ओळखलंस मला ?'' असे म्हणून महेशने आजीला वाकून नमस्कार केला.

''परवानगीशिवाय घरात कसा आलास ?''

आजीच्या तीक्ष्ण आवाजातल्या प्रश्नाने न घाबरता महेशने प्रतिप्रश्न केला,

''स्वत:च्या आजी-आजोबांकडे येण्यासाठी नातवाला कुणाची परवानगी घ्यावी लागते ? ते देखील वडिलोपार्जित घरात ?''



सौ. सुंदराबाई एलकुंचवार यांना आजपर्यंत कुणीही, कधीही इतक्या धीटपणे प्रतिप्रश्न केला नव्हता, त्यामुळे त्या जास्तच संतापल्या व कडाडल्या, ''हे माझ्या प्रश्नाचे उत्तर नाही''

''माझ्या प्रश्नातच तुझ्या प्रश्नाचे उत्तर आहे. ते तुला कळले नाही, हा तुझा प्रश्न आहे.'' महेशने शांतपणे स्पष्टीकरण दिले. आजी व नातवाचा हा ''प्रेमळ''संवाद कानावर पडल्याबरोबर विष्णूपंत बाहेरच्या खोलीत आले. आपल्या देखण्या, रुबाबदार नातवाला पाहून त्याचे भानच हरपले. ''महेश, माझा महेश''

असे प्रेमाने, कौतुकाने ओथंबलेल्या स्वरात म्हणून ते धावतच पुढे आले. महेशला त्यांनी कडकडून मिठी मारली. इतकी वर्षे डोळ्यांत अडवलेल्या अश्रूंना त्यांनी वाहू दिले.

आजोबांची ही प्रतिक्रिया महेशसाठी अनपेक्षित होती. त्याचेही हात नकळत आजोबांभोवती आवळले गेले. ''किती वर्षांपासून मी वाट पहातोय तुझी'' दोन प्रतिक्रियांमध्ये केवढा हा फरक ? या फरकातूनच महेशला वस्तुस्थितीची जाणीव झाली.

''अहो, हे काय ? तुम्ही काय बोलताय हे समजतंय का तुम्हाला ? मी सांगितलेय नं तुम्हाला ? या घरात दत्तात्रयला, भागीरथीला आणि त्यांच्या मुलांना जागा नाही आणि जर तुम्हाला हे मान्य नसेल तर मी या घरात राहणार नाही.''

आज नको अडवूस सुंदरा. आज मी तुझे काहीच ऐकणार नाही. माझा नातू आज पहिल्यांदा भेटतोय. आज मी तुझे ऐकणार नाही, तुला काय करायचे ते कर. विष्णूपंतांनी आज प्रथमच ठामपणे, कडक शब्दात सुंदराबाईंना सुनावले. त्यांचे बोलणे सहन न झाल्याने त्या फणफणत आतल्या खोलीत गेल्या.

''आजोबा, नमस्कार करतो.''

महोशने आजोबांना वाकून नमस्कार केला. दोघेही हॉलमधल्या लाकडी सोफ्यावर बसले. ''आजोबा, तुमच्याशी बोलायला, तुमची परवानगी घ्यायला मी आलोय.''

''बोल बाळा, तुला पाहून, तुझा आवाज ऐकून

मी तृप्त झालो. सांग कसली परवानगी हवी तुला ?''

''आम्ही सर्वजण उद्यापासून इथे रहायला येऊ ?''

''मी तर या क्षणाची किती वर्षांपासून वाट बघतोय, पण तुझ्या आजीच्या स्वभावाची.....'' दु:ख वेगाने आजोबा पुढे बोलू शकले नाही. त्यांचा हात हातात घेऊन महेश म्हणाला,

''आजोबा, तुम्ही नका काळजी करू, मी समजावीन आजीला'' महेश आजीच्या खोलीत गेला. आजी बसली होती. ''आजी गं ?'' महेशने हळुवार आवाजात हाक दिली. त्याची हळुवार हाक ऐकून सुंदराबाई नाही म्हटले तरी थोड्या हेलावल्या व त्याच्या डोळ्यांतील करारीपणा पाहून थोड्या नमल्या. त्यांना नमस्कार करून महेश परतला. रात्री जेवण झाल्यावर महेशने जेव्हा सर्व हकीकत दादांच्या कानावर घातली, तेव्हा ते अवाक् झाले. बराच वेळ ते काहीच बोलले नाही. अचानक ते महेशसमोर येऊन म्हणाले,

''तुला कुणी सांगितला होता शहाणपणा करायला ? मी आणि तुझी आई, आमचं लग्न झाल्यावर नमस्कार करायला गेलो, तर दारातूनच परत पाठवलं तिनं. तिला आमचं तोंडदेखील पहायचं नाही, आणि आम्ही तिच्याकडे रहायला जायचं ? आणि हे ठरवणारा तू कोण ?''

''दादा तुमच्या परवानगीशिवाय मी हा निर्णय घेतला. हे माझं चुकलं, पण तुम्हाला विचारलं असतं तर तुम्ही परवानगी दिली असती का ?नसती दिली ना ? दादा, आजोबा ?आपल्या सगळ्यांची आणि विशेषत: तुमची खूप वाट बघतायत. त्यांच्यासाठी तरी ऐका माझं.''

''नाही,आपल्याला नाही जमणार ते'' दत्तात्रय संतापाने हातवारे करीत बोलले.

''दादा तुमचा राग रास्त आहे. म्हणूनच तुमच्यासाठी आजपर्यंत आपण सर्वजण इथे गरिबीत, कष्टात राहिलो ना! जेव्हा ही परिस्थिती आपल्यापुरता मर्यादित होती, तेव्हा आम्ही कुणीच ,कधीच तक्रार केली नाही. यापुढे मात्र परिस्थिती बदलेल. निशाचं, आशाचं लग्न व्हायचंय, त्यावेळी आपल्या मोठ्या घरात आपण असणं योग्य आहे नं ? आणि तुम्ही फक्त आजीचाच का विचार करतात ? आजोबांचापण विचार करा नं.'' महेशचे बोलणे दत्तात्रयांना पटत होते, पण त्यांचा अहंभाव ते मान्य करायला तयार नव्हते.

''सगळे हट्टी आणि द्वाड माणसं माझ्याच का नशिबी आले आहेत कुणास ठाऊक कोणत्या जन्माचं पाप फेडतोय मी.....'' विषयाला फाटा देण्यासाठी ते तिथून निघून गेले. सकाळी त्यांना जाग आली तेव्हा सर्वजण सामानाची बांधाबांध करीत होते. दत्तात्रय ताडकन् अंथरुणातून उठले आणि रागाने ओरडले.

''सगळं सामान ठेवा तिथल्या तिथे, कुणीही कुठेही जाणार नाही. ज्यांना आपलं तोंडही पहायचं नाही, त्यांच्याकडे रहायला जायचं. लाज नाही वाटत तुम्हाला ? काही जायचं नाही. कुणी ?''

''मी जाणार आहे, माझ्या आईला आणि भावंडांना घेऊन, आपल्या हक्काच्या घरी! तुम्ही येणार असाल तर चला, नाही तर एकटेच रहा.'' दत्तात्रयांच्या समोर उभा राहून महेश धारदार स्वरात म्हणाला. त्याचा आवाज, डोळ्यातला निश्चय, करारीपणा पाहून दत्तात्रय गप्पच बसले.

सकाळी नऊ वाजता सामानाच्या टेम्पो वाड्यात पोहोचला, वाड्यातील एका बंद खोलीत सर्व सामान तात्पुरते ठेवण्यात आले. आजोबा चारही नातवंडांच्या गराड्यात

आनंदाने अक्षरश: हरखून गेले होते. देवघरात जाऊन महेशने आजीला वाकून नमस्कार केला.

''आजी, आम्ही आलोय.'' असे सांगितले, पण आजी काहीच बोलली नाही. थोड्या वेळाने दत्तात्रय व भागीरथीबाईही आले. भागीरथीबाईंना पुढे पाठवून दत्तात्रय बाहेरच विहिरीच्या काठावर बसले. भागीरथीबाईंनी पाय धुतले व त्या सुंदराबाईंच्या खोलीत गेल्या. त्या पलंगावर डोळे मिटून, पाय खाली सोडून बसल्या होत्या. भागीरथीबाईंनी वाकून नमस्कारासाठी त्यांच्या पायाला हात लावले. त्याचवेळी डोळ्यातील अश्रूंनी आपल्या सासूबाईंचे पाय धुतले. त्या स्पर्शाने सुंदराबाईनी डोळे उघडले. खाली मान घालून, पाय धरलेल्या सुनेला त्यांनी खांद्याला धरून उठवले. आपल्या गोऱ्यापान, रेखीव, सुंदर सुनेच्या कष्टाने रापलेला चेहरा पाहून सुंदराबाईदेखील हेलावल्या! तरीही कोरड्या शब्दातच त्यांना आशीर्वाद दिला. त्याचवेळी विष्णूपंत खोलीत आले. त्यांनी सुंदराबाईच्या हातात मोहनमाळ दिली.

''सूनबाईंसाठी ही मोहनमाळ केली होतीस ना? त्यांना दे तुझ्या हाताने''

हलकेच स्मितहास्य करीत सुंदराबाईंनी मोहनमाळ सूनबाईंच्या हातात दिली. सर्वजण वाड्यात रहायला येऊन एक महिना झाल होता. नवीन घरात, नवीन वातावरणात एव्हाना सर्वजण चांगले रुळले होते. दत्तात्रय व सुंदराबाई मात्र एकमेकांकडे बघतही नव्हते. बोलणे व सुसंवाद तर लांबचीच गोष्ट.

महेशचे पोस्टिंग जम्मूला झाले होते. सर्वांनी मिळून त्याची तयारी पूर्ण केली.

आज रात्री तो जम्मूला जाण्यासाठी निघणार होता. दुपारी जेवणानंतर महेश आजीच्या खोलीत गेला. आजी नेहमीप्रमाणे पलंगावर डोळे मिटून, पाय खाली सोडून बसली होती. महेश आजीजवळ बसला. हळुवार आवाजात म्हणाला,

''आजी, माझ्यामुळे तुला खूप त्रास झाला, मला माफ कर.''

''आता कशाला सारवासारव करतोस? आयुष्यभर ज्यांचं तोंडही पहायचं नव्हतं, त्यांच्याबरोबर रहावे लागणार आहे. खूप चांगलं केलंस.''

''आजी, तुझा राग मी समजू शकतो. या घराला! तुझ्या कर्तृत्वामुळेच हे वैभव मिळाले आहे, म्हणूनच घरातले सर्व निर्णय तुझ्या मनाने घेण्याचा तुला पूर्ण अधिकार आहे. तसे नाही झाले तर रागावण्याचा, अगदी खूप खूप रागावण्याचा सुध्दा तुला पूर्ण अधिकार आहे, पण आजी, कर्तृत्वाला अहंपणापेक्षा, रागाच्या किनारीपेक्षा प्रेमाची, माफीची झालरच शोभून दिसते. पटतंय नां? '' महेशचे बोलणे ऐकून आजी अवाक् झाली. मनात म्हणाली,

''माझा नातू मला इतके मोठे तत्त्वज्ञान शिकवतोय. गुणी माझा बाळ तो!''

संध्याकाळी मिलिटरीच्या पोशाखात महेश जम्मूला जाण्यासाठी निघाला. त्याने आजोबांना नमस्कार केला. त्यांनी महेशला जवळ घेतलं , म्हणाले,

''शाब्बास पोरा, फौजेत भरती होण्याआधी घरातली लढाई तू जिंकलीस! तुझ्या धैर्यामुळेच आज सर्व कुटुंब एकत्र आलंय, दोन तपानंतर.......! खरंच शूर शिपाई आहेस तू.''

◆◆◆

# मोठं मन

- सुजाता मेहता

***सुहानी आणि सुखदेव आता थकलेत. वृध्द झालेत. पण शब्बीरचा भक्कम आधार आहे त्यांना आणि शब्बीरचं काय नशीब पहा की, माता जन्मताच गेली पण सुहानीसारखी यशोदामय्या त्याला भेटली. आणि त्यामुळे त्याचं जीवन उज्ज्वल झालं.***

शब्बीर पेढे घेऊन आला आणि मी बघतच राहिले त्याच्याकडे. सहा फूट उंच ,धष्ट पुष्ट, आणि देखणा शब्बीर आज इंजिनीअर झाला होता. आणि म्हणूनच मला पेढे द्यायला आला होता.

मावशी अगं मी फस्ट क्लासमध्ये पास झालो, शब्बीर सांगत होता. मी ही मग त्याचे अभिनंदन केले. तोंड गोड केले आणि शब्बीर गेला. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत मी भूतकाळात गेले आणि आठवलं सुहानींन २२वर्षापूर्वी आणलेला एक गोरा गोरा गुटगुटीत मुलगा अवघ्या दोन महिन्यांचा.

सुहानी तशी माझी मैत्रीणच, जवळच राहणारी. फक्त माझ्यापेक्षा थोडीशी मोठी. दोन्ही मुली लागोपाठ झाल्या. दोघीही खूपच गुणी आणि सालस होत्या. शाळेत जाणे, अभ्यास करणे, यातच त्या मग्न असत आणि मग सुहानीने पण मुलगा पाहिजे असा हट्ट धरला नाही. दोन मुलींमध्ये ती गुंतून पडली. मुली मोठ्या होत होत्या. शिकत होत्या आणि त्या दोन कळया उमलतांना बघत सुहानी कौतुकाने आणि समाधानाने नहात होती. मला कधीही भेटली तरी मोठीचे मार्क छोटीची कला असं बरंच काही सांगत असायची.

मेमध्ये दोघींनाही सुट्टी होती. म्हणून चौघेही गावी गेले मनीध्यानी नसताना  गावी गेल्यावर एक वेगळाच प्रसंग घडला. आणि सुहानींचं आयुष्यचं बदलून गेलं. तिच्या गावात राहणाऱ्या एका महिलेचं सिझरिअन झालं आणि तिला जुळं झालं पण काय चूक झाली ते कोणालाच कळलं नाही. पण प्रंचड रक्तस्त्राव होऊन ती महिला दगावली. छोट्याशा गावात ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. दोन गोंडस मुलांना जन्म देऊन ती माता  दगावल्यावर सगळ्यांवरच आकाश कोसळलं. सुहानी पण त्या बाळांना पहायला हॉस्पिटला गेली. तोपर्यत तिच्याही मनात काहीच नव्हतं. पण त्या महिलेचं उत्तरकार्य वगैरे पार पाडलं आणि आता त्या दोन मुलांच्या पालनपोषणाचा प्रश्न निमार्ण झाला.आजी पण वयस्कर असल्यामुळे एकदम दोन बालकांना ती तरी कशी मोठी करणार ?

गावात जो तो वेगवेगळा पर्याय सुचवू लागला. आणि सुहानीच्या विचारांचे वादळ सुरू झाले. ती तिच्या नवऱ्याला म्हणाली, आपणच घेऊ या का मुंबईला एका बाळाला ? नाही तर आपल्याला मुलगा नाही. मुलींना भाऊ नाही आणि आता दोघी पण मोठ्या झाल्यात. मला शक्य आहे त्याला सांभाळण. सुखदीप सुहानीची कल्पना

ऐकून चाटच पडले. मग म्हणाले, थांब जरा विचार करू. मुलींची पण मतं विचारात घ्यायला हवीत. दोघींनीही कल्पना उचलून धरली. आम्हांला भाऊ मिळेल म्हणुन खूप आनंदल्या त्या. वडिलांनी दोघींना समजावलं बघा तुम्ही मोठ्या झाल्या आहात. आता घरात लहान बाळ म्हणजे शी, शू, पसारा साऱ्यांची तुम्हाला सवय करावी लागेल. आणि मुख्य म्हणजे हा तुमचा सख्खा भाऊ म्हणून मोठा होईल त्यामुळे इस्टेटीत समान हिस्सेदारी असेल. तुम्हाला हे मान्य असेल तरच आपण हे पाऊल उचलूया. अन्यथा आमची तुमच्यावर जबरदस्ती नाही.

पण रेवती ,रेवा दोघीही अतिशय गुणी मुली होत्याच. त्यांना आपल्या आईच्या मोठ्या मनाची कल्पना होती. दोघींनीही ह्या गोष्टीतील सर्व बारीक सारीक अडचणींना सामोरं जाण्याची तयारी दर्शविली आणि मगच सुहानीने त्या बाळाला दत्तक घेण्याचा निर्णय घेतला.



दोन महिने गावी राहून सुहानी जाताना चारजणं गेलेली येतांना पाचजणं आली.

आल्या आल्या तिचा मला फोन आला. तुला एक सरप्राइज द्यायचंय म्हणुन. मी संध्याकाळी जाऊन थडकलेच. तिच्या घरी बाळ पाहून संभ्रमात पडले पण तिच्या धाडसाचं कौतुक वाटलं. वयाची चाळिशी जवळ आलेली पण सुहानी शब्बीरचं सारं मनापासून करताना दिसायची. सतत त्याची शाळा त्याचं शिक्षण याच्याबद्दल माझ्याशी बोलायची, चर्चा करायची. मुलींची लग्न जमली,रेवतीचं आणि पाठोपाठ रेवाचं पण एक वर्षाच्या अंतराने लग्न झाली. पाच-सहा वर्षांचा शब्बीर नुसता नाचत होता;लग्नात! ताईच्या आणि दिदीच्या.

मुली सासरी गेल्यावर तर सुहानीच सारं विश्वच शब्बीर होऊन बसला. शब्बीर दहावीत चांगल्या मार्कांनी पास झाल्याचं पण कळलं मला. त्यानंतर बारावी झाल्यावर त्याला इंजिनीयरिंगला पाठवण्यासाठी सुहानीने खूप कष्ट सोसले. धावाधाव केली आणि आज तिच्या कष्टाचं चिज झालं असं वाटतंय. शब्बीर इंजिनीयर झाला.

सुहानी आणि सुखदेव आता थकलेत. वृध्द झालेत. पण शब्बीरचा भक्कम आधार आहे त्यांना आणि शब्बीरचं काय नशीब पहा की, माता जन्मताच गेली पण सुहानीसारखी यशोदामय्या त्याला भेटली. आणि त्यामुळे त्याचं जीवन उज्ज्वल झालं. सुहानी मोठ्या मनाची साऱ्यांनीच तारीफ केली. पण तिला मात्र आपण असं काही खूप मोठं केलं असं वाटत नाही. तर ती म्हणते देवाचीच कृपा.त्यानेच मला पुत्रवती बनवलं. मी फक्त निभावलं ते पद.

◆◆◆

## टिकली

सासू-किती वेळा सांगितले बाहेर जाताना टिकली लावत जा..

सून-जीन्सवर कोणी टिकली नाही लावत अहो..

सासू-अग जीन्सवर नाही..कपाळावर लाव....

**ओमनी फीचर्स**

# स्वागत नव्या विचारांचे

**- सुधा नांदेडकर**

''तुम्ही ऐकलंत का सावंतबाई, अहो त्या सोमणबाईंच्या स्मिताने रजिस्टर लग्न केलं. तो नवबुध्द तरुण आहे म्हणे.'' ''काय सांगताय काय? म्हणजे पळून गेली का काय?'' ''नाही हो, आई-वडिलांनीच रजिस्टर लग्न लावून दिलं.'' ''कमालच झाली. मुलीचे आजोबा म्हणे दशग्रंथी ब्राम्हण आहेत. अशा घराण्यातली नात कुळबुडवी निघाली. या नव्या पोरी जास्त शिकतात आणि नसते थेर करून कुळाला कलंक लावतात. आमची मिनू तशातली नाही बरं. ग्रॅज्युएट झालीय पण आम्ही ठरवलेल्या मुलाशी मुकाट्याने लग्न केलंन बरं तिनं.'' ''अहो पण नवरा दारुड्या, छंदीफंदी आहे म्हणून ती घटस्फोट घेणार असं कोणीसं म्हणतं होतं.''

''छे हो, भलतच काय- उगाच अफवा पसरवू नका पाटीलबाई. दारू पिणारे आमच्या घराण्यात पुष्कळ आहेत म्हणून कोणी नवरा सोडलेला नाहीये. माझी मुलगी माझ्या आज्ञेबाहेर नाही बरं?'' त्या सोमणबाईंच्या पोरीनं काहीतरी भानगड करून ठेवली असेल म्हणून घाईने लग्न उरकावं लागलं असणार. आत्ताच्या मुलींचा काही भरवसा नाही.

हा संवाद आदर्श सोसायटीचा दुसऱ्या मजल्यावरील बाल्कनीत जमलेल्या ४-५ बायकांच्यात चालू होता. तोच सानेबाई दार उघडून बाहेर आल्या व म्हणाल्या, ''बायांनो अफवा अशाच पसरतात बरं, धड काही माहीत नसता राइचे पर्वत केले जातात.''

पाटील : - अहो, तुम्ही सोमणबाईंच्या खास मैत्रीण म्हणून सावरून घेताय पण, सत्य लपत नाही बरं.

साने : - तेच मी सांगते. सत्य मला माहित्ये म्हणून वाईट वाटतं की भल्याला बुरं मानलं जातं त्याचं.

सावंत : - अहो, गाजावाजा नव्हता झटपट लग्न उरकलं म्हणजे काहीतरी पाणी मुरत असणार.

साने : - बायांनो सत्य मला माहित्ये. सांगू तुम्हाला?

सावंत : - सांगा की, मुलीला दिवस गेले असतील म्हणून.........

साने : - हे पहा ताई, पुराव्याशिवाय बोलून उगाच कुणाला बदनाम करणं हा गुन्हा ठरतो समजलं? सोमणबाईंच्या जावयाला कंपनी दिल्लीला पाठवत्येय तेव्हा दोघांनी बरोबर जावं म्हणून घाईने लग्न उरकलंय. एक गोष्ट लक्षात घ्या, दोन महिन्यांपूर्वी याच तरुणाचं तुम्ही तोंड फाटेपर्यंत कौतुक करत होतात.

सावंत : - अहो, तो काळा का गोरा, कोण कुठला मला माहीत नाही....

साने : - मी देते ना आठवण करून. बाईसाहेब, एकदा तुमच्या किचनमध्ये सिलिंडरचा स्फोट होऊन तुम्ही भाजलात तेव्हा माझ्याकडे आलेला हा तरुण धावला होता. तुम्हाला वाचवताना त्याची बोटे भाजली तरी त्याने झटपट उपाय करून मित्राला फोन लावून मोटारीसह बोलवून हॉस्पिटलमध्ये ॲडमीट केलं होतं.

सावंत : - अगोबाई तो का हा ? फारच उपकार केलेत

हो माझ्यावर. त्याने घाई केली नसती तर.........

पाटील : – तर कदाचित तुम्ही आज हयात नसतात.

सावंत : –खरं ग बाई. त्याच्यामुळेच मी आज जिती हाय.

साने : – बायांनो, तो तरुण म्हणजेच सोमणबाईंचा जावई. अतिशय सालस, नम्र, निर्व्यसनी आहे. माणसाला गुणांवरून ओळखायचं की जातीवरून ? अहो माणसाची वृत्ती, नीतिमत्ता महत्त्वाची असते. सोमण मंडळी मानवता धर्म जाणतात. हिंदुत्वाचा त्यांना अभिमान आहे. त्या मुलाचं आणि स्मिताचं प्रेम दुर्लक्षून फक्त जातीला महत्त्व देणं योग्य ठरलं असतं का ?

सावंत : – सानेताई, चुकलंच माझं. गैरसमजामुळे मी जे काही बोलले त्याबद्दल क्षमा मागते मी.

साने : – अहो, माझी नका क्षमा मागू काही माहीत नसताना उगाचच चिखलफेक करणं हा सामाजिक गुन्हा ठरू शकतो. आजच्या उदाहरणावरून शहाणं व्हायचा सर्वांनी प्रयत्न करू या.

पाटील : – सानेताई, तुम्ही आमच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातलंत हो.

सावंत : – यापुढे आम्ही विचारपूर्वक बोलू बरं.

साने : – छान, आता एक सांगते, उद्या संध्याकाळी ५ वाजता सोमणबाईबरोबर त्यांची मुलगी–जावई माझ्याकडे चहा–फाराळाला येणार आहेत, तेव्हा तुम्हीपण नक्की या. सहवासाने अन् संवादामुळे माणसांचा स्वभाव समजतो आणि गैरसमज वाढत नाहीत तेव्हा जरूर या.

(नक्की ठरवून साऱ्या घरोघरी जातात. दुसऱ्या दिवशी सानेबाईंकडे वेळेवर हजर होतात. स्मिता–सुदेश साऱ्यांना वाकून नमस्कार करतात. साऱ्याजणी मनापासून शुभाशीर्वाद देतात.)

सोमणताई : – भगिनींनो, आम्ही मुलीचं लग्न झटपट केलं म्हणून तुम्हाला नवल वाटलं असेल पण हॉलभाडं, लग्नसोहळा, भटजी दक्षिणा, जेवणावळ टाळून वाचलेले पैसे आम्ही मुलीचा संसार थाटण्यासाठी दिलेत. दिल्लीला बदली झालेल्या मुली–जावयाच्या संसाराला दिले यात आमचं फार चुकलं असं वाटतंय का तुम्हाला ?

सावंत :– सोमणताई, तुमची ही कल्पना आम्हाला फार पटली. दिखाऊपणापेक्षा मुलीचा संसार उभा करणं महत्त्वाचं आहे. लग्नाला बोलावलं नाही म्हणून आम्ही मुळीच रागावलो नाही. ऋण काढून सण करू नये हा धडा आम्हाला तुमच्याकडून मिळाला. माझ्या दुसऱ्या मुलीच्या वेळी तुमचा आदर्श डोळ्यासमोर ठेवू. अहो, अजून दोन मुली लग्नाच्या आहेत हो.

सानेबाई : – आदर्श सोसायटीच्या आदर्श बायांनो, आता गप्पा पुरेत. जावई ताटकळत बसलेत तेव्हा प्रथम फराळ अन् चहाचा समाचार घ्या. ब्रेकनंतर चर्चा करता येईलच की.

खाणे–पिणे झाल्यावर सोमणताईंच्या नवविचारांचे भरपूर कौतुक करून आणि नव दांपत्याला मन:पूर्वक आशीर्वाद देऊन साऱ्या आपापल्या घरी परतल्या. आपल्या पतीराजांना ही नव कल्पना पटवून द्यायचा निश्चय सावंतबाईंनी मनोमन ठरवला. आदर्श सोसायटीतल्या आपल्या शेजारणींचं मनपरिवर्तन लक्षात येऊन सानेबाई सुखावल्या.

◆◆◆

# घरोघरी त्याच परी

**– सुनीता सुरेश देहेरकर**

प्रस्तावना : – सून आणि सासू यांचे संबंध कधीच मैत्रीपूर्ण नसतात. त्यातच जर सासू जुन्या पिढीची व सून नव्या पिढीची असेल तर बघायलाच नको. या नाटिकेत, सुट्टीच्या दिवशी, चार मैत्रिणी एकत्र येतात. या साऱ्या विवाहित असून वेगवेगळ्या ठिकाणी कामाला आहेत. या चौघींपैकी एक म्हणजे सौ. क्षमा देशपांडे वयाने बाकी तिघींना सीनियर आहेत. सौ. देशपांडे यांनीच बाकी तिघींना आज आपल्या घरी अगत्याचे नियंत्रण देऊन बोलवले आहे. कारण सौ. देशपांडे यांचे पती आपल्या आईला घेऊन कोकणातल्या घरी, आपल्या एकुलत्या एक मुलासहित गेले आहेत. तिथे ते दोन–तीन दिवस राहणार असल्याने सौ. देशपांडेना मोकळे रान मिळाले आहे. या चारही मैत्रिणींचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे सासर कोकणातील आहे. त्यामुळे त्यांची एकमेकींशी घट्ट मैत्री आहे. सर्व मैत्रिणी मुंबईत राहायला व कामाला असल्याने त्यांच्या सासूबाई जीवाची मुंबई करायला अधून–मधून येत असतात. परंतु या चौघींचे सासूबाईंबरोबर या ना त्या कारणाने पटत नसते व वारंवार खटके उडत असतात. सौ. क्षमा देशपांडे यांनाही सासूबाई कोकणतल्या घरी गेल्याचा आनंद साजरा करायचा आहे आणि म्हणून आपल्या तीन मैत्रिणींना त्यांनी मौजमजा करण्याकरता तसेच गप्पाटप्पा करण्याकरता बोलावून घेतले आहे. चार विवाहित स्त्रिया एकत्र आल्यावर त्यांची चर्चा आपला नवरा, त्याची बहीण व मैत्रीण तसेच नवऱ्याची आई (सासू) यावरच होणार हे उघड आहे. तर चला पाहूया चार मैत्रिणींचा वादसंवाद, संभाषण व चर्चा.

मैत्रीण नं. १ – काय देशपांडे मॅडम, येऊ का घरात ?

सौ. देशपांडे – अगं ये की आणि त्या बाकीच्या दोघी कुठे आहेत.

मैत्रीण नं.१ , (मागे वळून) त्या काय. माझ्या मागेच तर आहेत.

सौ. देशपांडे – या ऽ या. घर आपलंच आहे आणि आपल्या या घरात तुमचं स्वागत आहे.

सौ. विचारे – काय मॅडम, आज काही विशेष ?

(मैत्रीण नं.२)

सौ. देशपांडे , नाही गं. आज घरात एकटीच आहे. तेव्हा मनात म्हटले की आपलेच राज्य आहे तर थोडी मौजमजा करावी. तुमच्याशी गप्पाटप्पा कराव्या. गरमागरम कांदा भजी व कांदे पोहे खावेत व मस्तपैकी कॉफी प्यावी असा बेत आखला आहे. आज कुठलंही टेन्स नसल्याने म्हटले रिलॅक्स होऊया. कळलं ! काय, कसा वाटला बेत ?

सौ. विचारे – वा ! छानच की, म्हणतात ना दुधात साखर, तसे कला वाटते. लेकीन किस खुशीमे ?

सौ. देशपांडे – ते मी नंतर सांगेन हवं तर तू गेस कर....

सौ. विचारे – सासू कोकणात गेली म्हणूनच ना.

सौ. देशपांडे – हो ग हो अगदी बरोबर ओळखलंस. माझ्या सासूबाई पंधरा दिवस रहायला आल्या होत्या. पण चांगलं एक महिना तळ ठोकून बसल्या होत्या. त्या एक महिन्यातच मला अगदी सळो की पळो करून सोडले

होते. त्यांचे ते सोवळंओवळं, व्रतवैकल्य, उपासतापास या सर्व गोष्टींनी मी अगदी कंटाळून गेले होते.

सौ. विचारे – त्यामुळेच तू ठरवलेस ना की सासू गेलीच पाहिजे म्हणून. खरं ना !

सौ. देशपांडे – तू तर अगदी मनंकवडी आहेस आणि म्हणून तुला आणि आपल्या ग्रुपमधल्या या दोघींना बोलावून घेतले. आज कसं अगदी 'आनंदी आनंद गडे जिकडे तिकडे चोहिकडे' अस वाटतं पण मला सांग, तू कसं अगदी बरोबर ओळखलंस ?

सौ. विचारे – अगं, एकदम सोपे आहे ते. हा अनुभव मलाही आलाय. माझी सासू म्हणजे तुझ्या सासूची झेरॉक्स् कॉपी आहे. ती जेव्हा माझ्याकडे होती तेव्हा नाकीनऊ आणले होते.

सौ. देशपांडे – काय सांगतेस. नाकी नऊ आणले होते म्हणजे नक्की काय केले तिने ?

सौ. विचारे – अग, नेहमी मला घालून पाडून बोलायची, टोमणे मारायची, अपमान करायची. माझ्या वडिलांनी लग्नात हुंडा वगैरे दिला नाही ना त्याचा बहुधा तिला राग असावा. नवरा घरी नसताना मला म्हणायची, ''मला एक गोष्ट कळत नाही सूनबाई, माझ्या मुलाने नक्की काय पाहिले तुझ्यात. ना तुला रूप ना बुध्दी. माझ्या साध्या भोळ्या मुलावर काय जादू केलीस गं. तो पण मूर्खच. तुझ्या प्रेमाच्या जाळ्यात बरोबर अडकला.''

सौ. देशपांडे – मग, तू काय जबाब दिलास ?

सौ. विचारे – मी पण मग सडेतोड जबाब दिला. मी म्हटले, ''सासूबाई, मी जर तुम्हाला पसंत नव्हते तर तुम्ही नाही म्हणायचे. तुमच्या मुलावर कुणी सक्ती केली नव्हती. मला रूप आणि बुध्दी नाही म्हणता, मग तुमचा मुलगा काय आंधळा आहे का ? त्याला नाही म्हणता आले असते आणि तुम्ही काय गांधारीसारखी डोळ्यांवर पट्टी बांधली होती का ? स्वत:च्या सुनेला नावे ठेवता आणि पाण्यात पाहता.''

सौ. देशपांडे – मग काय म्हणाली, ती थेरडी ?

सौ. विचारे – ती म्हणाली, ''सूनबाई, मी तुला पाण्यात नाही पाहत पण नाईलाजाने या घरात तुला रोज पाहावे लागते. '' मग मी पण चिडून म्हणाले, ''साठी बुध्दी नाठी म्हणतात ते काही खोटे नाही. माझ्याजागी तुमची मुलगी असती तर तिच्याशी पण अशाच वागल्या असता का ?''

सौ. देशपांडे – बर झालं तू तोंड उघडलस ते. नाहीतर म्हातारी डोक्यावर चढून बसली असती. पण शेवटी ब्याद घराबाहेर काढली कशी ?

सौ. विचारे – देशपांडेबाई, शेवटी माझे नाव विचारे आहे. मी विचार केला की या म्हातारीस नवऱ्यासमोर उघडे पाडण्याकरता व तिचे खरे स्वरूप दाखवण्याकरता पुराव्याची गरज आहे आणि म्हणून मी जेंव्हा जेव्हा म्हातारी भांडायची तेव्हा तेव्हा छोट्या टेपरेकॉर्डर वर तिचे बोलणे टेप केले व संधी मिळताच ते बोलणे नवऱ्याला ऐकवले. सासूबाई च्याटच पडल्या. आपली सून आपल्याला तोंडघशी पाडेल याची त्यांना पुसटशीही कल्पना नव्हती. सासूबाई चारी मुंड्या चित झाल्या. शेवटी हात जोडून म्हणाल्या ''सूनबाई, मी चुकले. पुन्हा मी तुझ्या संसारात ढवळाढवळ करणार नाही. शिवाय मला इथे करमतही नाही. मी उद्याच गावाला निघून जाणार आहे.'' आणि म्हातारी खरंच निघून गेली.

सौ. देशपांडे – वा ! मानलं तुला. सासूने तुझ्या नाकी नऊ आणले होते पण तू तर नहले पे दहला ठरलीस.

मैत्रीण नं.२ – अहो देशपांडेबाई, तुम्हा दोघीना तर सासूचाच जाच सहन करावा लागला. माझ्यावर तर डबल (सौ.शहाणे) अॅटॅक झाला होता.

सौ. देशपांडे – डबल अॅटॅक म्हणजे ? आम्ही नाही समजलो.

मैत्रीण नं.२ – अहो मॅडम, डबल अॅटॅक म्हणजे दुहेरी हल्ला. माझी सासू व नणंद या दोघींचा. दोघींही माझ्या (सौ.शहाणे) माझ्या मागे हात धुऊन लागल्या होत्या. एकीची कटकट असायची तर दुसरीची वटवट. हे कर ते कर. अस वागू नको तस वागू नको असं सारखं चालायचं. दररोज माझी शाळा घ्यायच्या तेंव्हच मी ठरवले की या दोघींना धडा शिकवायचा.

सौ. देशपांडे – मग काय उपाय केलास तो तरी आम्हाला सांग ?

सौ. शहाणे – अहो मॅडम, असा जालीम उपाय केला ना की, दोघी परत कधी माझ्या वाटेल जाणार नाहीत.

सौ. देशपांडे – अगं सांगतेस काय, आम्हाला तरी कळू दे तो उपाय.

सौ. शहाणे – काही नाही ते. एक दिवस ऑफिसमधून लवकर घरी आले. हातात डॉ. चे प्रिस्क्रिपशन व औषशाची बाटली बधून मायलेकीनी विचारले, ''काय ग, काय झालं!''

सौ. देशपांडे – मग काय सांगितलेस त्या मायलेकींना.

सौ. शहाणे – मी सांगितले की, सासूबाई माझ्या छातीत अचानक दुखायला लागले व कळा यायला लागल्या आणि म्हणून मी ऑफिसतून डायरेक्ट डॉक्टर पाटरकरांकडे गेले. मला तपासून ते म्हणाले, ''हे काय मॅडम, तुम्हाला हृदय विकाराचा धोका संभवतो, तेव्हा १०-१५ दिवस पूर्णपणे विश्रांती घ्या. अजिबात कामाला हात लावू नका, अक्षरश: इकडची काडी तिकडे करू नका तसेच तुमच्या घरच्या लोकांना पण सांगा की त्यांनी तुम्हाला शारीरिक व मानसिक त्रास देता कामा नये. तरच तुम्ही लवकर बऱ्या व्हाल.''

सौ. देशपांडे – अगं पण तू त्या डॉक्टर पाटकरांकडे का गेलीस. त्याचा दवाखाना अजिबात चालत नाही तुला माहीत आहे का, त्याला 'सर्टिफिकेटवाला डॉक्टर' म्हणतात. काहीजण त्याला 'डॉ. उगाच' देखील म्हणतात.

सौ. शहाणे – अगं, म्हणून तर मी त्या डॉक्टरांकडे गेले होते. डॉक्टर पाटकर माझ्या वडिलांचे चांगले मित्र आहेत. त्यांच्याकडून मला हवे ते सर्टिफिकेट मिळू शकेल. हवे ते प्रिस्क्रिशन ते मला देऊ शकतात. दुसरा कुठलाही डॉक्टर असं करेल का ? शिवाय मी काय खरोखर आजारी नव्हते ना. माझ्या छातीत दुखत होते ना... माझ्या छातीत कळा येत होत्या कळलं!

सौ. देशपांडे – कळलं गं बाई कळलं! तुझ्या छातीत कळा जरी येत नव्हत्या तरी तुझ्या अंतरीच्या नाना कळा कळल्या बरं! तू हे सर्व नाटक तुझ्या सासू व नणंदेला धडा शिकवण्यासाठी केल तर.

सौ. शहाणे – आता कस बोललीस! लातो के भूत बातोसे नही मानते. तुला पुढची मजा सांगते ती ऐक.

सौ. देशपांडे – सांग, सांग आमची पण उत्सुकता वाढली आहे. तुझे नाव शहाणे सार्थ केलस हं!

सौ. शहाणे – मी माझ्या आजारपणाचे खोटे कारण सांगितल्यावर दोघी मायलेकींचे चेहरे पाहण्यासारखे झाले. मग मीच पुढे म्हणाले, ''सासूबाई, डॉक्टर जरी म्हणाले की, माझी काळजी घेण्यासाठी एक महिना तरी एखादी बाई ठेवा तरी तसे मी करणार नाही कारण तुम्ही दोघी इथे

असताना बाई ठेवण्याची गरजच काय? शिवाय तुम्ही दोघी जेवढ्या आपुलकीने व जिव्हाळ्याने माझी काळजी घ्याल तशी काळजी परकी बाई थोडीच घेणार.''

सौ. देशपांडे – तू जर एकदम गुगली बॉलच टाकला दोघींना. दोघींना एकदम क्लीन बोल्ड करून टाकलेस.

सौ. शहाणे – अगं दोघींची मोठी विचित्र अवस्था झाली. त्यांना 'हो' ही म्हणता येत नव्हते व 'ना' ही म्हणता येत नव्हते. त्या दोघी गावावरून मजा करायला आल्या होत्या. पण मी त्यांना चागली सजा देणार होते. त्या शेर होत्या तर मी सव्वाशेर होते. त्या नाठाळ होत्या तर मी पण खट्याळ होते. मग मी मानभावीपणाने म्हटले, ''काय सासूबाई, घेणार माझी काळजी.'' सासूची बोलतीच बंद झाली.

सौ. देशपांडे – काय गं, नवऱ्याला चक्क बैल बोलतेस. तुझ्या जिभेला काही हाड.

सौ. शहाणे – बाई, माझ्या जिभेला नसेल हाड पण त्या दोघी मला सारख्या हाड–हाड करायच्या ते मी कुठवर सहन करायचे. सांगा ना. माझी आई, माझ्या नवऱ्याला नेहमी म्हणते की, ''अहो जावई, माझी मुलगी गरीब गाय आहे.'' आता तुम्ही सांगा, गाईचा नवरा बैल असतो ना?

सौ. देशपांडे – हो गं बाई हो! खरे आहे तुझे, पण मला आता सांग त्या दोघींनी मग काय केले?

सौ. शहाणे – त्या दोघींनी पळ काढला दुसरे काय. जाताना सासूबाई म्हणाल्या, ''अगं सूनबाई, मी तुला सांगायला विसरले पण आता सांगते. तुझ्या दिराचा फोन आला होता की आई ताबडतोब गावाला निघून ये. इथली शेतीची कामे खोळंबलीत'' आम्हा दोघींना आता जावेच लागेल. आमचा नाइलाज आहे. पण डॉक्टर म्हणतात ना तशी एखादी बाई ठेव. माझी काही हरकत असणार नाही. हवं तर तुझ्या आईला आण काही दिवस. खरं तर मला आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या पण चेहऱ्यावर कुठलेही भाव न दर्शविता मी म्हणाले, ''जा तुम्ही, सासूबाई. तुमच्या सल्ल्याप्रमाणे मी आणीन माझ्या आईला.''

सौ. देशपांडे – खरचं तू कमाल केलीस. शहाणी माझी बायती.

मैत्रीण नं.३ – देशपांडेबाई, माझी केस थोडी वेगळी आहे.

(सौ. कारेकर)

सौ. देशपांडे – ती कशी काय ग?

सौ. कारेकर – मॅडम, तुम्हा सर्वांना माहीत आहेच की माझे लव्ह मॅरेज झालेले आहे. माझे सासरे व माझी सासू माझ्यावर जळून असतात कारण त्यांना नात्यातल्या मुलीला सून म्हणून आणायची होती. त्यांची इच्छा पुरी न झाल्याने ते माझ्यावर सूड उगवत असतात. छळत असतात व येनकेन प्रकारेच त्रास देतात.

सौ. देशपांडे – अग पण तुझा नवरा काहीच का बोलत नाही. लव्ह मॅरेज केले ना त्याने. मग त्याची जबाबदारी नाही का तुला सुखी ठेवायची.

सौ. कारेकर – माझा नवरा घरी असताना दोघेही त्याच्याशी हसून असतात. त्याच्या देखत मला एक शब्दही वाईट बोलत नाहीत, पण नवऱ्याची पाठ वळली की माझ्या पाठीशी मात्र हात धुवून लागतात.

सौ. देशपांडे – अग, हात धुऊन लागतात ना मग ठीक आहे. तुझ्या पाठीवर डाग तरी पडणार नाहीत.

(हसून)

सौ. कारेकर - काय मॅडम, माझी मस्करी करता. मी सिरियसली सांगते तर तुम्ही लाइटली घेता.

सौ. देशपांडे - अग, मस्करी केली. बरं, बोल पुढे.

सौ. कारेकर - मॅडम, माझे सासूसासऱ्यारे, नवऱ्याशी जरी हसून असतात तरी माझ्याशी मात्र रुसून असतात.

सौ. देशपांडे - मग यावर तोडगा कसा काढलास ?

सौ. कारेकर - अहो बाई, बरेच दिवस मी मुकाटपणे त्या दोघांचा त्रास सहन केला. मी मनात म्हटले, माझे लव्ह मॅरेज त्यांना पसंत नव्हते तेव्हा आपण त्याच्याशी जुळवून घ्यावे. एकदम चुकीचे पाऊल उचलणे बरे दिसणार नाही. मी तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करत राहिले. माझी स्थिती, सहनही होत नाही व सांगताही येत नाही, अशी झाली होती. मला तोडगा काढायचा होता पण नवऱ्याला न दुखवता . नवऱ्यानी पण मला साथ द्यायचे कबूल केले कारण शेवटी आमचा प्रेमविवाह होता. शिवाय त्याचा माझ्यावर विश्वासही होता.

सौ. देशपांडे - पण मग तू केलेस तरी काय ?

सौ. कारेकर - शेवटी मी ब्रम्हास्त्र बाहेर काढले. मी माझ्या नवऱ्याला म्हणाले, ''हे बघा, मी तुमच्या आई-वडिलांशी जुळवून घ्यायचा खूप प्रयत्न केला पण ते काही जुळवून घ्यायला तयार नाहीत. मला टोमणे मारणे, घालून-पाडून बोलणे व मानसिक छळ करणे चालूच आहे. आता वेळ आली आहे, तुम्हाला निर्णय घेण्याची. एक तर तुम्ही तुमच्या आई-वडिलांना वृध्दाश्रमात पाठवा नाहीतर मला तरी माहेरी पाठवा. तुम्ही द्याल तो निर्णय माल मान्य असेल.''

सौ. देशपांडे - तू तर मोठा बॉम्बगोळाच टाकला की ? तुझा नवरा चांगला गडबडूनच गेला असेल की.

सौ. कारेकर - गडबडून गेला काय म्हणता, त्यांनी तर चक्क शरणागतीच पत्करली. परंतु ते आमच्या दोघांचे नाटक होते. सासू-सासऱ्यांना म्हणजे त्याच्या आई-वडिलांना धडा शिकविण्यासाठी.

सौ. देशपांडे - काय ग, तुझ्या निर्वाणीच्या इशाऱ्यानंतर तुझा नवरा आई-वडिलांना काय म्हणाला ?

सौ. कारेकर - त्याने आई-वडिलांना निक्षून सांगितले की, ''हे बघा बाबा आणि आई, मी बायकोची बाजू घेऊन बोलतो अस नाही तर खरं तेच बोलतो. मी प्रेमविवाह केला म्हणून तुम्ही तिला किती छळाल. तुम्हाला तिच्याबरोबर जुळवून घ्यावेच लागेल कारण आपण सध्या राहतोना तो फ्लॅट तिच्या नावावर आहे आणि कर्जाचे हप्तेही तीच तिच्या पगारातून फेडत असते. तिने जर मनात आणले तर ती आपणा सर्वांना बाहेर काढू शकते. एका चाळीत राहणाऱ्या मुलाशी तिने लग्न केले व लग्नानंतर एक वर्षानी स्वत:च्या हिंमतीवर फ्लॅट घेतला एवढं तरी लक्षात ठेवा.''

सौ. देशपांडे - वा! छान! तुझ्या सासू-साऱ्याच्या अरेरावीला तू चोख उत्तर दिलेस. त्यांच्या अरे ला तू कारे करून कारेकर नाव सार्थ केलेस. मला तुझा अभिमान वाटतो.

सौ. कारेकर - पण बाई, या सर्व प्लॅनमध्ये माझ्या नवऱ्याने मला खूप सहकार्य केले. मला एकटीला शक्य झाले नसते.

सौ. देशपांडे - पण तुझ्या सासू-सासऱ्यांची काय प्रतिक्रिया होती या सगळ्या प्रकरणामध्ये.

सौ. कारेकर - त्यांना मुलाकडून असे काही होईल हे अपेक्षित नव्हते. शेवटी सासरेबुवा म्हणाले देखील, ''सूनबाई, आमची चूक झाली आम्हाला माफ कर. आजपर्यंत

आम्ही समजत होतो की हा फ्लॅट आमच्या मुलाचा आहे पण प्रत्यक्षात तो तुझा असताना तू कधीही तसा टेंभा मिरवला नाही. शाब्बास सूनबाई शाब्बास.''

सौ. देशपांडे – वा! खरचं तुला मानायलाच हवे. अगं, आपल्या सासवापण पहिल्यांदा कुणाच्या ना कुणाच्या तरी सुनाच होत्या. त्यावेळी त्यांचा झालेला छळ किंवा अन्याय याचे शब्द (त्याच्या हृदयात खोल रुतून बसलेले आहे.) त्यांचे प्रतिबिंब त्यांच्या वागण्यातच पडते, पण आपणही सामंजस्यानी भूमिका घ्यायला हवी. टोकाची भूमिका घेऊन कुणाचेच भले होणार नाही. माझी आई नेहमी म्हणायची,'' क्षमा तुला क्षमा या शब्दाचा दुसरा अर्थ माहीत आहे का? क्षमाचा अर्थ आहे पृथ्वी. आपण सर्व या पृथ्वीवर किती अन्याय करतो, अत्याचार करतो पण ती मात्र आपल्याला क्षमा करून सुंदर फुले, गोड फळे, मधुर पाणी, चविष्ट अन्न, शुध्द हवा देते ना. स्त्रीचे अंत:करण असंच असायला हवे.'' घरोघरी जरी त्याचपरी असल्या तरी आपण आपली चूक सुधारून त्यांना मानाने व सन्मानाने बोलावू या. (टाळ्या पडतात) तिघी मैत्रिणी (एकदम) हो मॅडम, आम्ही तयार आहोत.

◆◆◆

With Best Compliments from

Architect
Suresh
Gaikwad

# टीप्स्

– **कीर्ती वैती**

**स्वंयपाकघरातलं व्हिनेगर**

- ❊ स्वयंपाकात नेहमी व्हाइट डिस्टील व्हिनेगर वापरतात. आपल्याकडे ज्याप्रमाणे आंबटगोड चवीसाठी चिंच आणि गूळ वापरला जातो त्याप्रमाणे चायनीज पदार्थांमध्ये व्हिनेगर व साखर वापरली जाते. व्हिनेगर आम्लधर्मी असल्यानं आंबट चव असते. व्हिनेगरचा उपयोग लोणची टिकवण्यासाठी, सॅलड ड्रेसिंगसाठी, टोमॅटो केचअपमध्ये तसेच मेयोनीजमध्ये केला जातो. अमेरिकेत बटाटयाचे वेफर्स तसेच ब्रिटनमध्ये फ्रेंच फ्राईजना स्वादासाठी व्हिनेगरचा वापर होतो.
- ❊ १ भाग व्हाइट डिस्टील व्हिनेगर आणि चार भाग तेल एकत्र करून सॅलड ड्रेसिंग म्हणून वापरलं जातं. १ भाग व्हिनेगरमध्ये ३ भाग तेल आणि थोडं क्रीम व्हिनेग्रेट हे सॅलड ड्रेसिंग तयार केलं जातं
- ❊ घरात लिंबू नसेल आणि एखादया पदार्थात लिंबाचा रस आवश्यक असेल तर १ चमचा लिंबूऐवजी अर्धा चमचा व्हिनेगर वापरता येतं कमी आंबट हवं असेल तर पाव चमचा घालावं.
- ❊ काही वेळा पालेभाज्या शिळया झाल्या की देठ लुळे पडतात.दोन कप पाण्यात १ टेबलस्पून व्हिनेगर घालून त्यात भाजी बुडवून ठेवली की ताजीतवानी होते.
- ❊ कित्येक वेळा चीजच्या डब्यातलं सगळं चीज पदार्थांसाठी वापरलेलं नसतं अशावेळी उरलेलं चीज व्हिनेगरमुळे चीजवर बुरशीही येत नाही.
- ❊ पुलाव करताना तांदूळ पूर्ण फुललेला हवा असेल तर पाण्यात १ टीस्पून व्हिनेगर घातल्यानं हा परिणाम साधता येतो.
- ❊ कॉलीफ्लॉवर, बीट, फरसबीसारख्या भाज्या उकडताना पाण्यात १ चमचा व्हिनेगर घातल्यास त्यांचा रंग कायम राहतो गॅस  होत नाही आणि चवही चांगली लागते.
- ❊ पास्ता उकडतानाही पाण्यात १ चमचा व्हिनेगर घातल्यास तो कमी चिकटतो. व्हाइट सॉसमध्ये १ चमचा व्हिनेगर घातल्याने त्याची चव वाढते. रेड अ‍ॅण्ड व्हाईट व्हिनेगर ड्रेसिंगसाठी वापरलं जातं
- ❊ अ‍ॅपल सायडर व्हिनेगरचाही उदयोग सॅलड ड्रेसिंगसाठी होतो.आपल्याकडे जे चायनीज बनवलं जातं त्यासाठी राइस व्हिनेगर वापरलं जातं. यामध्ये आम्लधर्म कमी असतो आणि स्वादही मंद असतो. धान्यापासून बनवलेल्या प्लेन डिस्टील व्हिनेगरला तीव्र स्वाद असतो. त्यामुळे पदार्थांमध्ये ते वापरल्यास अत्यंत कमी प्रमाणात वापरावं लागतं.
- ❊ लसूण आणि कांदयाचा वास हाताला येऊ नये म्हणून लसूण सोलण्याच्या तसेच कांदे चिरण्याच्या आधी आणि नंतर हाताला व्हिनेगर चोळावं व

मग हात धुऊन टाकावे.

❋ काही भांडी घासली तरी त्यांना तेलाचा वास येत राहतो. तो येऊ नये म्हणून साबणाच्या पाण्यात व्हिनेगर घालून ते पाणी त्या भांडयात घालून ठेवावं. थोडया वेळानं भांडे धुवून टाकावे.

❋ ज्या कटिंग बोर्डवर भाज्या कापल्या जातात तो व्हिनेगरमिश्रित पाण्यानं आठवडयातून दोनदा तरी धुवावा म्हणजे तो सूक्ष्मजीविरहित होतो.

❋ जेवणाचे डबे कितीही घासले तरी काही वेळा त्यांना अन्नाचा वास येतच राहतो. तो घालविण्यासाठी व्हिनेगरमध्ये बुडवलेला कापडाचा तुकडा डब्यात घालून रात्रभर ठेवावा. सकाळी साबणानं डबा धुऊन टाकावा

❋ कित्येक वेळा केचअपच्या बाटलीच्या छोटया तोंडाशी ते चिकटून राहतं व्हिनेगर वापरून त्याचा पातळ थरदेखील काढता येतो.

❋ व्हिनेगरमिश्रित पाण्यात स्वच्छ फडकं बुडवून पिळून त्या फडक्यानं रेफ्रिजरेटरचा अंतर्भाग पुसला तर स्वच्छ होतो.

❋ मायक्रोवेव्ह ओव्हनमध्ये वस्तू सारख्या सारख्या गरम करून त्याचे वास आत भरून राहिलेले असतात. कित्येक वेळा पदार्थाचे सूक्ष्म कण ओव्हनच्या अंतर्भागावर जाऊन बसतात ते काढणं इतकं सोपं नसतं त्यासाठी मायक्रोवेव्हप्रूफ भांडयात पाव कप व्हिनेगर व एक कप पाण्याचं मिश्रण ठेवून त्याला उकळी आणावी. मायक्रोवेव्ह ओव्हन बंद करून थोडया वेळानं भांडं अलगद बाहेर काढावं आणि ओव्हनचा अंतर्भाग पुसून घ्यावा. चिकटलेले सूक्ष्म कण निघून येतात. साध्या ओव्हनचा अंतर्भागही व्हिनेगर पाण्यानं ओल्या केलेल्या फडक्यानं पुसून काढल्यास स्वच्छ होतो.

❋ ॲल्युमिनिमच्या कढया कित्येक वेळा वापरून काळया पडतात. अशा वेळी त्या १ कप पाण्यास १ टेबलस्पून व्हिनेगर या प्रमाणात द्राव घालून तो उकळावा म्हणजे काळपटपणा जातो. फ्रुड प्रोससर, टोस्टर यांचे पृष्ठभाग, स्वयंपाकघरातील टेबलांचे पृष्ठभाग व्हिनेगरमिश्रित पाण्यानं पुसल्यास चकचकीत होतात.

**स्वयंपाकघरातील टीप्स्**

❋ दूध तापवण्यापूर्वी भांड्यात थोडे पाणी ओतावे त्यामुळे दूध तळाला चिकटत नाही.

❋ लसणाचा वास हाताला येत असेल तर टुथपेस्ट चोळून हात धुवावेत.

❋ लोणची ठेवण्यासाठी काचेची, चिनी मातीची वा पोर्सेलिनची बरणी वापरावी. ओल्या चमच्याचा वापर लोणचे काढण्यास करू नये ते लवकर खराब होते.

❋ दूध उतू जात असेल तर त्यावर थोडे थंड पाणी शिंपडावे.

❋ कोथिंबीर किंवा पालक ताजा ठेवण्यासाठी प्रथम वर्तमानपत्रात गुंडाळून, सच्छिद्र भांड्यात फ्रिजमध्ये ठेवावे.

❋ फ्रिजमधून कुबट वास येत असेल तर लिंब कापून दोन फोडी ठेवाव्यात.

❋ कांद्याच्या दोन फोडी करून थंड पाण्यात पाच

मिनिटे भिजवून कापा म्हणजे डोळ्यातून अश्रू वाहणार नाहीत.

✻ अंडी उकडलेले पाणी कुंडीतल्या रोपट्यांसाठी पोषक असते.

**पुरणपोळीसाठी टिप्स**

✻ पुरणपोळी करणं म्हणजे गृहिणींच कसब असतं. कणीक आणि पुरण एकसारखंच मऊ असावं.कणीक मळून झाल्यावर एका पसरट पातेल्यात घेऊन ती बोटांनी दाबून घ्यावी व त्यावर भरपूर तेल ओतून झाकून ठेवावी. पोळी करताना तेलातून काढून ती चांगली तिंबून घ्यावी. हवी तशी पोळी लाटता येते आणि पुरण बाहेर येत नाही

✻ पुरणपोळीचं पुरण अगदी सैल(पातळ) झालं असेल तर त्यात दोन चिमूट खायचा सोडा घालून पातेलं गॅसवर ठेवून थोड गरम करा म्हणजे ते घट्ट होईल. किंवा एका स्वच्छ जाड कापडावर काही वेळासाठी पसरून ठेवा. अगदी सोपं म्हणजे थोडं डाळीचं पीठ खमंग भाजून पुरणात मिक्स करा.

✻ पोळी लाटताना पोळपाटावर स्वच्छ कापड टाकून त्यावर नेहमीसारखी पोळी लाटावी म्हणजे पोळपाटाला चिकटत नाही.

◆◆◆

With Best Compliments from


Architect
Nilesh Deshmukh

*With Best Compliments From*

# Sarang Enterprises

# सर्वात नाजूक अवयव डोळे

**– ओमनी फीचर्स**



आपल्या शरीराचा नाजूक, बोलका व सुंदर अवयव कोणता असेल तर तो म्हणजे आपले डोळे. सर्वच स्त्रियांचे डोळे सुंदर व आकर्षक नसेल, तरी आपण थोडासा प्रयत्न करून आपण आपले डोळे आकर्षक बनवू शकतो.

❇ सर्व प्रथम डोळ्यांच्या सुरक्षिततेकडे लक्ष द्या. डोळ्यांच्या नियमित देखभाल, पोषणाकडे लक्ष द्या. यासाठी रोज किमान सहा तास गाढ झोप, मंद प्रकाशात डोळ्यांवर ताण पडू न देणे, स्वच्छता राखणे व पौष्टीक आहार घेणे हे महत्त्वाचे असते.

❇ डोळ्यांचा मेकअप करण्यापूर्वी फाऊंडेशनचा हलकासा थर व्यवस्थित एकसारखा लावून द्या. डोळ्यांभोवती काळी वर्तुळे असतील तर कन्सीलरचा वापर करा,पण हा भाग बाकीच्या चेहऱ्याला मॅच होणारा असावा.

❇ तीव्र उन्हात जाताना प्रसाधने पावडरची असावीत. लायनर दिवसा वरच्या पापण्यांवर पातळ रेषेत लावावा. खालच्या पापण्या तशाच ठेवा. रात्री दोन्ही पापण्यांवर लायनर लावा. तर डोळ्यांमध्ये जास्त अंतर असेल तर लायनर पापण्यांच्या एकदम आतल्या कोपरांपासून लावा. जर खूपच कमी अंतर असेल तर डोळ्यांच्या मध्यापासून थोडी जाड रेषा बनवा. हिवाळ्यात दिवसाही लायनर दोन्ही पापण्यांवर लावू शकता.

❇ नेहमी डोळ्यांचा मेकअप दक्षतेने करावा. लायनर द्रव व पावडर दोन्ही रूपात वापरा, जो अनेक रंगांमध्ये मिळतो. आयशॅडोही क्रिमी वापरा. उत्तम प्रतीचा रंगहीन व वॉटरप्रूफ मस्करा वापरा, अन्यथा चेहऱ्यावर पसरेल. ज्यादा असेल तर कोल्ड क्रीम बोटांवर पसरून आयलॅड ब्रशने पापण्या सजवा.

❇ उन्हाळ्यात पावडर, फ्रोस्टेड आयशॅडोचा वापर करा. ओल्या व सुक्या आयशॅडो ब्रशने आपल्या पापण्यांना नाकाच्या टोकाकडून डोळ्यांच्या टोकापर्यंत मत्स्याकार देत शॅडो लावावा. त्यानंतर तो वाळू द्या व कापसाने एकसारखा करून घ्या. दोन रंगाचा ताळमेळही शॅडो वाळल्यानंतर कापसाने घाला. उन्हाळ्यात शॅडोचा वापर लायनर रूपात करू शकता.

❇ डोळ्यांबरोबरच भुवयांनाही आकार द्या .मेकअप करताना कॉस्मॅटिक्स डोळ्यांत जाण्याची शक्यता असते.त्यामुळे ती जर चांगल्या प्रतीची नसतील तर अपाय होऊ शकतो. एखादे इन्फेक्शन झाल्यास कायमचा डोळा बाद होऊ शकतो.डोळा नाजूक आहे. त्यामुळे त्याला जपा. कारण डोळ्यांमुळेच तूम्ही हे सुंदर जग पाहू शकता.

◆◆◆

# एक घास बत्तीसवेळा

खाताना सावकाश खावं. घाईघाईत खाण्यामुळे आपल्या मेंदूलाही त्याचे योग्य संदेश पोहोचत नाहीत. पोट पूर्ण भरलंय हे समजायला आपल्या मेंदूला साधारण २० मिनिंट लागतात. जेव्हा आपलं लक्ष इतरत्र असतं तेव्हा या सूचना नीटशा समजून घेऊ शकत नाही. त्यामुळे मग अन्नपचन आणि पुढील क्रियांमध्ये अडचणी येतात.

सावकाश जेवल्यानं आपण हवं तेवढंच अन्न खातो. त्यामुळे वहनावरही नियंत्रण राहतं. ऑफिसमध्ये एखाद्या दिवशी कामाच्या गडबडीत असल्यानं टेबलावरचा डबा किंवा काहीतरी खाणं ठीक आहे, पण रोजच्या रोज असं उपयोगाचं नाही. नीट बसून डबा खाल्ल्यानं आपण मानसिकदृष्ट्या जेवणाला तयार होत असतो. एकत्रित जेवण केल्यानंही बरेच फायदे होतात. ऑफिसमधल्या सहकाऱ्यांसोबत बोलताना हलकेफुलके विषय घ्या. ऑफिसातली कामं, टेन्शन असले विषय नकोत. हलक्याफुलक्या विषयांमुळे आपलं लक्ष जेवणाकडेच राहतं आणि पोट केव्हा भरतंय, हे लगेच कळून येतं.

चीनमधले संत अर्थात झेन म्हणतात, जेवण ही अत्यंत सुंदर आणि आनंददायी प्रक्रिया आहे. त्यामुळे त्याकडे पूर्ण लक्ष द्यायलाच पाहिजे. प्रत्येक घासाकडे लक्ष देऊन तो प्रेमानं खा. चावां, त्यामुळे त्याचं पचनही उत्तम आणि खऱ्या अर्थानं ते जेवण अंगी लागतं.

काहीजण विचारतात, मी खूप व्यायाम करतो; पण माझं वजन कमीच होत नाही. याचं उत्तर अनेकदा त्यांच्या खाण्याच्या सवयीत दडलेलं असतं. भराभरा खायची सवय असलेले अनेकजण गरजेपेक्षा जास्त खातात. मग त्यांचं वजन वाढतंच जातं.

## हे महत्त्वाचं

जेवण शांत वातावरणात घ्या.

बरं वाटत नसेल, अस्वस्थ असाल तेव्हा जेवण टाळा.

सावकाश आणि चावून –चावून जेवा. एम घास बत्तीस वेळा चावला गेलाच पाहिजे.

भूक लागेल तेव्हाच जेवा. उगाच चाळा म्हणून किंवा ताण आलाय म्हणून खाऊ नका. पोट भरल्यासारखं वाटल्यावरही खाऊ नका.

तुमचं २० टक्के पोट कायम रिकामं असायला हवं. चार घास जास्त जाण्यापेक्षा दोन घास कमी गेलेले कधीही चांगलं.

जेवण झाल्यावर ५ मिनिटं जरा शांततेनं बसा.

◆◆◆

---

### व्हॅलेंटाइन गिफ्ट

गर्लफ्रेण्ड : व्हॅलेंटाइन डेला मला काय गिफ्ट देशील ?

बॉयफ्रेण्ड : काय हवंय तुला ?

गर्लफ्रेण्ड : मला रिंग देशील ?

बॉयफ्रेण्ड : हत्तीच्या ! त्यात काय ?

देईनना ! मोबाइलवर देऊ की लॅण्डलाइनवर ?

**ओमनी फीचर्स**

# अत्यावश्यक टीप्स सखींसाठी...

- ❐ विरजण लावताना, विरजणाचा चमचा दुधात एकाच दिशेने फिरवावा. विरजण घट्ट लागते.
- ❐ मिक्सरच्या भांड्यात चमचाभर मीठ घालून मिक्सर २-३ मिनिटे चालवावा. पात्यांना धार येते.
- ❐ तुरटीची पूड रॉकेलमध्ये मिसळून वाळवी आलेल्या भागात लावल्यास वाळवी नाहीशी होते.
- ❐ खरचटलेल्या ठिकाणी मध लावल्यास वेदना कमी होतात.
- ❐ पवित्र समजली जाणारी तुळशीची कुंडी खिडकीत ठेवल्यास घरात डास येत नाहीत.
- ❐ भिजवलेली कणीक दुधाच्या पिशवीतून फ्रिजमध्ये ठेवल्यास ती कणीक काळी पडत नाही.
- ❐ पावसाळ्यात मिठाला पाणी सुटू नयेत म्हणून मीठ बरणीत भरण्यापूर्वी तळाशी वर्तमानपत्राचा कागद दोन-तीन घड्या घालून ठेवावा.
- ❐ संध्याकाळी ताक पिऊ नये.
- ❐ भोपळ्याची बी सोलून आतील गर खाल्ल्यास जंत होत नाहीत.
- ❐ दही लावाताना दुधात तुरटी फिरवली तर दही घट्ट लागते.
- ❐ मधुमेही लोकांनी शिळा कच्चा कोबी चिरून खावा.
- ❐ जी मुले दूध घेत नाहीत, अशांकरिता आठवड्यातून २-३ वेळा पनीरचे प्रकार करावेत. मुले आवडीने खातात.
- ❐ भजी करताना पिठात थोडेसे मोहन व चिमूटभर खाण्याचा सोडा घालावा. भजी कुरकुरीत होतात.
- ❐ अंडी उकडताना त्यात चिमूटभर मीठ घातल्यास अंडी फुटत नाहीत व सालेही पटकन सुटतात.
- ❐ नारळ मधोमध फोडण्यासाठी मिनिटभर पाण्यात भिजवून घ्यावा.
- ❐ शेव तयार करण्यासाठी हरभऱ्याची डाळ दळायला देताना त्यात मूठभर चवळी टाकावी. शेव खुसखुशीत होते.
- ❐ सामोसे कुरकुरीत होण्यासाठी सामोशाच्या पिठात एक चमचा कॉर्न फ्लोअर घालावे.

◆◆◆

---

**बंद घड्याळ**

बाबा : झम्पू, जरा तुझा मोबाईल दे रे .. ..

झंम्प्या : एक मिनिट हा बाबा, स्विच ऑन करून देतो

(झम्प्या सुमडित आयटमचे फोटो उडवतो,सर्व मुलींचे मेसेज आणि नंबर डिलीट करतो, मेमरी कार्ड डिलीट मारतो.)

.....हा बाबा, हा घ्या आता....

बाबा : आभारी आहे .... काही नाही रे

घड्याळ बंद पडले ना फक्त टाइम

बघायचा होता....

**ओमनी फीचर्स**

**With Best Compliments From**

# *Ajinkya Fire Protection Systems*



# मोगरा फुलला

पाहुनी सुंदर बाला
एक मोगरा फुलला
जवळ येता ती बाला
मोगरा मनात खुलला
हळूच तिने तो खुडला
वेणीत आपुल्या खोवला
मोगरा स्पर्शाने लाजला
खूप आनंद त्याला झाला
सुवास त्याचा मग दरवळला
सारा आसमंत सुगंधित झाला
पण नव्हते ठावूक मोगऱ्याला
अल्पायुष्याचा शाप आहे त्याला
दुसरे दिनी तो कोमेजला
बालेनी फेकूनी त्याला दिला
कित्येकानी पायी तुडविला
मोगरा पार छिन्न-विच्छिन झाला

**-सुनीता सुरेश देहेरकर**

# जीवनाची रूपे

अजब जिंदगी ही ,अजब सारी दुनिया
कुठे न्याय निष्ठूर-कोठे दया 'अजब' ।। धृ ।।
कुठे जन्मती बालके सुंदर
पडे मृत्यूच्या पाश कोणावर
कुणी हासते... कोणी लागे रडाया ...अजब सारी
कुठे उंच ते ओम,भेदी गिरी
कुठे जीव घेणी भयानक दरी
कुणी निर्मिली ही जगी गूढ माया ?... अजब सारी दुनिया
मन जिंकुनी कोणी होती विरागी
विलासात कोणी पडे धुंद भोगी
मिळे मोक्ष कोणा,कुणा असूया... अजब सारी दुनिया
कुणाच्या घरी शोभे दिवाळी
कुणाच्या जिवाची जळे नित्य होळी
कुणाला मिळे तेज, कुणा काळी छाया... अजब सारी दुनिया
अजब जिंदगी ही ...अजब सारी दुनिया

**- इन्दुमती ठक्कर**

# चल गं राधे

चंदेरी किरणांची बरसात गं

चल गं राधे रास खेळू चांदण्यात गं ।। धृ. ।।

लक्षदीप लागले मोतियांच्या झालरी

वसुंधरा नेसली गं चंद्रकला भरजरी

चांद आला सोनेरी अंगणात गं ... चल गं राधे रास खेळू चांदण्यात गं ।। १ ।।

मधुर तुझे बोल आणि गोरी गोरी काया

साऱ्या गोकुळची जडे तुजवरी माया

कृष्ण वेडा तुजसाठी दिवस रात गं ... चल गं राधे रास खेळू चांदण्यात गं ।। २ ।।

बासरीचा सूर घुमे यमुना किनारी

तुझ्याविना एकला गं शाम मुरारी

ताल चुके टिपऱ्यांचा खेळांत गं

चल गं राधे रास खेळू चांदण्यात गं ।। ३ ।।

**- इन्दुमती ठक्कर**



# स्मित उमलले क्षणात

फुलांमध्ये जपला गंध

सुगंध पाकळयात

घाली सुगंधाचा सडा

माझ्या दारी पारिजात ।।१ ।।

रेशमाच्या बंधनी होते

माझे मन बंधनात

फुलपाखरू ते झाले

शब्द माझ्या कवितेत ।।२ ।।

अक्षरांचे मोती जपले

मी शब्द शिंपल्यात

गीत होऊनिया आले

ते आज माझ्या कवितेत ।।३ ।।

सात रंग सामावले

कोवळया सूर्य किरणांत

श्रावणात भिजता नटले

इंद्रधनू ते नभात ।।४।।

आशेचे अंकुर जपले

मी माझिया मनात

चांदणे होऊनिया ओठी

स्मित उमलले क्षणात ।।५ ।।

**- विनीता वासुदेव आगाशे**

# हेमलकसा

हेमलकसा हेमलकसा
लोकसेवेचा कुणी वसा घेई
अंधारातल्या आडवाटेवरती
वाट प्रकाशाची दिसून येई।। १।।

सुखसोयी नव्हत्या काही
जीवन होते कष्टदायी
परी मंदाताईची साथ मिळता
प्रवास खडतर सुखकर होई।। २।।

वटवृक्षेच्या छायेखाली
झाड दुसरे वाढत नाही
म्हणुन आनंदवन सोडूनी
नवीन कार्याचा ध्यास घेई।। ३।।

गरीब माडीया आदिवासी
जीवन त्यांचे वनवासी
उपचार करूनी त्यांच्यावरती
औषधे ही त्यांना देई।। ४।।

वाघ साप हिंस्त्र जरी
क्रूरपणा त्यांचा जाई
मायेचा ते हात फिरविता
किमया जणू घडते काही।। ५।।

अनेक पशू प्राणी पाळले
वाघ साप ही माणसाळले
प्रेमाने या मुक्या प्राण्यांना
हेमलकसा जिंकून घेई।। ६।।

वाट अशी ही खडतर जरी
महान कार्य घेतले करी
मॅगसेसे पुरस्कार जाहीर होता
सन्मान या कार्याचा होई ।।७।।

**– विनीता वासुदेव आगाशे**



# प्राचीन भारतीय स्त्री !

स्त्रीला श्रेष्ठ मानणारी प्राचीन भारतीय संस्कृती
त्याग ,समर्पण,कमालीची सोशिकतेची मूर्ती
शुभ्र धवल चारित्र्य,शील सद्‌गुणांची मूर्ती
या सद्‌गुणावर झाली तेजस्वी भारताची निर्मिती।। १ ।।

भारतीय संस्कृतीत स्त्रियांचे महत्त्वाचे योगदान
रामायण , महाभारत काळात स्त्रीला श्रेष्ठ स्थान
नीती, धर्म, ज्ञान, विज्ञान, कलेत होती निपुण
चौदा विदया, चौसष्ट कलेत होती निपुण।। २।।

वेदकालीन समाजात होती स्त्री-पुरुष समानता
कुटुंबात पुरुषाबरोबर स्त्रीला अधिकाराची समानता
अपाला, लोपमुद्रा, मैत्रयाी, गार्गीनी रचल्या मृदा
ज्ञान, विज्ञान, साहित्य, कला इ.
क्षेत्रांत चमकल्या स्त्रिया ।। ३।।

वेद ,पठण,अध्ययन ,मंत्रोपचार क्षेत्रात बंदी नव्हती
मुलांप्रमाणेच मुलीचीही मुंज होत होती
धर्म व अध्यात्म या क्षेत्रात स्त्री अग्रणी होती
रामायणात सीतामाई त्रिकालसंध्या करीत होती ।। ४।।

**-लता लीलाधर बोरोले**

# सुख

जगण्याच्या धडपडीमागे सुखाची ओढ असते
सुखाच्या शोधात जाण्याची मनाला खोड असते
आयुष्यात सुखदु:खाची पाठशिवणी चालू असते
तनावमुक्त जीवन सुखाचे जन्मस्थान असते
माणसाने संतोषी राहण्यात सुखशांती असते
तर असंतोष हेच सर्व दु:खांचे मुळ असते
इच्छेची भूक अग्नीसारखी नेहमीच अतृप्त असते
तर अनिच्छेचे ओझे आळसामुळे वाढत असते
माणसाचे सौख्य विचारावर अवलंबून असते
अविचारातच अधोगतीचे व कमीपणाचे मूळ असते
स्वार्थाने सद्‌सद्‌विवेकबुद्धी दुरावत असते
परोपकाराने जगाची खरी ओळख होत असते
अहंकाराच्या त्यागात सुखाची सुरुवात असते
स्वाभिमानाच्या जगण्यात वेगळीच मजा असते
जन्माप्रमाणे मृत्यू हे निसर्गाचे गूढ असते
तरीही सुखाच्या प्राप्तीसाठी रात्रंदिवस धडपड असते

**- विजया शिंदे**

# मैत्री. ...

Friendship , दोस्ती, याराना
रिश्तोंका ये है महत्त्वपुर्ण गेहना
चाहे दुर हो या पास
दोस्त होते है हमेशा खास
युग –युग से बताते है दोस्ती के किस्से
हमारी  दोस्तां भी कम नहीं किसीसे
दोस्ती नहीं किसीको सिखाई जाती
एक साथ समय बिताने पर मजबुत हो जाते
Friendship  Has no reason
Friendship Knows no season
करून पाहा एकदा मैत्री
आनंद आणि आनंदच मिळेल याची आहे खात्री
मैत्रीला असतो प्रेमाचा गंध
तोच टिकवतो नात्यातील अनुबंध
दोस्ती सिखाए हमे जीना
जी नहीं सकते हम उसके बिना

**– सुप्रिया दळवी**

# मैत्रीचे धागे नाजूक

मैत्रीचे धागे नाजूक, गुंफावे लागतात प्रेमाने
निगा त्यांच्या मजबुतीची राखावी लागते नेमाने ।।
उन्हात गारवा ,थंडीत ऊब देते मैत्रीचे वस्त्र
संकटातही आपल्यासाठी ढाल बनतात मित्र
सुरक्षिततेची जाणीव त्यांच्या सहवासात होते नव्याने
मैत्रीचे धागे नाजूक .. .. .. ..                ।।१ ।।
तुझ्यासाठी मी ,माझ्यासाठी तू नाही लागत सांगावे
मना वाटेल तेव्हा तेव्हा यथेच्छ इथे भांडावे
सरता भांडण हाती हात घ्यावे पुन्हा हक्काने
मैत्रीचे धागे नाजूक .. .. .. ..                ।।२ ।।
नसतात जरी दोस्त सदोदित आपुल्यापाशी
ताजे असतात स्नेहबंध दूर असोनिया त्यांच्याशी
आठवणींचा वारा त्यांच्या मनी गुलाब फुलवी जोमाने
मैत्रीचे धागे नाजूक .. .. .. ..                ।।३ ।।

**– जुई देशपांडे**

# शिदोरी

सासरी निघताना आई भरते शिदोरी
तिने सोसलेल्या यातनांचे दाणे, एकेका कप्प्यात मांडत असते.
चार भिंतितल्या वणव्यातही, उंबरठा न ओलांडण्याचा, मळवट भरते कपाळभर
मागच्या इतिहासातल्या जखमा ,अवहेलना सोसूनच,
सदृढ सौभाग्य टिकवल्याचा नारळ घालते ओटीत
तिच्या काळजाच्या नकाशात काहीच पेरलेले नसताना
सुखसमृध्दीचे रांजण भरण्याचा तिचा मुखवटा मी नजरेआड करते
पराधिनतेला जोजवत चाललेल्या तिच्या वाटेवरची वेस ओलांडताना
मला रुजवायची असतात नवी बीजे
स्त्रीचे, स्वत:चे अस्तित्व बहरणाऱ्या भूमीत
सुनीता विल्यम, कल्पना चावला, असेच आणखी कोणाकोणाच्या प्रेरणांचे नांगर हाती घेते
मात्र आईच्या थरथरत्या मायेची ,ओथंबलेल्या अश्रुंची क्षमा मागून
त्या हळव्या क्षणाची शिदोरी, सोडून देते, नदीच्या पात्रात

**– शकुंतला कश्यप**



# पैसा हे सर्वस्व नाही

मी घर विकत घेऊ शकतो...
पण त्या घराचे घरपण नाही....
मी घड्याळ विकत घेऊ शकतो ....
पण गेलेली वेळ नाही....
मी मोठे पद विकत घेऊ शकतो ....
पण आदर नाही....
मी मखमली गादी विकत घेऊ शकतो ....
पण शांत झोप नाही....
मी पुस्तक विकत घेऊ शकतो ....
पण विद्या नाही...
मी औषधे विकत घेऊ शकतो ....
पण चांगले आरोग्य नाही.. ..
मी रक्त विकत घेऊ शकतो.. ..
पण कोमेजून जात असलेले जीवन नाही.. ..
पैसा हे सर्वस्व नाही.. ..

**- ओमनी फीचर्स**




# मैत्रीण !

मैत्रीण असावी लागते बालवयात.......
लंगडीत आऊट होऊनही कट्टी करण्यासाठी
भातुकलीच्या खेळात भांडण करण्यासाठी
चिमण्या दातातील चिंच देण्यासाठी.......।।१।।
मैत्रीण असावी लागते तरुणपणात.......
कॉलेजात जाताना येताना आधारासाठी
तारूण्यसुलभ चेष्टामस्करी करण्यासाठी
मनातले पहिले गुपित हळुवार सांगण्यासाठी
संसारातील अडी-अडचणीत पाठीशी उभी राहण्यासाठी......।।२।।
मैत्रीण असावी लागते वार्धक्यात..........
शरीर, मन दुखलं, खुपलं तर सांगण्यासाठी
आजारी पडल्यावर मदत करण्यासाठी
वार्धक्यातील एकाकी, एकटेपणा दूर करण्यासाठी
शारीरिक, मानसिकदृष्टया खचल्यावर आधार देण्यासाठी........।।३।।

**- लता लीलाधर बोरोले**

# शोध



कोण मी ? कुठली मी ? न कळे
गावकूसही हरवलेले
गर्दीत बिनचेहऱ्यांच्या
अस्तित्व शोधते मी !
निबीड भोग प्राक्तनाचे
वाटाही नैराश्यात बुडाल्या
काजवा धरून हाती
सूर्य शोधते मी !
नेमेचि सूर्य-चंद्र वाहती
दिवस-रात्रीच्या पखाली
ओंजळीतूनी निसटत्या क्षणाला
चहुदिशी शोधिते मी!
क्षुधित विश्व सारे
उपाशीच मीही
वाटून खाण्या,पात्रास चिकटलेला
तीळ शोधते मी !
धडाडून पेटला वणवा
स्वप्नेच राख झाली
दलांतरी ज्वाळ-फुलांच्या
दवबिंदू शोधते मी !
कोसळली त्सुनामी आपदांची
वाहून सर्व गेले
हरवल्या सुख-कणांना
पुळणीत शोधते मी!
हसू दे नियती खदखदा
हरणार मी न आता
आत्मबल-दीप पाजळोनी
माझी मलाच शोधेन मी !

**- शंकुतला बी. चौधरी**

# लोकलगीत महिला स्पेशल

गेल्या जन्मी असं काय 'पाप' केलं
की 'लोकलने' प्रवास करणं नशिबी आलं ?
चार काम टाकून, मेल धावत स्टेशन गाठावं
तर रेल्वेचं नित्याचंच गाऱ्हाणं ऐकावं।
गैरसोय, दिलगिरी, खेद शब्दही त्यांचे खास
आणि झालेत किती क्रॉस एकच चिंता आम्हांस।
आयत्या वेळी करतात फलाटांतही बदल
मग गाडी आल्यावर आमची विचारूच नका धांदल।
गच्च भरलेल्या गाडीत एकदाच कसंबसं घुसायचं
मंगळसूत्र, पर्स अन् इस्त्रीच्या साडीला जपायचं
वाटेतले धक्के, फेरीवाल्यांचे खोके
सारं सारं चुकवत मैत्रिणींना शोधायचं
नाहीतर, कुठे उतरणार ? कुठे उतरणार ?
करत जागेसाठी मरायचं।
बरं गाडीनं तर विडाच उचललेला जायचं नाही थेट
अन् ऑफिसांतला तो 'डोमकावळा' मार्किंग करतो 'लेट'
पण असं जरी घडलं ना प्रत्येक दिवशी
तरी 'महिलांच्या' डब्ब्यातल्या, आम्ही नारी भारी हौशी।
प्रवासातच चालतं आमचं हळदकुंकू-भोंडला-केळवण,
वाढदिवस, पार्ट्या आणि चक्क डोहाळजेवण।
दमल्या भागल्या भगिनींची गाडीत भेंड्या नि गाणी
टाइमपासला असते सासू नाहीतर बॉसची कहाणी।
अशा ह्या लोकलच्या आम्ही खरंच 'ऋणी'
इथे कित्येक मिळवल्या मैत्रिणी
अन् झालो सहनशील 'मुंबईकरणी'।

**- अलका वढावकर**



With Best Compliments From

# Shraddha
# Fire Protection
# Systems
# Pvt. Ltd.



# पाककृती

## नवरंगी सलाड

**साहित्य**–काकडी१, टोमॅटो१, मोड येऊन सोललेले मुग २च., पिवळे मक्याचे दाणे २च, डाळिंबाचे दाणे २च., पेर (मऊ)१/२, पुदिन्याचे पाने१५-२०, चाटमसाला १/२च, मीठ चवीपुरते अगदी थोडे.

**कृती**–वरील सर्व फळे व भाज्यांचे बारीक तुकडे करून एका काचेच्या बाऊलमध्ये ठेवावे. वरून पुदिन्याची पाने पसरवावी. सर्व्ह करायच्या आधी थोडावेळ मीठ व चाटमसाला घालून हळुवार मिक्स करावे

**टीप**–प्रकृतीला उत्तम, ४-५ जणांना पुरेल, मुलांनाही आवडेल.



**– गिरीजा पागनीस**



## भेंड्यांचे सांडगे

साहित्य :– हिरव्यागार कोवळया भेंडया–१कि.लो, लाल भोपळा–१/२ कि.लो, हिरव्या मिरच्या–५० ग्रॅम, तीळ भाजून–१/२ वाटीभर, हिंग व हळद व मीठ

कृती : भेंडयाचा शेंडा बुडखा काढून चिराव्यात

भोपळा साले काढून बारीक फोडी करून घ्याव्यात. सर्व सामान एकत्र करून मिक्सरमधुन भरडून घ्यावे व पाटावर छोटया लिंबा एवढे सांडगे घालून वाळवावेत. वाळल्यानंतर ते तळावेत.

**– शकुंतला नानिवडेकर**

# बटाटयाचे गुलाबजाम



**साहित्य**- १/२ कि.बटाटे, वेलदोडे, साखर फुटाणे, तुप,साखर, लिंबाचा रस.

**कृती** – बटाटे उकडून त्यांचे मुलायम पीठ वाटून त्याचे गोळे करून गोळयामध्ये १ वेलदोडा व साखरफुटाणा घालून नीट गोळे बनवा.लिंबाचा रस घालून साखरेचा एकतारी पाक करावा तूप तापवून त्यात गोळे टाकून मंद आचेवर तळणे व पाकात टाकणे.तयार होतील बटाटयाचे गुलाबजाम.

**– वसुधा गोसावी**

# आमरसातल्या शेवया



**साहित्य**–१ वाटी शेवया, २वाट्या आटलेलं दूध, १वाटी आंब्याचा रस, १/२ वाटी नारळाचं दूध, ड्राय फ्रूटसचे काप, २ चमचे तुप

**कृती**–प्रथम तुपावर शेवया लालसर रंगावर परतून घ्याव्या.त्यात गरम पाणी घालून शिजवावे, थोडे गरम झाल्यावर त्यात आटवलेले दूध, आंब्याचा रस व नारळाचे दूध घालून ढवळावे. त्यात ड्रायफ्रूटस घालावे.

**– ओमनी फीचर्स**

# झटपट होणारे मुळयाचे डोसे




**साहित्य**–बारीक चिरलेली ओली लसूण १जुडी, एका मुळयाचे तुकडे, जिरे १चमचा,२–३ तास भिजवलेला तांदूळ २ वाटी, मीठ चवीनुसार, आलं आणि लसणाची पेस्ट १ चमचा २–३हिरव्या मिरच्या, धणेपूड १चमचा, तळण्यासाठी तेल.

**कृती**–प्रथम बारीक चिरलेली लसूण, आलं–लसुण पेस्ट, हिरव्या मिरच्या, मुळयाचे तुकडे, भिजवलेली तांदूळ, मीठ चवीनुसार एकत्र करुन मिक्सरमधून जाडसर वाटून घ्यावं.तेलात फ्रायपॅनवर जाडसर चिल्ल्याप्रमाणे पसरवावं. दोन्ही बाजूने तपकिरी, खरपूस भाजून घ्यावं. ते सॉस किंवा चटणीबरोबर गरमगरम सर्व्ह करावं.

**– ओमनी फीचर्स**

# उपवासाचे डोसे




**साहित्य :** – १ वाटी मूगाची डाळ, पाव वाटी साबूदाणा, २–३ हिरव्या मिरच्या, पाव चमचा जीरे, मीठ चवीनुसार.

**कृती :** – प्रथम मुगाची डाळ आणि साबुदाणा धुऊन घ्या. नंतर एका भांड्यात थोड्या जास्त पाण्यात २–३ तास भिजत ठेवा.

भिजल्यावर त्यामध्ये मिरच्या, जिरे व मीठ घालून वाटून घ्या.आणि नॉनस्टिक तव्यावर पसरवून कुरकुरीत डोसे काढावेत.

**– ओमनी फीचर्स**

# झटपट ढोकळा




**साहित्य**–पाव किलो डाळीचे पीठ, एक वाटी रवा, लिंबू, खाण्याचा सोडा१/२चमचा, आलं, हिरवी मिरची, कोथिंबीर, मीठ.

**कृती**–डाळीचे पीठ व रवा कोमट पाण्यात भिजवावा (भज्यांच्या पिठाप्रमाणे)हिरव्या मिरच्या आलं वाटून, मीठ घालावे, सोडा व दोन तीन चमचे तेल घालावे. नेहमीप्रमाणे वाफवून काढावे. वड्या कापाव्या,तेल गरम करुन हिंग, मोहरी, जिरे, तिळाची फोडणी करून घालावी, कोथिंबीर व आलं, खोबरे किसून घालावे

**– लीला शाह**

# पास्ता सँडवीच



**साहित्य :**– प्रथम पास्ता पाण्यात मीठ व तेल घालून शिजवून घ्यावा, सिमला मिरची, गाजर, कोबी, कांदा पात (सर्व १ वाटी) मीठ, मिरपूड, चवीप्रमाणे ब्रेड (ब्राऊन) स्लाइस, बटर, चीज सॉस

**कृती :**- प्रथम बटरवर सर्व भाज्या परतून घ्याव्या मीठ, मिरपूड, टोमॅटो सॉस घालून परतून भाजी करावी नंतर ब्रेड घालून वरून दुसरा स्लाईस लावावा. हा टोस्टरमध्ये ठेवून सँडविच टोस्ट करावे व सॉसमध्ये चीज किसून थोडी मिरपूड घालून डीप तायर करावे त्याबरोबर हे टोस्ट सँडविच गरमागरम खायला घ्यावे. याप्रमाणे खिमा, भुर्जी, भाजी घालूनपण हे करता येते जसे आवडेल तसे करावे. मुलांना पण खूप आवडेल.

**– अंजली अनिल जोशी**

# विनोद

## हयाच्या शेजारच्या मुलाला झोडपा

गावचा एक पाटील आपल्या खोडकर छोट्या मुलाला घेऊन शाळेत नाव घालण्यासाठी हेडमास्तरांकडे घेऊन आला व म्हणाला ''गुरुजी याचं पहिलीत नाव टाका...तसं त्याला काही सुध्दा येत नाही''.फकस्त दांडगाई आणि मस्ती करतो बघा.पण तुम्ही त्याची काय बी काळजी करू नगासा. वर्गात हयानं मस्ती केली तर त्याच्या शेजारच्या मुलाला झोडपून काढा म्हंजे हयो तुमास्नी घाबरंल.तेवढं लक्षात ठेवा.बरं ...येतो मी...

**इन्दुमती दर्शने-ठक्कर**

## डाळ शिजणे

जास्त लवकर डाळ शिजते

तो असतो प्रेशर कुकर

त्यापेक्षा जास्त वेळाने डाळ शिजते

ती असते शेगडी

आणि..

जेथे कधीच डाळ शिजत नाही

ती असते बायको.

**ओमनी फीचस**

## शिक्षक

वर्गात शिक्षक मुलांना सांगतात.. ..

''मुलांनी आपापसांत का भांडू नये.. ..''

ते नंतर मुलांना प्रतिप्रश्न करतात,

'' मुलांनो, तुम्हाला कळलं का मी काय सांगतोय ते.. . ?

बंडू सांग पाहू, तुला काय कळलं ते ?''

बंडू : आम्ही एकमेकांशी भांडायला नको.

शिक्षक : अगदी बरोबर.. ..

पण का भांडायला नको ?

बंडू : कारण परीक्षेला कुणाच्यामागे नंबर येईल

सांगता येत नाही...

**ओमनी फीचर्स**

## पहिलीच चूक

झंप्या : साहेब

ह्या वेळी तुम्ही माझ्या पगारात २०० रुपये कमी दिलेत

साहेब : अरे वा गेल्यावळी तुला पगारात चुकून २०० रुपये जास्त दिले होते..

झंप्या : हो साहेब पण ती तुमची पहिलीच

चूक होती म्हणून मी गप्प होतो ..

**ओमनी फीचर्स**

## पंक्चर टायर

बस गच्च भरली होती. आता ती सुरू होणार तोच ड्रायव्हर म्हणाला, ''गाडीचा टायर पंक्चर आहे...''

ताबडतोब कंडक्टर उतरला ... त्याच्यामागोमाग गण्या उतरला ....

दोघांनी मिळून गाडीचा टायर बदलला ....

बस सुरू होण्यासाठी सज्ज झाली.

कंडक्टर गण्याला म्हणाला, ''तुम्ही केलेल्या मदतीबद्दल मी तुमचा आभारी आहे. आजकाल लोक एस.टी. वाल्यांना अजिबात मदत करीत नाहीत, पण साहेब, तुम्ही स्वत: गाडीखाली जाऊन टायर चढवला. हात पाय, कपडे खराब करून घेतलेत. मी खरचं खूप आभारी आहे.

तेवढ्यात गण्या म्हणाला,''मित्रा, आभार मानण्याचे काहीच कारण नाही .. ..माझी बायको १० वर्षांनंतर माहेरी जातेय, ती याच बसमध्ये आहे..

टायर पंक्चर झाल्यामुळे माहेरी जाणं तिचं रद्द होऊ नये म्हणून केली ही सगळी खटपट...

**ओमनी फीचर्स**

## वडील, मुलगा आणि तंबू

एकदा वडील आणि मुलगा दोघे सहलीला जातात.

वडील अडाणी असतात आणि मुलगा चांगला शिकलेला असतो.

ते दोघे रात्री एक ठिकाणी आपला तंबू उभारतात आणि त्यात झोपी जातात.

काही तासांनंतर वडील मुलाला उठवतात व म्हणतात;

वडील–वर आकाशात पहा आणि सांग काय दिसतंय.. ?

मुलगा–मला लाखो तारे दिसताहेत.

वडील–ते तुला काय सांगत आहेत ?

मुलगा–खगोलशास्त्रानुसार ते सांगतात की लाखो आकाशगंगा आणि ग्रह आहेत.

वडील–(एक मुस्काटात ठेवत)मूर्खा ते सांगत आहेत की आपला तंबू चोरीला गेला..

**ओमनी फीचर्स**

---

## MRF टायर

बंड्या : मला आपल्या आयटमला कायतरी शॉल्लट गिफ्ट द्यायचंय !..

पिंट्या:मग सोन्याची रिंग दे की !!!

बंड्या : हे!!!! असलं बारीक काय नको !!...

एकदम मोठा कायतरी द्यायचंय!!!..

पिंट्या :मग MRF चा टायर दे रताळ्या

**ओमनी फीचर्स**